नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २९६ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026



मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

थोडक्यात...

'इंडिया' आघाडीच्या दिल्लीतील मोर्चामध्ये नेहा बोरा केंद्रबिंदू

नवी दिल्ली(स. गांवकरी) : 'इंडिया' आघाडीच्या मोर्चामध्ये नेहा बोरा सोमवारीही केंद्रबिंदू ठरल्या. 'इंडिया' आघाडीचे इतर नेते असतानाही नेहा बोरांकडे लक्ष वेधले जात होते. त्या राहुल गांधी व इतरांबरोबर उघड्या टेम्पोमध्ये होत्या व तिथूनच त्या सातत्याने माध्यमांना प्रतिक्रियाही देत होत्या. कार्यकर्ते त्यांच्याकडून सह्या घेत होते. काही कार्यकर्त्यांनी टोपीवर नेहा बोरांकडून सही घेतली. दिल्लीमध्ये जंतर मंतर २.० आंदोलनाचे नेतृत्व गेले दोन दिवस नेहा बोरा करताना दिसल्या. पोलिसांना चकवा देत त्यांनी आंदोलन केले. त्यांना ताब्यात घेण्यासाठी पोलिसांना कष्ट घ्यावे लागले होते. या आंदोलनामध्ये 'कॉक्रोच जनता पार्टी'चे (सीजेपी) नेते सहभागी झालेले नाहीत. आंदोलनाची पुढील दिशा नंतर ठरवली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केल्यामुळे जंतर-मंतर २.० चे आंदोलन चालवण्यात डाव्या विद्यार्थी संघटनाच आघाडीवर असल्याचे स्पष्ट झाले. 'इंडिया' आघाडीमध्ये आम आदमी पक्ष नसल्यामुळे सोमवारच्या मोर्चामध्येही 'आप' सहभागी झाला नाही.

वीज तुटवड्यामुळे राज्यात भारनियमन

पुणे (स. गांवकरी) : 'एल निनो'मुळे झालेली तापमानवाढ वीजपुरवठ्याच्या मुळावर आली आहे. विजेच्या वाढलेल्या मागणीच्या तुलनेत उपलब्ध वीज कमी पडत असल्याने महावितरणला राज्यात भारनियमन करण्याची वेळ आली आहे. गेल्या आठवडाभरापासून राज्यात भारनियमन होत असल्याचे उघड झाले असून, गेल्या काही वर्षांमध्ये प्रथमच असे झाले आहे. महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने (एसएलडीसी) किती भारनियमन झाले, याची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. या आकडेवारीनुसार, राज्यभरात गेल्या शनिवारपासून (३ ऑक्टोबर) जास्त मागणी असलेल्या संध्याकाळच्या वेळात भारनियमन करण्यात येत आहे. गेल्या बुधवारपासून (७ ऑक्टोबर) सायंकाळबरोबरच सकाळी सहा व सातलाही भारनियमन करण्यात आले, तर शनिवारी, सुमारे ७५० मेगावॉट तुटीमुळे भारनियमन झाले. त्यात वाढ होऊन गुरुवारी (८ ऑक्टोबर) वीजतूट एक हजार मेगावॉटहून अधिक, तर शुक्रवारी (९ ऑक्टोबर) १८०० मेगावॉटहून अधिक होती.

लिलावात भारतीय खेळाडूचा डंका!

पुणे (स. गांवकरी) : किया टेनिस प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेला येत्या डिसेंबर महिन्यात सुरुवात होणार आहे. यंदा ही स्पर्धा हैदराबादमध्ये खेळवली जाणार आहे. त्याआधी रविवारी (१२ ऑक्टोबर) मुंबईत टेनिस प्रीमियर लीग स्पर्धेच्या आठव्या हंगामासाठी खेळाडूंचा लिलाव पार पडला. या लिलावात भारताचा युवा स्टार खेळाडू दक्षिणेश्वर सुरेश, रशियाची इरिना शिमानोविच आणि सोफ्या लान्सरे यांच्यावर प्रत्येकी १३-१३ लाखांची सर्वोच्च बोली लागली. या स्पर्धेला पहिल्या हंगामापासून भारताचे दिग्गज टेनिसस्टार लिएंडर पेस, सानिया मिर्झा आणि रोहन बोपण्णा सारख्या खेळाडूंचा वारसा आहे. यासह. या लिलाव सोहळ्याला महाराष्ट्र लॉन टेनिस असोसिएशनच्या प्रेसिडेंट अमृता फडणवीस यांनी देखील हजेरी लावली होती. या स्पर्धेत सहभाग घेतलेल्या आठही फ्रेंचायझींमध्ये नवख्या आणि अनुभवी खेळाडूंना संघात स्थान देण्यासाठी चुरशीची लढत पाहायला मिळाली. भारताचा स्टार टेनिसपटू दक्षिणेश्वर सुरेशवर १३ लाखांची विक्रमी बोली लागली. सुरेशला लखनौ ब्लेझर्सने आपल्या संघात स्थान दिलं. यासह गतविजेत्या जीएस दिल्ली एसेस संघाने बेल्जियमच्या सोफिया कोस्टोलासवर १३ लाख रूपयांची बोली लावली आणि आपल्या संघात स्थान दिलं.

'इंडिया'चा विराट मोर्चा

सर्वोच्च न्यायालय परिसरात निदर्शने, आठवड्यात पाचव्यांदा विरोधकांचे शक्तिप्रदर्शन



नवी दिल्ली : (स. गांवकरी)

मतचोरीचा आरोप करत केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात याचिका दाखल करण्यासाठी सोमवारी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडीच्या नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयावर विराट मोर्चा काढला. सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी इंडिया आघाडीच्या नेत्यांना भेट देण्यास नकार दिल्यामुळे राहुल गांधींच्या विधि चमूने याचिका दाखल केली. मात्र त्यानिमित्ताने इंडिया आघाडीने केवळ एकजूटच दाखवली नाही तर, आठवडाभरात पाचव्यांदा शक्तिप्रदर्शन करत केंद्र सरकारविरोधातील लढाई आणखी तीव्र केली.

या मोर्चामध्ये इंडिया आघाडीचे कार्यकर्तेच नव्हे तर, विद्यार्थी, जेन-झी तरुण, वकील, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. या व्यापकतेमुळे मोर्चाला जनसागराचे स्वरूप प्राप्त झाले. इंडिया आघाडीच्या मोर्चामुळे जंतर-मंतर २.०च्या दिल्लीतील आंदोलनाचे नेतृत्व राहुल गांधींच्या हाती आल्याचे मानले जाऊ लागले आहे.

गेले दोन दिवस डाव्या विद्यार्थी संघटनांचे आंदोलक दिल्लीच्या विविध भागांमध्ये अवचित निदर्शने (फ्लॅश प्रोटेस्ट) करत आहेत. त्याचे प्रमुख केंद्र कॅनॉट प्लेस राहिले आहे. येथूनच सोमवारी इंडिया आघाडीने सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढला. कॅनॉट प्लेस-बाराखंबा रोड जंक्शन ते सर्वोच्च न्यायालय हा दोन किमीचा परिसर कार्यकर्त्यांनी भरून गेला होता. न्यायालयापासून काही अंतरावर पोलिसांनी इंडिया आघाडीचा मोर्चा अडवला खरा पण, मंडी हाऊस परिसरामध्ये दीड तास नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी ठिय्या दिला होता. या मोर्चामध्ये काँग्रेसचे तसेच, त्यांच्या विद्यार्थी व युवक संघटना, एनएसयूआय- आयवायसीचे कार्यकर्ते मोठ्या संख्याने सहभागी झाले होते. या मोर्चामुळे सोमवारी जंतर-मंतर २.०च्या आंदोलनाचे स्थळ मंडी हाऊस ते सर्वोच्च न्यायालयाला जोडणाऱ्या भगवान दास रस्त्यावर स्थलांतरित झाले.

मोर्चामध्ये समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव व त्यांचे इतर नेते, राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार) सुप्रिया सुळे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)चे संजय राऊत, तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा, , भाकपचे महासचिव डी. राजा, माकपचे महासचिव एम. ए. बेबी यांच्यासह काँग्रेसचे मुख्यमंत्रीही सहभागी झाले होते. अखिलेश यादव व तेजस्वी यादव तसेच, संजय राऊत हेही सहभागी झाल्याने इंडिया आघाडीतील कथित मतभेदाची चर्चा निकालात निघाली.

इंडिया आघाडीतील ऐक्य

इंडिया आघाडीच्या वतीने दोन दिवसांपूर्वी सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या भेटीची वेळ मागितली होती. मात्र, न्यायालयात सनदशीर मार्गाने या, असे कळवत सरन्यायाधीशांनी भेटण्यास नकार दिला. मतचोरीसंदर्भातील याचिकांवर सर्वोच्च न्यायालयामध्ये सुनावणी होत असून तुम्हाला ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात याचिका दाखल करता येईल. तुम्ही याचिका दाखल करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात येऊ शकता, असे सरन्यायाधीशांनी कळवले असल्याचा दावा राहुल गांधींनी सोमवारी मोर्चापूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये केला.

लोकांची दिवाळी 'गोड' होणार!

FDA मधून बदली नाही

मुंबई : (स. गांवकरी)

- भेसळयुक्त अन्न, औषधांविरोधात लढाई सुरूच; MPSC मध्ये बदलीच्या चर्चेवर तुकाराम मुंढेंची पोस्ट



अन्नाच्या भेसळविरोधात मोर्चा उघडणारे धडाडीचे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढेंच्या ताज्या सोशल मीडिया पोस्टमुळे दसरा-दिवाळीच्या तोंडावर राज्यातल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. आपली बदली झाली नसून आपण एफडीए विभागातच कार्यरत असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. तसेच अन्नाच्या भेसळीविरोधात आपली लढाई सुरूच राहील असंही मुंढे यांनी म्हटलं आहे. त्यामुळे सणासुदीच्या काळात लोकांना किमान सुरक्षित अन्न मिळण्याच्या हमीची शक्यता आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील पेपरफुटीविरोधात आणि अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्यासाठी पुण्यामध्ये जवळपास 11 दिवस विद्यार्थ्यांनी आंदोलन पुकारलं होतं. सोमवारी (12 ऑक्टोबर) मध्यरात्रीच्या सुमारास मंत्री शिवेंद्रराजे यांच्या शिष्टाईमुळे हे आंदोलन मागे घेण्यात आलं. एमपीएससीमध्ये झालेल्या गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी सरकारने एक चौकशी समिती नेमली आहे. या चौकशी समितीच्या सचिवपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या घोषणेनंतर काहीकाळ संभ्रमाचं वातावरण निर्माण झाल्याचं दिसून आलं. एमपीएससीच्या सचिवपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती झाल्याच्या बातम्या पसरल्या. त्यानंतर अन्न आणि औषध विभागाचं काय होणार? राज्यातील अन्नाच्या भेसळीविरोधातील लढाईचं काय होणार? तुकाराम मुंढेंच्या बदलीनंतर ही लढाई कायम राहणार का? असे अनेक प्रश्न विचारण्यात येऊ लागले. मात्र, तुकाराम मुंढे यांची बदली झाली नाही, त्यांनी फक्त एमपीएसएसीच्या चौकशी समितीच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे असं सरकारने स्पष्ट केलं. त्यानंतर आता खुद्द तुकाराम मुंढे यांनीच सोशल मीडियावर एक पोस्ट लिहून त्यावर स्पष्टीकरण दिलं आहे.

'सोमेश्वर'वर राष्ट्रवादीचे एकछत्री वर्चस्व!

बारामती : (स. गांवकरी)



- सुनेत्रा पवारांच्या पॅनेलचा 21-0 ने विजय; विरोधकांचे मनसुबे धुळीस

बारामती तालुक्यातील अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील 'श्री सोमेश्वर विकासपुरुष अजितदादा पवार पॅनेल'ने दणदणीत विजय मिळवला आहे. विरोधकांचे सर्व मनसुबे उधळून लावत सुनेत्रा पवारांच्या पॅनेलने 21 पैकी 21 जागांवर बाजी मारत कारखान्यावर आपले एकछत्री वर्चस्व कायम ठेवले आहे. रविवारी पार पडलेल्या 84 टक्के मतदानानंतर सोमवारी मतमोजणी झाली. त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि राष्ट्रवादीतून बंडखोरी केलेले पुरुषोत्तम जगताप या दोन्ही विरोधी पॅनेलचे पूर्णपणे पानिपत झाले. कारखान्यावरील ऐतिहासिक विजयानंतर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार अत्यंत भावूक झाल्या. त्या म्हणाल्या की, "आदरणीय स्व. अजितदादांनी तब्बल 34 वर्षे सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या विकासासाठी आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी आपले योगदान दिले. कारखान्याशी त्यांचे असलेले जिव्हाळ्याचे नाते आणि जपलेला सहकार वारसा यांची या विजयाच्या निमित्ताने आठवण होत आहे. हा विजय स्व. अजितदादांच्या कार्याला समर्पित आहे."

रामलिला मैदानाच्या एका दिवसाच्या बुकिंगसाठी 'इतके' लाख रुपये खर्च

फक्त 3 दिवसच मैदान मोकळे



नवी दिल्ली : (स. गांवकरी)

दिल्ली पोलीस आयुक्तांनी 11 ऑक्टोबर रोजी जारी केलेल्या नवीन आदेशानुसार जंतर-मंतरवर आंदोलनांना पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. त्याऐवजी रामलीला मैदान, बुराडी मैदान आणि पूर्व दिल्लीतील सीबीडी मैदान हे आंदोलनासाठी नवे पर्याय म्हणून निश्चित करण्यात आले आहेत. मात्र, रामलीला मैदानावर आंदोलन किंवा जाहीर सभा घेणे आता अत्यंत खर्चीक आणि कठीण झाले आहे. आगामी दसरा आणि दिवाळीसारख्या सणांमुळे पुढील अडीच महिने हे मैदान पूर्णपणे बुक झाले असून, वर्षभरात केवळ 29, 30 आणि 31 डिसेंबर हे तीनच दिवस बुकिंगसाठी रिकामे आहेत.

महानगरपालिकेच्या बागवानी विभागाद्वारे चालवल्या जाणाऱ्या या 12 एकराच्या मैदानात सुमारे 50 हजार लोक एकत्र येऊ शकतात. मात्र, यासाठी लागणाऱ्या भाड्याने आंदोलकांचे कंबरडे मोडण्याची शक्यता आहे. रामलीला मैदानाचा प्रतिदिन बुकिंग चार्ज 50,000 रुपये आहे, तर 55,000 रुपये अनामत रक्कम (Security Deposit) म्हणून जमा करावी लागते. त्यावर लागणाऱ्या वेगवेगळ्या करांसह एका दिवसाच्या बुकिंगचा प्राथमिक खर्च हा थेट 1.21 लाख रुपये येतो.

महापालिका अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, मैदानातील एक अत्यंत लहान भाग आंदोलनासाठी मोफत उपलब्ध आहे, मात्र तिथे एकावेळी केवळ 150 लोकांनाच जमण्याची परवानगी आहे. त्यासाठी ऑनलाइन अर्जाला महापालिकेकडून मंजुरी मिळण्यापूर्वी दिल्ली पोलिसांचे ना हरकत प्रमाणपत्र (NOC) घेणे बंधनकारक आहे. रामलीला मैदानाची इतिहास आणि निर्मिती अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. 1930 पर्यंत हे मैदान एक मोठा तलाव होते. ते बुजवून सपाट करण्यात आले आणि 1932 पासून तिथे रामलीला सादरीकरण सुरू झाले, ज्यावरून या मैदानाला 'रामलीला मैदान' हे नाव मिळाले.

1952 मध्ये भारतीय जनसंघाचे संस्थापक श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी येथूनच सत्याग्रह सुरू केला होता. 1956-57 मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांनी येथे भव्य सभांना संबोधित केले. सन 1962 मध्ये ब्रिटनच्या राणी एलिझाबेथ द्वितीय यांच्या स्वागतासाठी येथे कायमस्वरूपी व्यासपीठ उभारण्यात आले. 1971 च्या पाकिस्तानवरील विजयानिमित्त इंदिरा गांधी यांची सभा, 1975 मधील आणीबाणीच्या दिवशी जयप्रकाश नारायण व अटलबिहारी वाजपेयी यांची क्रांती सभा आणि 2013 मध्ये अरविंद केजरीवाल यांचा मुख्यमंत्रिपदाचा शपथविधी याच मैदानावर पार पडला होता.

जंतर-मंतरवर मोफत आंदोलन करणाऱ्या संघटनांसाठी रामलीला मैदानाचे भरमसाठ शुल्क आणि कडक नियम यामुळे आंदोलनाचा मार्ग कठीण झाला आहे.

चिमुकल्या बाळाचे अपहरण करुन विक्री

महिलांची टोळी अटकेत, गुजरातला नेणार असल्याचं तपासातून समोर



ठाणे : (स. गांवकरी)

लहान मुलांचे अपहरण करुन त्यांची विक्री करणाऱ्या टोळीचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. अंबरनाथमधून विक्री करण्यासाठी अपहरण केलेल्या 25 दिवसाच्या बालकाचा शोध पोलिसांनी लावला. तांत्रिक तपासाच्या आधारे अवघ्या चार तासात पोलिसांनी चार आरोपी महिलांना जेरबंद करून 25 दिवसाच्या बालकाला आई-वडिलांच्या स्वाधीन केले. मात्र, या घटनेमुळे पुन्हा एकदा लहान मुलांच्या तस्करीचे रॅकेट आणि चिमुकल्यांच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. अंबरनाथमधील सदरील घटना ही दोन दिवसांपूर्वी घडली होती. मुलाचे अपहरण झाल्यानंतर आई-वडिलांसह नातेवाईकांनी या बालकाचा शोध घेतला. परंतु नवजात बाळ सापडून न आल्यानं अखेर आई-वडिलांनी पोलीस ठाणे गाठले. याच तक्रारीवरून पोलिसांनी प्रकरणाचा छडा लावत महिला आरोपींना ताब्यात घेतलं. संतोष वाघे यांचे नवजात बाळ एका मुक्या महिलेने हिसकाहून पळ काढला होता. आई-वडिलांनी या बालकाचा शोध घेतला मात्र ते आढळून आले नाही. धक्कादायक बाब म्हणजे सदरील बाळ हे एका महिलेला विक्री देखील करण्यात आले होते. परंतु, तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी उल्हासनगर ते अंबरनाथ मार्गावर शोध घेतला. त्यावेळी, अंबरनाथ रेल्वे स्थानकावरुन सदरील बाळाला महिलेकडून ताब्यात घेण्यात आले. या घटनेनंतर पोलिसांनी अधिक तपास सुरू केला आहे. दरम्यान, अटक केलेल्या महिलांची मुले चोरण्याची टोळी आहे का? याचा देखील तपास पोलिसांकडून केला जातोय. दरम्यान चोरी केलेले बाळ हे गुजरातला पाठविले जाणार होते, अशी माहिती पोलीस तपासात उघड झाली. त्यामुळे या टोळीचे गुजरात कनेक्शन नेमकं काय याचा देखील तपास केला जातोय. मात्र, या घटनेमुळे लहान मुलांच्या सुरक्षेसाठी पालकांनी देखील अधिक खबरदारी घेण्याची गरज व्यक्त होत आहे. डोंबिवलीतील शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक रमेश म्हात्रे यांच्या मारहाणीचे प्रकरण ताजे असताना भाजपा पदाधिकाऱ्याकडून डंपिंग ग्राउंड कर्मचाऱ्याला भाजपा आमदार सुलभा गायकवाड समोरच मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. कल्याण पश्चिमेतील उंबर्डा डम्पिंग ग्राउंडची भाजप आमदार सुलभा गायकवाड यांच्याकडून पाहणी दौरा दरम्यान राडा झाला.

कर्मचाऱ्यांकडे ओळखपत्रे नसल्याने आमदारांसह भाजप पदाधिकारी संतापले. त्यानंतर, डम्पिंग ग्राउंडवरील सुपरवायझर किरण रसाळ यांच्यावर संताप केला व्यक्त, भाजप जिल्हा उपाध्यक्ष विजय जोशी यांच्याकडून सुपरवायझर किरण रसाळला शिवीगाळ करत मारहाण करम्यात आली. यावेळी, सुपरवायझर दारूच्या नशेत असल्याचा सांगत विजय जोशी यांच्याकडून आरोप करत ही मारहाण झाली.

ताडीच्या अतिसेवनाने आतापर्यंत तिसरा बळी

मुंबई : (स. गांवकरी)

- २६ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी अंत, कुटुंबीय आक्रमक

मुंबईच्या अंधेरी पूर्वेत एमआयडीसी परिसरात धक्कादायक घटना घडली आहे. एका 26 वर्षाच्या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ताडीच्या अतिसेवनाने मृत्यू झाल्याचं सांगण्यात येत आहे. तर ही ताडी विषारी असल्याचा आरोप कुटुंबियांनी केला आहे. बब्रुवान दुर्गे असं मृत तरुणाचे नाव आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सुभाष नगर येथील ताडी माडी केंद्रावर ही धक्कादायक घटना घडली आहे. ताडीच्या अतिसेवनामुळे तिसरा बळी गेल्याचा आरोप केला आहे. दरम्यान, वैद्यकीय अहवालाकडे सर्वांते लक्ष लागले आहे. यातून नेमकी काय माहिती येणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

दुपारी ताडी पिण्यासाठी गेलेल्या बब्रुवान दुर्गे या 26 वर्षे तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ताडीच्या अतिसेवनामुळं मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. एमआयडीसी परिसरात ताडी पिऊन मृत्यू होण्याची ही तिसरी घटना असल्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी आमदार मुरजी पटेल यांनी ताडी विक्रेत्यावर कठोर कारवाई करण्याची पोलिसांकडे केली मागणी केली आहे. कुटुंबीयांनी मृत तरुणाचा पार्थिव एमआयडीसी पोलीस ठाण्यासमोर आणून आंदोलन केले आहे. ताडी विक्रेत्यावर जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत अंत्यसंस्कार करणार नसल्याची कुटुंबीयांची भूमिका. या प्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी मृत तरुणाचे मृतदेहाचे शवविच्छेदन कूपर रुग्णालयात केले आहे. शवविच्छेदन अहवाल आणि फॉरेन्सिक केमिकल रिपोर्ट आल्यानंतर गुन्हा दाखल करून एमआयडीसी पोलीस कारवाई करणार आहेत. आमदार मुरजी पटेल आणि पोलिसांच्या मदतीने कुटुंबीयांची समजूत काढून मृत तरुणावर अंत्यसंस्कार केले आहेत. दरम्यान, या घटनेमुळं खळबळ उडाली आहे. ताडीमुळेच मृत्यू झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. डी विक्रेत्यावर जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत अंत्यसंस्कार करणार नसल्याची कुटुंबीयांना भूमिका घेतली आहे. काल रात्री 8 वाजता 26 वर्षाच्या तरुण ताडी माडी केंद्रात ताडी प्यायला गेला होता. मात्र ताडी पिल्यानंतर तिथेच चक्कर येऊन मृत्यू झाला.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी संपादकीय



डॉ. विश्वासराव आरोटे
संपादक - दै. समर्थ गांवकरी

संघर्ष, राष्ट्रसेवेचा महत्त्वाचा अध्याय



राजकारणात पदे मिळवणारे अनेक असतात; पण स्वतःच्या विचारांनी आणि कार्याने स्वतंत्र ओळख निर्माण करणारे मोजकेच. राजमाता विजयाराजे शिंदे या अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक. ग्वाल्हेरच्या राजघराण्याची महाराणी ते भारतीय जनसंघ आणि भारतीय जनता पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या हा त्यांचा प्रवास केवळ सत्तेच्या राजकारणाची कथा नाही. वैचारिक निष्ठा, संघर्ष आणि सार्वजनिक जीवनातील बांधिलकीचा तो इतिहास आहे.

१२ ऑक्टोबर १९१९ रोजी मध्य प्रदेशातील सागर येथे जन्मलेल्या राजमातांचे मूळ नाव लेखा दिव्येश्वरी देवी. १९४१ मध्ये ग्वाल्हेरचे महाराज जीवाजीराव शिंदे यांच्याशी विवाह झाल्यानंतर त्या ग्वाल्हेरच्या महाराणी बनल्या. मात्र, त्यांचे आयुष्य राजमहालाच्या चौकटीत अडकून राहिले नाही. १९६१ मध्ये पतीच्या निधनानंतर कौटुंबिक जबाबदाऱ्यांसह आयुष्याला नव्याने सामोरे जाण्याचे आव्हान त्यांच्यापुढे उभे राहिले. त्यांनी या परिस्थितीला 'मर्यादा' बनू न देता सार्वजनिक जीवनात स्वतःची भूमिका निश्चित केली. राजघराण्याची प्रतिष्ठा ही त्यांची ओळख होती; पण राजकारणात त्यांनी स्वतःच्या विचारांच्या बळावर स्थान निर्माण केले.

१९५७ मध्ये गुना लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसच्या उमेदवार म्हणून निवडून येत त्यांनी संसदीय राजकारणात प्रवेश केला. १९६२ मध्ये त्या ग्वाल्हेरमधून लोकसभेवर निवडून गेल्या. पुढे काँग्रेसशी वैचारिक मतभेद झाल्यानंतर त्यांनी भारतीय जनसंघाचा मार्ग स्वीकारला. हा केवळ पक्षबदल नव्हता, तर आपल्या राजकीय भूमिकेनुसार स्वतंत्र मार्ग निवडण्याचा निर्णय होता.

काँग्रेसचे वर्चस्व असलेल्या काळात विरोधी राजकारणाला बळ देण्यात राजमातांनी महत्त्वाची भूमिका बजावली. १९६७ मध्ये त्या मध्य प्रदेश विधानसभेवर निवडून गेल्या. भारतीय जनसंघाच्या विस्तारासाठी त्यांनी आपली सामाजिक प्रतिष्ठा, राजकीय अनुभव आणि जनसंपर्क यांचा उपयोग केला. १९८० मध्ये भारतीय जनता पक्षाची स्थापना झाल्यानंतर उपाध्यक्ष म्हणून त्यांनी संघटनात्मक जबाबदारी सांभाळली. २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी लागू झाली. नागरिकांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध आले आणि अनेक विरोधी नेत्यांना तुरुंगात डांबण्यात आले. राजमाता विजयाराजे शिंदे यांनाही अटक करून तिहार तुरुंगात ठेवण्यात आले. राजवैभवाच्या वातावरणातून आलेल्या व्यक्तीला तुरुंगवासाचे आव्हान स्वीकारणे सोपे नव्हते. मात्र, हा प्रसंग त्यांच्या राजकीय जीवनातील संघर्षाचा महत्त्वाचा भाग ठरला.

राजमातांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू शिक्षणाशी संबंधित होता. ग्वाल्हेर येथील सिंधिया कन्या विद्यालयाच्या संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी योगदान दिले. बालिका शिक्षण आणि महिला सक्षमीकरणाबद्दल त्यांना विशेष आस्था होती. शिशू मंदिराच्या स्थापनेशीही त्या संबंधित होत्या.

ग्वाल्हेरच्या सामाजिक आणि राजकीय जीवनाशी त्यांचे नाते घट्ट होते. राजघराण्याचा ऐतिहासिक वारसा आणि लोकशाहीतील लोकप्रतिनिधित्व यांचा संगम त्यांच्या जीवनात दिसतो. त्यांनी हा वारसा केवळ प्रतिष्ठेपुरता न ठेवता सार्वजनिक जीवनाशी जोडला. राजमाता विजयाराजे शिंदे यांचे जीवन आजच्या राजकारणापुढे काही मूलभूत प्रश्न उभे करते. विचारधारेचे स्थान काय? सार्वजनिक पद हा अधिकार आहे की जबाबदारी? प्रतिकूल परिस्थितीत तत्त्वनिष्ठा कशी टिकवायची आणि सामाजिक प्रतिष्ठेचा उपयोग जनहितासाठी कसा करायचा?

त्यांच्या विचारधारेशी सहमत असणे किंवा असहमत असणे हा लोकशाही चर्चेचा भाग आहे. मात्र, त्यांच्या राजकीय संघर्षाचा, संघटनात्मक योगदानाचा आणि सार्वजनिक कार्याचा अभ्यास पूर्वग्रहांऐवजी ऐतिहासिक तथ्यांच्या आधारे होणे आवश्यक आहे. २५ जानेवारी २००१ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांचे आत्मचरित्र 'राजपथ से लोकपथ' त्यांच्या जीवनाचा आणि राजकीय अनुभवांचा महत्त्वाचा दस्तऐवज आहे. राजपथापासून लोकपथापर्यंतचा त्यांचा प्रवास हा भारतीय राजकारणातील संघर्ष, वैचारिक दृढता आणि राष्ट्रसेवेचा महत्त्वपूर्ण अध्याय म्हणून स्मरणात राहील.

थोडक्यात पण महत्वाचे



संत ज्ञानेश्वर विद्यालयात विद्यार्थी गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न

- एन. के. टी. ट्रस्टतर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप!

वाहेगाव साळ, ता. चांदवड, जि. नाशिक (स. गांवकरी) : येथील संत ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ९ ऑक्टोबर २०२६ रोजी विद्यार्थी गुणगौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाला दानशूर समाजसेवक शेठ नानजीभाई खीमजीभाई ठक्कर (ठाणावाला), महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, विद्यालयातील शिक्षकवृंद, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा या वेळी गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच क्रीडा आणि इतर क्षेत्रांतही आपले कौशल्य विकसित करावे, असे आवाहन शेठ नानजीभाई ठक्कर यांनी केले. विद्यार्थ्यांनी जीवनात मोठे ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी मेहनत, जिद्द, चिकाटी आणि शिस्तीच्या जोरावर सातत्याने प्रयत्न करावेत. अपयश आले तरी खचून न जाता त्यातून शिकून पुन्हा नव्या जोमाने पुढे जावे. आई-वडील, शिक्षक व गुरूजनांचा आदर राखत चांगले संस्कार जोपासावेत आणि आपल्या शाळेचे, गावाचे व समाजाचे नाव उज्ज्वल करावे, असे मार्गदर्शन त्यांनी केले. गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून इतर विद्यार्थ्यांनीही त्यांच्या यशापासून प्रेरणा घ्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी शेठ नानजीभाई ठक्कर यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच एन. के. टी. ट्रस्टतर्फे विद्यार्थ्यांना गीतासार, वह्या व पेनचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध होण्याबरोबरच शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळाले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा हा गुणगौरव सोहळा उत्साहात पार पडला.

३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याचे नियोजन



सोलापूर (स. गांवकरी) : अल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे पर्जन्यमानात घट होण्याची शक्यता लक्षात घेऊन सोलापूर जिल्ह्यातील उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले आहेत. जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याची गरज सुरक्षित ठेवण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी १६ ऑक्टोबर २०२६ पासून पाणीवापरात १० टक्के कपात करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये खरीप हंगाम २०२६ साठी दुष्काळ जाहीर करण्यात आला असून, त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा समावेश आहे. संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जलसंपदा विभागाने ५ ऑक्टोबर रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्यानुसार धरणनिहाय आणि वापरनिहाय जलसाठ्याचे सूक्ष्म नियोजन करण्यात येणार आहे. जलसाठ्याचे नियोजन करताना पिण्याच्या पाण्याची गरज, बाष्पीभवन आणि धरणांमधील गाळ आदी बाबी विचारात घेतल्या जाणार आहेत. तसेच प्रत्येक प्रमुख जलाशयातील उपलब्ध जिवंत पाणीसाठ्यापैकी किमान १० टक्के साठा राखीव ठेवण्यात येणार आहे. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती आणि ग्रामपंचायतींनी पाणीगळती रोखण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, असे निर्देश आहेत.


अक्कलकोट ते तडवळ सुसाट - विकासकामांना वेग



अक्कलकोट (स. गांवकरी) : एककाळी वीज, पाणी आणि रस्त्यासारख्या मूलभूत सुविधांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणाऱ्या तडवळ भागातील जनतेच्या प्रश्नांना आता हळूहळू मार्ग मिळत आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पाठपुराव्यामुळे या परिसरातील रस्ते विकासाला गती मिळाली असून, अनेक गावांना पक्क्या रस्त्यांनी जोडणी मिळाली आहे. त्यामुळे तडवळ भागातील दळणवळणाचे चित्र बदलू लागले आहे. पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आल्यानंतर सचिन कल्याणशेट्टी यांनी तडवळ भागातील जनतेशी कृतज्ञता व्यक्त केली. अक्कलकोट-तडवळ हा या परिसरातील दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा मार्ग आहे. काही वर्षांपूर्वी या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत होता. रस्त्याची दुरवस्था झाल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता. आमदार कल्याणशेट्टी यांच्या प्रयत्नातून या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे वाहतुकीला मोठी गती मिळाली आहे. एसटी बस, अवजड वाहने, चारचाकी, दुचाकी आणि रिक्षांचा प्रवास अधिक सुलभ झाला आहे. तडवळ भागात केवळ मुख्य रस्त्यांचाच नव्हे, तर गावांना जोडणाऱ्या अंतर्गत व जोडरस्त्यांचाही विकास होत आहे. अक्कलकोट-जेऊर-तडवळ रस्ता सिमेंट कॉंक्रिटीकरण पूर्ण करण्यात आले. तडवळ-भुमान, कुमान-केमाप, चिंचोळी-केशाप-तडवळ, सुंदरेवाडी-तडवळ आणि सुलेरवाडी-गामसलगाव या मार्गांमुळे परिसरातील गावांच्या संपर्काला बळ मिळाले आहे.

पहिल्यांदाच आढळले दुर्मिळ 'चांदी अस्वल' (हनी बॅजर) !

रावेर : (स. गांवकरी)



तालुक्यातील पाल वन्यजीव वनपरिक्षेत्रातील गारबर्डी परिमंडळाच्या परिसरात अत्यंत दुर्मिळ 'हनी बॅजर' अर्थात 'चांदी अस्वल' या वन्यप्राण्याची ट्रॅप कॅमेऱ्यात नोंद झाली आहे. वनविभागाने लावण्यात आलेल्या कॅमेरा ९ अ आणि ९ बी या कॅमेऱ्यांमध्ये नुकतीच काही दिवसापुर्वी वन्यप्राण्याचे छायाचित्र टिपले गेले. यामुळे वन्यजीव अभ्यासाच्या दृष्टीने या नोंदीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. हनी बॅजर हा प्रामुख्याने निशाचर असून त्याचे प्रत्यक्ष दर्शन अत्यंत दुर्मिळ असते. हा वन्यप्राणी अत्यंत चपळ, निर्भीड असून ,सहसा सहज नजरेत पडत नाही. हनी बॅजरला महाराष्ट्रात 'चांदी अस्वल' म्हणूनही ओळखले जाते, हा अस्वल जळगाव जिल्ह्यात पहिल्यांदाच आढळला आहे. हनी बॅजरला रॅटेल या नावानेही ओळखले जाते. जंगलात त्याचा वावर असला तरी प्रत्यक्ष दर्शन अत्यंत दुर्मिळ असते. प्रामुख्याने रात्री सक्रिय राहणारा हा वन्यप्राणी दाट जंगल, बिळे आणि कपाऱ्यांच्या परिसरात वावरत असल्याने सहसा नजरेत पडत नाही. त्यामुळे वन्यजीवांच्या हालचाली टिपण्यासाठी लावण्यात आलेल्या कॅमेरा ट्रॅपमध्ये त्याची नोंद होणे विशेष महत्त्वाचे मानले जाते. आकाराने लहान असला तरी हनी बॅजर निर्भीड आणि आक्रमक स्वभावासाठी प्रसिद्ध आहे. मजबूत शरीररचना, जाड कातडी आणि प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहण्याची क्षमता ही त्याची वैशिष्ट्ये आहेत. कीटक, लहान प्राणी, सरडे, पाली, कासव, साप तसेच मृत प्राण्यांचे मांस तो खातो. "पाल वन्यजीव क्षेत्रातील कक्ष क्रमांक ३९ मध्ये ट्रॅप कॅमेऱ्यात हनी बॅजर अर्थात चांदी अस्वलची झालेली नोंद ही अत्यंत आश्चर्यजनक आणि दुर्मिळ बाब आहे. ही पालच्या समृद्ध जैवविविधतेच्या दृष्टीनेही महत्वपूर्ण नोंद आहे."

आंबेगावच्या पश्चिम आदिवासी भागात दुष्काळाचे सावट

- दिलीप वळसे पाटील थेट शेतकऱ्यांच्या बांधावर
- २८ गावांतील शेतशिवारांची पाहणी
- भातपिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश
- पाणीटंचाईग्रस्त वाड्या-वस्त्यांसाठी टँकरचे प्रस्ताव तयार करण्याच्या अधिकाऱ्यांना सूचना

मंचर : (स. गांवकरी)



आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागात पावसाने ओढ दिल्याने भातशेतीवर दुष्काळाचे गंभीर संकट ओढवले आहे. ऐन हंगामात पावसाचा खंड पडल्याने भातपिके करपण्याच्या मार्गावर असून, वर्षभराच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. या पार्श्वभूमीवर आंबेगाव-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी रविवारी (दि. ११) पश्चिम आदिवासी भागातील २८ गावांचा पाहणी दौरा करून दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त पिकांची पाहणी केली. तसेच शेतकरी, महिला व ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.

आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यातील बोरघर, फुलवडे, अडिवरे, पंचाळे, माळीण, असाणे, वचपे, दिगद, आमडे, तिरपाड, कोंढरे, भोईरवाडी, आहुपे, पिंपरगणे, डोण, न्हावेड, नानवडे, जांभोरी, कुशिरे, पाटण, तळेघर, राजपूर, फलोदे, निगडाळे, कोंढवळ, पोखरी, बेंढारवाडी आणि राजेवाडी या गावांचा दौऱ्यात समावेश होता.

आंबेगावच्या पश्चिम आदिवासी भागातील बहुतांश शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह भातशेतीवर अवलंबून आहे. मात्र, यंदा पावसाने ऐन गरजेच्या काळात दडी मारल्याने भातपिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी पाण्याअभावी पिके सुकू लागली असून, उत्पादनात मोठी घट होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. वर्षभर काबाडकष्ट करून उभे केलेले पीक हातातून जाण्याची परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. या दौऱ्यादरम्यान वळसे पाटील यांनी शेतशिवारात जाऊन भातपिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. पावसाअभावी झालेल्या नुकसानीची माहिती शेतकऱ्यांकडून घेतली. शेतकऱ्यांनी पीक नुकसानीबरोबरच पिण्याच्या पाण्याची टंचाई, शेतीसाठी पाण्याची अनुपलब्धता आणि आगामी काळातील संभाव्य संकटाबाबत आपल्या अडचणी मांडल्या. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी तातडीने पंचनामे करा दुष्काळामुळे नुकसान झालेल्या भातपिकांचे कृषी व महसूल विभागाने तातडीने पंचनामे करावेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या नियमानुसार मदत मिळण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करावी, अशा स्पष्ट सूचना वळसे पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. शेतकऱ्यांच्या अडचणींची गांभीर्याने दखल घेऊन प्रशासकीय स्तरावर तातडीने उपाययोजना करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. पश्चिम आदिवासी भागातील काही दुर्गम वाड्या-वस्त्यांवर पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. आगामी काळात परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने आतापासूनच नियोजन करावे. पाणीटंचाई असलेल्या गावांसाठी आणि वाड्या-वस्त्यांसाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे प्रस्ताव तातडीने तयार करावेत. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी हालअपेष्टा सहन कराव्या लागू नयेत, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना वळसे पाटील यांनी दिल्या.

सह्याद्री व्हॅली कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये

भव्य रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न

आळेफाटा : (स. गांवकरी)



महारीया चॅरिटेबल ट्रस्टच्या सह्याद्री व्हॅली कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (राजुरी, ता. जुन्नर) येथे भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय तसेच ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन (AICTE) यांच्या मान्यतेने 'राष्ट्रीय ऐच्छिक रक्तदान दिन २०२६' निमित्त शुक्रवार, ०९ ऑक्टोबर २०२६ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

हे शिबिर महारीया चॅरिटेबल ट्रस्टचे खजिनदार मा. सचिन चव्हाण यांच्या शुभहस्ते पार पडले. या प्रसंगी संतोष अंगोळकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच जनकल्याण रक्तपेढी, पुणे चे डॉ. निशांत साबळे आणि त्यांच्या टीमने वैद्यकीय सेवा व सहकार्य प्रदान केले. विद्यालयाच्या अॅकडमी अधिष्ठाता पी मा. प्रा. पी. बालारामडू यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आयोजन कार्यक्रम अधिकारी प्रा. वैभव नांगरे सर, प्रा. साळवे, आणि प्रा. नलावडे यांनी केले. या शिबिराला सर्व विभागांचे प्रमुख - प्रा. भागवत, मनोज कुमार, रेड्डी सर, शेळके सर, आणि औटी सर यांची विशेष उपस्थिती लाभली.

यावेळी जनकल्याण रक्तपेढीच्या डॉ साबळे यांनी उपस्थितांना रक्तदानाचे फायदे समजावून सांगितले. नियमित रक्तदान केल्याने शरीरात नवीन रक्तपेशी तयार होतात, हृदयाचे आरोग्य सुधारते आणि रक्ताभिसरण प्रक्रिया सुरळीत राहते. तसेच एका व्यक्तीच्या रक्तामुळे ४ जणांचे प्राण वाचू शकतात.

जनकल्याण रक्तपेढी, पुणे ही संस्था नियमितपणे थॅलेसेमिया (Thalassemia) ग्रस्त बालकांना व रुग्णांना आवश्यक असणारे रक्त मोफत/सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध आहे. या शिबिरात जमा झालेले रक्त थॅलेसेमियाने ग्रस्त रुग्णांचे जीवन वाचवण्यासाठी अत्यंत मोलाचे ठरणार आहे. या सामाजिक उपक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभागी होऊन मोठ्या प्रमाणावर रक्तदान केले आणि शिबिर यशस्वी केले.

DGVCL च्या कारभाराविरोधात नागरिकांचा संताप

डांग : (स. गांवकरी)

- दररोज रात्री वीजपुरवठा खंडित

डांग जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या सापुतारा तसेच परिसरातील ग्रामीण भागात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने स्थानिक रहिवासी आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. दक्षिण गुजरात वीज कंपनी लिमिटेड (DGVCL) अर्थात वीज विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असून, विशेषतः दररोज संध्याकाळी आणि रात्री कोणतीही पूर्वसूचना न देता वीज गायब होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. सापुतारा आणि परिसरातील गावांमध्ये वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. संध्याकाळच्या वेळी वीज बंद पडल्याने घरगुती कामे, विद्यार्थ्यांचा अभ्यास, लहान व्यावसायिकांचे व्यवसाय तसेच दैनंदिन कामकाजावर परिणाम होत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. पावसाळ्यात तसेच उन्हाळ्यातही वीजपुरवठ्यातील अनियमिततेमुळे नागरिकांच्या अडचणी वाढत आहेत. प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या सापुताऱ्यात अशा प्रकारे वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने स्थानिक रहिवासी, व्यापारी आणि पर्यटन व्यवसायाशी संबंधित नागरिकांनाही त्रास सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर सापुतारा वीज विभागाच्या अधिकृत तक्रार क्रमांकावर संपर्क साधला जातो. मात्र, काही कर्मचाऱ्यांकडून समाधानकारक उत्तर मिळत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

'मिशन भरारी' उपक्रमाला सामाजिक दातृत्वाची साथ

डोहोळे ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे यांचा स्तुत्य उपक्रम

भिवंडी : (स. गांवकरी)



जिल्हा परिषद ठाणे, शिक्षण विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसाठी 'मिशन भरारी – शिष्यवृत्ती सराव चाचणी २०२६-२७' हा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. या अभियानाला अधिक बळ देत ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथील ग्रामपंचायत अधिकारी परेश कांचन सोनावणे यांनी आपल्या आजी, लाडक्या 'बय' स्व. हिराबाई दुदाजी सोनावणे यांच्या स्मरणार्थ विद्यार्थ्यांना मोफत पुस्तक संचांचे वाटप करून एक नवा आदर्श निर्माण केला आहे. 'मिशन भरारी' या उपक्रमांतर्गत कोशिंबी केंद्रातील जवळपास १० शाळा आणि पडघा केंद्रातील ०२ शाळांमधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसाठी मदत व्हावी, या उद्देशाने पुस्तक संचांचे वितरण करण्यात आले. यामध्ये इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी पहिली ते चौथीच्या पायाभूत अभ्यासासाठी, तसेच इयत्ता सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी मिळून जवळपास ३५ हजार रुपये मूल्याचे पुस्तक संच मोफत वितरित करण्यात आले.

परेश सोनावणे यांनी सामाजिक दातृत्वाची भावना जपत यापूर्वीही अनेक शैक्षणिक उपक्रमांना हातभार लावला आहे. आपल्या आजींच्या स्मरणार्थ त्यांनी डोहोळेपाडा जिल्हा परिषद शाळेतील ग्रंथालयासाठी २५ हजार रुपये रोख रक्कम तसेच इतर शैक्षणिक साहित्याची मदत केली होती. कांदली कातकरीवाडी येथील शाळेतील विद्यार्थ्यांना बसण्यासाठी दोन टेबल उपलब्ध करून दिले. तसेच, स्वतःच्या पुढाकाराने आणि कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने लोकवर्गणी गोळा करून कळंबोली जिल्हा परिषद शाळेला दूरचित्रवाणी संच उपलब्ध करून दिला. डोहोळे ग्रामपंचायतीमध्ये रुजू झाल्यापासून परेश सोनावणे यांनी आपल्या उत्कृष्ट प्रशासकीय कामाचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या कार्यकाळात गटविकास अधिकारी गोविंद खामकर आणि विस्तार अधिकारी सुधाकर सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच ग्रामस्थ, ग्रामपंचायत कमिटी आणि ग्रामपंचायत व ग्रामस्तरीय कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने ग्रामपंचायतीला अनेक प्रतिष्ठित पुरस्कार मिळाले आहेत. परेश सोनावणे यांनाही 'आदर्श ग्रामपंचायत अधिकारी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. नुकतीच ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत एल. पुलकुंडवार यांनी डोहोळे ग्रामपंचायतीला प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे यांच्या कामाची पद्धत आणि कामाप्रती असलेली आत्मीयता पाहून त्यांनी सोनावणे यांचा विशेष सत्कार करून गौरव केला.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव (भा.प्र.से.) आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या 'मिशन भरारी' अभियानात परेश सोनावणे यांनी दिलेले हे वैयक्तिक योगदान प्रेरणादायी ठरत आहे.

'सेवा संकल्प अभियानात याहून वेगळी आणि उत्तम सेवा कोणती असू शकते?' असा प्रश्न उपस्थित करत परिसरातील नागरिक, शिक्षक आणि पालकांनी परेश सोनावणे यांच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले आहे. प्रशासकीय सेवेत कार्यरत असतानाही समाजाप्रती असलेली बांधिलकी त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केली आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



कळसुबाई शिखराला साज; पाच दिवसांच्या मेहनतीने मंदिर परिसर उजळला!


- नवरात्रोत्सवानिमित्त उत्साहात घटस्थापना; आदिवासी संस्कृतीचे चित्रांतून जिवंत दर्शन!

कळसुबाई (स. गांवकरी) : महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर आणि आदिवासी बांधवांचे श्रद्धास्थान असलेल्या आई कळसुआईच्या मंदिराला नवरात्रोत्सवानिमित्त आकर्षक वारली चित्रकलेचा साज चढवण्यात आला आहे. स्थानिक मित्र मंडळ, जहागीरदारवाडी आणि बारी येथील शिलेदारांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबवण्यात आला. तब्बल पाच दिवस अथक मेहनत घेऊन प्रसिद्ध वारली चित्रकार रमेश साबळे आणि पूजा साबळे या दाम्पत्याने मंदिर परिसरात सुंदर चित्रांची सजावट केली आहे. या चित्रांमधून आदिवासी समाजाच्या रूढी, परंपरा आणि संस्कृतीचे जिवंत दर्शन घडत असून, पारंपरिक तारपा नृत्य, होळी सण, दैनंदिन जीवनशैली आणि निसर्गदेवतेची उपासना अशा विविध विषयांचे चित्रण करण्यात आले आहे. विशेष म्हणजे भाविकांच्या सोयीसाठी पायथ्यापासून शिखरावर सोलर दिवा नेऊन बसवण्यात आला आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी मंदिर परिसरातील वारली चित्रांचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत आहे. दरम्यान, नवरात्रोत्सवानिमित्त जहागीरदारवाडीचे सरपंच पंढरीनाथ खाडे, उपसरपंच नामदेव करटुले, संतोष खाडे, जयराम खाडे, अंकुश करटुले आणि माजी सरपंच हिरामण खाडे यांच्या उपस्थितीत पारंपरिक पुजाऱ्यांच्या हस्ते आई कळसुआई तसेच त्यांचे सेवक म्हसोबा यांच्या ठिकाणी विधिवत घटस्थापना करण्यात आली. यावेळी सरपंच पंढरीनाथ खाडे यांनी नवरात्रोत्सवासाठी शिखरावर येणाऱ्या भाविकांना सुरक्षिततेची काळजी घेण्याचे तसेच सोबत आणलेल्या पाण्याच्या बाटल्या आणि इतर कचरा शिखरावर न टाकता परत खाली घेऊन येण्याचे आवाहन केले. शिखरावर मेहनत घेऊन रंगरंगोटी आणि स्वच्छतेच्या माध्यमातून परिसराचे सौंदर्य वाढवणाऱ्या सर्व शिलेदारांचे त्यांनी आभार मानले. वारली चित्रकलेच्या माध्यमातून आदिवासी संस्कृतीचा वारसा जपत कळसुबाई शिखराचे सौंदर्य खुलवण्याचा हा उपक्रम भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे.

महाविकास आघाडीचा सरकारविरोधात महाहल्लाबोल

कनाशी (स. गांवकरी) : कळवण तालुक्यातील जनतेच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आणि केंद्र सरकारच्या धोरणाविरोधात महाविकास आघाडीच्या वतीने भव्य एक दिवसीय आंदोलन छेडण्यात येणार आहे. काँग्रेसचे तालुकाध्यक्ष के. के. गांगुर्डे आणि महाविकास आघाडी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन येत्या १४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता कोल्हापूर फाटा ते प्रशासकीय इमारत, कळवण येथे होणार आहे. निवडणूक आयोगाचे आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, ही या आंदोलनाची प्रमुख मागणी आहे. लोकशाही वाचवण्यासाठी हा लढा असल्याचे आयोजकांनी सांगितले. यासोबतच शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचे प्रश्नही या आंदोलनात मांडले जाणार आहेत -शेतकऱ्यांना २४ तास मोफत वीजपुरवठा करण्यात यावा. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता विद्यार्थ्यांची संपूर्ण शैक्षणिक फी माफ करण्यात यावी. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसान भरपाई थेट जमा करावी. सरकारने या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केल्याने हा हल्लाबोल करण्याची वेळ आल्याचे गांगुर्डे यांनी सांगितले. या आंदोलनात तालुक्यातील युवा, बेरोजगार, महिला, शेतकरी, कष्टकरी आणि मजूर बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन सरकार दरबारी आपला बुलंद आवाज पोहोचवावा, असे आवाहन काँग्रेस तालुकाध्यक्ष के. के. गांगुर्डे यांच्या वतीने करण्यात आले आहे. या महाहल्लाबोलमुळे कळवण तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून प्रशासनाचे लक्ष या आंदोलनाकडे लागले आहे.

सत्यघटनेवरून प्रेरित असलेल्या 'कापूसकोंडा'चा ट्रेलर लाँच



पुणे (स. गांवकरी) : सत्यघटनेवरून प्रेरित असलेल्या 'कापूसकोंडा' या चित्रपटाचा ट्रेलर लाँच करण्यात आला आहे. कुत्र्याला घाबरणाऱ्या एका निवृत्त कर्मचाऱ्याची कथा केंद्रस्थानी ठेवून अनोखी गोष्ट "कापूसकोंडा" चित्रपटातून उलगडणार असून, २३ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित होणार आहे. काही दिवसांपूर्वीच आलेल्या टीजरला रसिक प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला होता. आता या चित्रपटाचा ट्रेलर सोशल मीडियावर लाँच करण्यात आला आहे. पॅनोरामा स्टुडिओस प्रस्तुत व्हीपी माऊली ग्रुप ऑफ कंपनीज सह स्टोरीवाला फिल्म हा चित्रपट सादर करीत असून जास्वंद एंटरटेन्मेंट्स प्रा.लि. यांनी 'कापूसकोंडा' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. 'कापूसकोंडा' चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन सचिन मोहिते यांच आहे. सचिन मोहिते, गणेश पंडित, ऋषिकेश तुरई यांनी चित्रपटाची पटकथा, संवादलेखन केलं आहे. सचिन पाटेकर यांनी छायांकनाची जबाबदारी निभावली आहे. गाणी संगीतकार ए. व्ही. प्रफुल्लचंद्र यांनी सुरबद्ध केली आहेत, तर पार्श्वसंगीत अभिजीत हेगडेपाटील या चित्रपटाला लाभले आहे. चित्रपटाच्या गाण्यांना गायक अवधूत गुप्ते, पद्मनाभ गायकवाड यांचा स्वरसाज लाभला आहे. सुहास राणे यांनी ध्वनी तंत्रज्ञ म्हणून काम पाहिले आहे. अभिनेते सचिन पिळगांवकर, अभिनेत्री मधुराणी गोखले यांच्यासह नवीन पिढीतील अभिनेत्री अक्षता पाडगांवकर, जान्हवी तांबट आणि अभिनेता भूषण पाटील अशी उत्तम स्टारकास्ट या चित्रपटात पहायला मिळणार आहे. चित्रपटाचे बरेचसे चित्रीकरण कथानकाची गरज समजून लातूर जिल्ह्यातील अंधोरी या गावी करण्यात आले आहे.

१६ ते १८ दरम्यान 'प्रवाह बिझनेस एक्स्पो २०२६'; उद्योजकांना संधी



पुणे (स. गांवकरी) : अग्रवाल समाज पुणे यांच्या वतीने 'प्रवाह बिझनेस एक्स्पो २०२६' या तीन दिवसीय व्यवसाय प्रदर्शनाचे आयोजन १६ ते १८ ऑक्टोबरदरम्यान डेक्कन कॉलेज मैदान, पुणे येथे करण्यात आले आहे. 'सोच से सफलता तक' या संकल्पनेवर आधारित या प्रदर्शनाच्या माध्यमातून उद्योजक, व्यावसायिक, उद्योग क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिकांना एकाच व्यासपीठावर आणून व्यवसायवृद्धी, नेटवर्किंग आणि ज्ञानाची देवाणघेवाण करण्याचा उद्देश आहे. अशी माहिती अग्रवाल समाज पुणेचे अध्यक्ष ईश्वरचंद गोयल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

'क्रिएलिटी शेअरफेस्ट इंडिया'चे आयोजन

पुणे : (स. गांवकरी)



३डी प्रिंटिंग क्षेत्रातील लोकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न

वोल३डी आणि क्रिएलिटी यांनी मिळून पुण्यातील ब्लूम येथे 'क्रिएलिटी शेअरफेस्ट इंडिया'चे यशस्वी आयोजन केले. या कार्यक्रमात ३डी प्रिंटिंगमध्ये रस असलेले लोक, क्रिएटर्स, व्यावसायिक, एंटरप्रेन्योर्स आणि वेगवेगळ्या वस्तू तयार करणारे लोक सहभागी झाले.

भारतात वाढत असलेल्या ३डी प्रिंटिंग समुदायातील लोकांनी एकमेकांना भेटावे आणि आपले अनुभव शेअर करावेत, हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. उपस्थितांनी नवीन कल्पनांवर चर्चा केली, ३डी प्रिंटिंगमधील आपले अनुभव सांगितले आणि एकमेकांशी संपर्क वाढवला. कार्यक्रमात चर्चा, प्रॉडक्ट्सची माहिती, एकमेकांशी ओळख करून घेण्याच्या संधी आणि विविध उपक्रमांचा समावेश होता. त्यामुळे हा कार्यक्रम केवळ टेक्नॉलॉजीपुरता मर्यादित राहिला नाही. लोकांना एकमेकांकडून शिकता यावे, एकत्र काम करता यावे आणि पुढे जाण्याच्या नव्या संधी मिळाव्यात, यासाठी हे एक चांगले व्यासपीठ ठरले.

पुणे हे वोल३डी आणि क्रिएलिटी या दोन्ही कंपन्यांसाठी महत्त्वाचे शहर आहे. या दोन्ही कंपन्यांनी मिळून कोरेगाव पार्कमधील कोपा मॉल येथे भारतातील पहिले ३डी प्रिंटिंग रिटेल स्टोअर सुरू केले.

या स्टोअरमध्ये विद्यार्थी, क्रिएटर्स, एंटरप्रेन्योर्स आणि व्यावसायिकांना ३डी प्रिंटिंग तंत्रज्ञान प्रत्यक्ष पाहता आणि वापरून पाहता येते. पुण्यात 'क्रिएलिटी शेअरफेस्ट इंडिया' आयोजित करणे हे तंत्रज्ञान अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याच्या आणि या क्षेत्रातील लोकांना एकत्र आणण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल होते.

वोल३डीचे सीईओ आणि व्यवस्थापकीय संचालक राहुल चंदालिया म्हणाले: "आमच्या प्रवासात पुण्याचे खास स्थान आहे. क्रिएलिटी सोबत येथे भारतातील पहिले ३डी प्रिंटिंग रिटेल स्टोअर सुरू केल्यानंतर, आता पुण्यात शेअरफेस्ट आयोजित करणे हे आमच्या ध्येयाच्या दिशेने आणखी एक पाऊल आहे. लोक एकमेकांना भेटतात, विचार शेअर करतात आणि एकमेकांकडून शिकतात, तेव्हा ३डी प्रिंटिंगचे क्षेत्र खऱ्या अर्थाने वाढते आणि मजबूत होते." 'क्रिएलिटी शेअरफेस्ट इंडिया'सारख्या उपक्रमांमधून वोल३डी आणि क्रिएलिटी लोकांना एकमेकांशी जोडण्याची, एकत्र काम करण्याची आणि भारतातील ३डी प्रिंटिंगच्या विकासात योगदान देण्याची संधी देत आहेत.

महिलेला नागरिकांनी पकडून केली बेदम मारहाण

सोलापूर : (स. गांवकरी)



सोलापूर शहरात लहान मुले पळवण्याच्या संशयावरून एका महिलेला नागरिकांनी पकडून बेदम मारहाण केली आणि महिलेला पोलिस ठाण्यात हजर केले.

या संदर्भातील सविस्तर वृत्त खालीलप्रमाणे आहे, सोलापूर मधील अक्कलकोट रोडवरील एमआयडीसी परिसरात एका अनोळखी महिलेने छोट्या मुलाला पावडर लावून बेशुद्ध करण्याचा प्रयत्न केला यानंतर स्थानिक नागरिकांनी सदर महिलेला पकडून बेदम मारहाण करून पोलीस ठाण्यात हजर केले. संतप्त झालेल्या स्थानिक नागरिकांनी त्या महिलेला जागेवरच पकडले. सोलापूर शहरात लहान मुले पळवून नेणारी टोळी सक्रिय झाल्याच्या चर्चेने खळबळ उडाली आहे. अक्कलकोट रोड संगमेश्वर नगर येथे ही घटना घडली असून एका संशयित महिलेला लहान मुलाला पळवून नेत असताना स्थानिक महिलांनी धाडस दाखवत रंगेहाथ पकडले. या महिलेने सांगितले की आमची पाच जणांची टोळी असून या माध्यमातून आम्ही लहान मुलांना पळवून नेले आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, सदर महिला लहान मुलांना चॉकलेट आणि खाऊचे आमिष दाखवून फूस लावण्याचा प्रयत्न करत होती. याचा संशय काही जागरूक महिलांना आला. त्यांनी तात्काळ आरडाओरड करून तिला घेरले आणि पकडून ठेवले. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन संशयित महिलेला ताब्यात घेतले आहे.

कातकरीपाडा व काकडमाळ येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



जव्हार : (स. गांवकरी)

जव्हार तालुक्यातील ग्रामपंचायत शिरोशी हद्दीतील कातकरीपाडा व काकडमाळ येथील शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसह अंगणवाडीतील बालकांना धरतरी ग्रुप व कैलास खुरकुटे यांच्या वतीने वह्या, पेन तसेच इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, त्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावे आणि शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. शालेय साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळण्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेशही समाजात पोहोचतो. या उपक्रमावेळी धरतरी ग्रुपचे सचिव संदीप पाटारा, सदस्य भारत पाटारा, शिरोशी ग्रामपंचायतीचे रोजगार सहाय्यक रमण खरपडे, ग्रामस्थ वनसू भोये, बाळा भोये, हेमंत भोये,दीपक सुरेश पवार तसेच शाळेतील विद्यार्थी व इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आदिवासी व ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणाला हातभार लावणारा हा उपक्रम कौतुकास्पद असून, अशा सामाजिक उपक्रमांतून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य अधिक सक्षम करण्यासाठी समाजातील विविध घटकांनी पुढाकार घेण्याची गरज आहे.

शारदीय नवरात्र महोत्सवाची भक्तिमय वातावरणात घटस्थापना

पाथर्डी : (स. गांवकरी)



दुष्काळाचे सावट दूर होऊन पाऊस पडावा, यासाठी आई जगदंबेच्या चरणी साकडे; भाविकांसाठी देवस्थानकडून विविध सुविधा श्रीक्षेत्र मोहटादेवी गडावर रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी शारदीय नवरात्र महोत्सवाची घटस्थापना वेदमंत्रांच्या घोषात आणि मंगलवाद्यांच्या निनादात भक्तिमय वातावरणात करण्यात आली. यानिमित्ताने श्री जगदंबा मोहटादेवीचा सुवर्ण मुखवट्यासह विविध अलंकारांचे पूजन करून सकाळी आठ वाजता मोहटे गावातून सवाद्य मिरवणुकीने देवीचा मुखवटा गडावर आणण्यात आला. सकाळी अकरा वाजता विधिवत महाभिषेक व घटस्थापना पार पडली. यावेळी देवीच्या मूर्तीसह संपूर्ण मंदिर परिसराची विविध फुलांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती. देवस्थानचे अध्यक्ष तथा धर्मादाय उप आयुक्त, अहिल्यानगर नवनाथ जगताप व त्यांच्या पत्नी सुजाता जगताप यांच्या हस्ते देवीचा महाभिषेक होऊन घटस्थापना करण्यात आली. यावेळी अध्यक्ष नवनाथ जगताप यांनी महाराष्ट्रात निर्माण झालेली दुष्काळजन्य परिस्थिती दूर होऊन भरपूर पाऊस पडावा, अशी आई जगदंबेच्या चरणी प्रार्थना केली. तसेच सर्व भाविक भक्तांना सुख, समृद्धी आणि आनंदाचे दिवस लाभावेत, महाराष्ट्रातील बळीराजा सुखी होऊ दे, असे साकडे त्यांनी देवीला घातले.

या धार्मिक सोहळ्यास देवस्थानचे विश्वस्त अशोक दहिफळे, बाबासाहेब दहिफळे, शुभम दहिफळे, शशिकांत दहिफळे, ॲड. विक्रम वाडेकर, ॲड. कल्याण बडे, ॲड. प्रसन्न दराडे, बाळूशेट लाहोटी आदी उपस्थित होते. पौरोहित्य भूषण साकरे, भास्कर देशपांडे व विकास क्षीरसागर यांनी केले. मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, देवस्थानचे कर्मचारी आणि हजारो भाविक भक्त यावेळी उपस्थित होते.

घटी बसणाऱ्या भाविकांसाठी भोजनाची व फराळाची व्यवस्था -


घटस्थापनेपासून मोहटादेवी गडावर हजारो स्त्री-पुरुष भाविक नऊ दिवसांचे व्रत करून घटी बसतात. या भाविकांसाठी देवस्थानच्या वतीने फराळ, भोजन, चहा-पाणी आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. महाराष्ट्राच्या विविध भागांतून भाविक तसेच तरुण मंडळे देवीची मशाल गडावरून प्रज्वलित करून पायी घेऊन जातात. नवरात्र महोत्सवाच्या काळात अनेक ठिकाणांहून भाविक सेवेसाठी येत असतात. भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेऊन देवस्थानच्या वतीने आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

शारदीय नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर यंदा पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. एसआरपी, पोलीस, भाविकांची सुरक्षितता आणि गर्दीचे नियोजन यासाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे. यावेळी देवस्थानच्या विश्वस्त मंडळाच्या वतीने कीर्तन महोत्सवाचे उद्घाटनही करण्यात आले. धार्मिक विधी, कीर्तन आणि भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे मोहटादेवी गडावर नवरात्रोत्सवाला भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. श्री मोहटादेवी मंदिराकडे जाणारा रस्तारुंदीकरण व अत्याधुनिक विद्युत रोषणाई, सुख सुविधा यासर्व व्यवस्थामुळे भाविकांमध्ये समाधान व यक्त होत आहे.

आळंदी हे लाखो वारकऱ्यांचं श्रद्धास्थान - इंद्रायणीच्या प्रदूषणाचा ऐरणीवर

आळंदीतील इंद्रायणी नदी प्रदूषण गंभीर ; वारकऱ्यांच्या आरोग्याशी खेळ थांबवा चंद्रकांत वारघडे यांची मागणी

आळंदी : (स. गांवकरी)



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पवित्र आळंदी नगरीतून वाहणाऱ्या इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न पुन्हा गंभीर बनला आहे. एकादशी दिनी आळंदीत दर्शनासाठी आले असता, नदीपात्रात पाय धुण्यासाठी गेलो असता पाण्यातून अत्यंत उग्र दुर्गंधी येत असल्याचे निदर्शनास आले. याच प्रदूषित आणि दुर्गंधीयुक्त पाण्यात अनेक वारकरी व भाविक श्रद्धेने स्नान करत होते, हे अधिक चिंताजनक आहे.

"वारकरी माऊलींच्या दर्शनासाठी आळंदीत येतो, आजार घेऊन परत जाण्यासाठी नाही!" - महाराष्ट्रभरातून येणाऱ्या वारकऱ्यांच्या आरोग्याचा हा प्रश्न आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. या संदर्भात माहिती सेवा समिती महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष चंद्रकांत वारघडे यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, पुणे जिल्हाधिकारी, पुणे धर्मादाय आयुक्त, आळंदी देवस्थान ट्रस्ट आणि आळंदी नगरपरिषद, आळंदी जनहित फाउंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर यांना निवेदन देऊन सर्वांचे लक्ष वेधले आहे.

"वारकऱ्यांची श्रद्धा ही त्यांची कमजोरी नसून महाराष्ट्राची संस्कृती आहे. त्या श्रद्धेचा आदर राखून सुरक्षित सुविधा देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे," असे वारघडे यांनी म्हटले आहे. तातडीने कारवाई न झाल्यास वारकरी बांधव, भाविक आणि नागरिकांना सोबत घेऊन लोकशाही व संवैधानिक मार्गाने जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

प्रशासनाकडे ९ प्रमुख मागण्या:

१. नदीपात्राजवळ मराठीत स्पष्ट, मोठ्या अक्षरात - "या पाण्यात स्नान करू नये, पाणी अंगावर घेऊ नये" - असे सूचना फलक लावावेत.
२. गर्दीच्या काळात घाटावर सुरक्षा कर्मचारी / प्रशिक्षित स्वयंसेवक नियुक्त करून भाविकांना धोकादायक ठिकाणी स्नान करण्यापासून रोखावे.
३. वारकऱ्यांसाठी स्वच्छ, सुरक्षित पाण्याची स्वतंत्र स्नान व्यवस्था करावी.
४. इंद्रायणीच्या पाण्याचे अधिकृत प्रयोगशाळेत तातडीने परीक्षण करून अहवाल सार्वजनिक करावा.
५. नदीत रासायनिक, औद्योगिक किंवा सांडपाणी सोडले जात असल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी.
६. प्रदूषणाच्या मूळ कारणांचा शोध घेण्यासाठी सर्व विभागांची संयुक्त पाहणी व चौकशी समिती स्थापन करावी.
७. भाविकांसाठी आवश्यक वैद्यकीय व आरोग्य सुविधा घाट परिसरात उपलब्ध कराव्यात.
८. आळंदी देवस्थान ट्रस्टने स्वच्छता, पाणी व सुरक्षेसाठी योग्य निधी उपलब्ध करावा.
९. सर्व संबंधित विभागांची तातडीने संयुक्त बैठक घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना निश्चित करावी.

वडाला भाविक भक्तांची मोठी मागणी

नवीन नांदेड : (स. गांवकरी)



दरवर्षी वार्षिक ब्रम्होत्सव निमित्ताने गेल्या अनेक वर्षांपासून सुरु करण्यात आलेल्या तिरुपती बालाजी मंदिर येथील प्रसिद्ध असलेल्या वडा प्रसादाला श्री बालाजी मंदिर देवस्थान हडकोच्या वतीने करण्यात येत असलेल्या प्रसादाला भाविक भक्तांनी मोठ्या प्रमाणात मागणी केली आहे. आंध्रप्रदेशातील तिरुपती बालाजी मंदिर येथील प्रसिद्ध असलेल्या वडा प्रसादाला मंदिरात दर्शनाला गेल्यानंतर भाविक मोठ्या प्रमाणात मागणी करतात त्याच बरोबर लाडू चीही भक्तांना आवड असल्याने त्याची मागणी मंदिर देवस्थाना कडे करण्यात आल्या नंतर गेल्या दोन वर्षांपासून हडको येथील बालाजी मंदिर देवस्थान येथे या प्रसादाला सुरुवात करण्यात आल्यानंतर मोठ्या प्रमाणात भक्त गणांनी मागणी करून गंगाळ हि करण्यात आले , वडा हा हिंग व कस्तुरी मेथी मिश्रण असलेला हा वडा प्रसाद म्हणून अनेक दिवस तो चांगला राहू शकतो व पचनास उपयुक्त असल्याने व चविष्ट दर्जाचे असल्यामुळे अनेकांनी मागणी केली ,या सोबतच लाडू ,खिचडी , चणा ,चित्रान्न ,साखर भात ,या गंगाळ मध्ये नवरात्र उत्सवात भक्तांची मोठ्या प्रमाणात मागणी असते ,प्रति नग वडा व बुंदीचा लाडू दहा रुपये असल्याने भाविक मोठया प्रमाणात गर्दी करीत आहेत. भक्तांसाठी चोविसवा ब्रम्होत्सव दसरा निमित्य विविध दैनंदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष अरुण दमकोंडवार,उपाध्यक्ष प्रकाशसिंह परदेशी, सचिव माणिक देशमुख कोषाध्यक्ष,चंद्रशेखर चव्हाण, सहसचिव बालकृष्ण येरगेवार, सदस्य करणसिंह ठाकूर, संतोष वर्मा,अजय भंडारी , विवेकानंद देशमुख ,सचिन नपाते, गोवर्धन बियाणी,सुभाषकारंजकर , किशोर देशमुख,सतिश मोरे यांनी केले आहे.

अर्धापूरमध्ये दुर्गामाता दौडी प्रारंभ

अर्धापूर : (स. गांवकरी)



नवरात्रोत्सवात श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने अर्धापूर शहरात दि.११ रविवार रोजी श्रीदुर्गामाता दौडीचे आयोजन करण्यात आले होते. सशक्त, स्वाभिमानी, संस्कारी, धर्माभिमानी आणि निर्व्यसनी पिढी घडविण्यासोबतच तरुणांमध्ये राष्ट्रभक्ती आणि हिंदू संस्कृतीविषयी जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुळ उद्देश आहे. घटस्थापना ते विजयादशमी या दिवसांत पहाटेच्या मंगलमय वातावरणात शहरातील तरुण एकत्र येऊन विविध भागांतील दुर्गामंदिरांना भेट देतात. भगवे ध्वज, वारकरी टोपी आणि भगवे पारंपरिक फेटे परिधान करून भारतमाता, दुर्गामाता तसेच थोर महापुरुषांचा जयघोष केला जातो. या दौडीच्या माध्यमातून तरुणांमध्ये शिस्त, संस्कार, व्यसनमुक्ती आणि धर्माभिमानाची भावना रुजविण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच जातीभेद आणि मतभेद बाजूला ठेवून समाजात एकता, बंधुभाव आणि राष्ट्रप्रेमाची भावना दृढ करण्याचा संदेश दिला जातो. नवरात्रोत्सवातील या धार्मिक व सामाजिक उपक्रमात अर्धापूर शहरातील तरुणांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन दुर्गामाता दौड उत्साहात यशस्वी करावी, असे आवाहन श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

RMC प्लांटविरोधात शेतकरी आणि ग्रामस्थ आक्रमक!

पर्यावरणीय प्रदूषणाच्या आरोपांवर सखोल चौकशीची मागणी; MPCB सह संबंधित विभागांना सामूहिक निवेदन!

भोरवाडी : (स. गांवकरी)



पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील भोरवाडी-खानवडी रस्त्यालगत सुरू असलेल्या RMC (रेडी मिक्स काँक्रीट) प्लांटच्या कामकाजावरून परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांनी चिंता व्यक्त केली आहे. या प्लांटमुळे धूळ, वाढती वाहनांची वर्दळ आणि संभाव्य पर्यावरणीय प्रदूषणाचा प्रश्न निर्माण होत असल्याचा आरोप करत संबंधित यंत्रणांनी तातडीने चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात शेतकरी व स्थानिक नागरिकांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) आणि संबंधित विभागांकडे सामूहिक निवेदन सादर केले आहे. प्लांटच्या कामकाजामुळे परिसरातील शेती, नागरिकांचे आरोग्य आणि पर्यावरणावर प्रत्यक्षात काही परिणाम होत आहेत का, याची वस्तुस्थिती तपासण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

RMC प्लांटमध्ये सिमेंट, वाळू, खडी आणि इतर बांधकाम साहित्याचा वापर करून काँक्रीट तयार केले जाते. या प्रक्रियेदरम्यान धुळीचे उत्सर्जन होण्याची शक्यता असते. तसेच कच्चा माल आणि तयार काँक्रीटची वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे रस्त्यावरील धूळ वाढणे, परिसरात वाहनांची वर्दळ होणे आणि स्थानिक नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होण्याची शक्यता असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. त्यामुळे प्लांटच्या परिसरात धूळ नियंत्रणासाठी योग्य उपाययोजना करण्यात आल्या आहेत का, वाहनांच्या वाहतुकीचे योग्य नियोजन केले जाते का आणि प्रदूषण नियंत्रणाच्या निर्धारित अटींचे पालन होते का, याची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. भोरवाडी परिसरातील अनेक नागरिकांच्या उपजीविकेचा महत्त्वाचा आधार शेती आहे. अशा परिस्थितीत प्लांटमधून होणाऱ्या संभाव्य धुळीचा शेती, पिके आणि आसपासच्या परिसरावर काही परिणाम होत आहे का, याची शास्त्रीय पद्धतीने तपासणी करणे आवश्यक असल्याचे ग्रामस्थांनी नमूद केले आहे. तसेच परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हवेच्या गुणवत्तेची तपासणी करून प्रदूषणाची वास्तविक स्थिती स्पष्ट करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. या आरोपांची सत्यता अधिकृत तपासणीनंतरच स्पष्ट होणार असल्याने संबंधित विभागांनी प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थिती जनतेसमोर मांडावी, अशी भूमिका नागरिकांनी घेतली आहे.

डीपीयू हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी महिलेला दिली नवसंजीवनी!

पुणे : (स. गांवकरी)

डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी येथील फुप्फुसरोग तज्ज्ञांनी (पल्मोनोलॉजिस्ट्स) एका २७ वर्षीय महिलेच्या पूर्णपणे अकार्यक्षम (कोलॅप्स) झालेल्या फुप्फुसाचे कार्य यशस्वीरीत्या पूर्ववत करण्यात यश आले आहे.. या महिलेची प्रकृती कधीही सुधारू शकत नाही आणि तिला कायमस्वरूपी याच स्थितीसह जगावे लागेल, असा सल्ला तिला यापूर्वी देण्यात आला होता. रुग्णाला फुप्फुसाचा क्षयरोग (टीबी) झाल्याचे निदान झाले होते आणि तिने सुमारे नऊ महिन्यांचे क्षयरोगविरोधी (अँटी-ट्यूबरक्युलर) उपचार पूर्ण केले होते. संसर्ग यशस्वीरीत्या बरा झाला असला, तरी त्यामुळे तिच्या डाव्या फुप्फुसाच्या श्वसनमार्गावर गंभीर स्वरूपाच्या जखमा (स्कारिंग) राहिल्या होत्या. काळाच्या ओघात, या जखमांच्या उतींमुळे (स्कार टिश्यूज) डावी मुख्य ब्रोन्कस म्हणजेच फुप्फुसात हवा वाहून नेणारी मुख्य नलिका हळूहळू अरुंद होत गेली आणि शेवटी पूर्णपणे बंद झाली. याचा परिणाम म्हणून, तिचे संपूर्ण डावे फुप्फुस अकार्यक्षम (कोलॅप्स) झाले, ज्यामुळे तिला तीव्र श्वासोच्छवासाचा त्रास सुरू झाला आणि तिच्या दैनंदिन आयुष्यावर गंभीर परिणाम झाला. नुकसानाचे प्रमाण प्रचंड असल्याने, काही वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते हे फुप्फुस कायमस्वरूपी अकार्यक्षम झाले होते. या वैद्यकीय स्थितीला बहुधा "ऑटोन्यूमोनेक्टॉमी" (Autopneumonectomy) म्हटले जाते, जिथे तीव्र आजार आणि जखमांमुळे फुप्फुस एखाद्या शस्त्रक्रियेने काढून टाकल्यासारखेच पूर्णपणे निष्क्रिय होते. अधिक वैद्यकीय मत जाणून घेण्यासाठी रुग्णेने डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या इंटरव्हेन्शनल पल्मोनोलॉजी विभागाशी संपर्क साधला. या पथकाचे नेतृत्व डॉ. राहुल केंद्रे यांनी केले. सखोल तपासणीनंतर, श्वसनमार्गातील अडथळा सुरक्षितपणे दूर केल्यास हे अकार्यक्षम झालेले फुप्फुस पुन्हा पूर्ववत होऊ शकते, असे तज्ज्ञांच्या लक्षात आले. एका अत्यंत विशेष 'ब्रोन्कोस्कोपी' प्रक्रियेदरम्यान, डॉक्टरांच्या टीमला डाव्या मुख्य ब्रोन्कसचे प्रवेशद्वार जखमांच्या उतींमुळे पूर्णपणे बंद आढळले. प्रगत 'इलेक्ट्रोकॉटेरी' तंत्रज्ञानाचा वापर करून डॉक्टरांनी त्या भागात एक लहान छिद्र तयार केले. त्यानंतर गाईडवायर अत्यंत सावधगिरीने त्या अडथळ्यातून पार करून, 'फ्लुओरोस्कॉपिक इमेजिंग'द्वारे नैसर्गिक श्वसनमार्ग सुरक्षितपणे पूर्ववत होत असल्याची खात्री करण्यात आली. श्वसनमार्गात प्रवेश मिळाल्यानंतर, 'कंट्रोल्ड रेडियल एक्सपॅन्शन' (CRE) बलून डिलेटेशनच्या साहाय्याने अरुंद झालेला मार्ग हळूहळू रुंदावण्यात आला. डाव्या फुप्फुसाच्या वरच्या आणि खालच्या उप-श्वसनमार्गातही अडथळे आढळले, जे अत्यंत सूक्ष्मपणे दुरुस्त करण्यात आले.



ठाणे : दिवा रेल्वे स्टेशन पूर्व येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानुसार निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली प्रसंगी सदर मोहिमे प्रसंगी दिवा विभागातील मनसेचे दिवा शहर सचिव परेश पाटील यांच्यासह सर्व पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते. **(फोटो - संतोष पडवळ)**

थोडक्यात बातम्या...



ट्रॉन्टेकचा बॅटरी एनर्जी स्टोरेज क्षेत्रात विस्तार


नवी दिल्ली (स. गांवकरी) : भारतीय बॅटरी आणि ऊर्जा तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनी ट्रॉन्टेक इलेक्ट्रॉनिक्सने (Trontek Electronics) बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टम (BESS) क्षेत्रात विस्तार करण्याची घोषणा केली आहे. भारतातील वाढत्या ऊर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी कंपनी देशांतर्गत विकसित आणि उत्पादित ऊर्जा साठवणूक प्रणाली तयार करणार आहे. कंपनीने २०२८ पर्यंत १२ GWh बॅटरी उत्पादन क्षमता उभारण्याचे दीर्घकालीन उद्दिष्ट ठेवले आहे. ट्रॉन्टेकच्या BESS पोर्टफोलिओमध्ये घरगुती वापरापासून ते व्यावसायिक, औद्योगिक आणि युटिलिटी-स्तरीय ऊर्जा साठवणुकीपर्यंत विविध उपायांचा समावेश असेल. यामध्ये औद्योगिक आणि मोठ्या वीज प्रकल्पांसाठी ५ MWh क्षमतेची कंटेनराइज्ड ऊर्जा साठवणूक प्रणाली तसेच व्यावसायिक आस्थापना आणि महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांसाठी विशेष बॅटरी उपायांचा समावेश आहे. इलेक्ट्रिक मोबिलिटी आणि बॅटरी तंत्रज्ञान क्षेत्रातील अनुभवाच्या आधारे ट्रॉन्टेक आता व्यापक ऊर्जा तंत्रज्ञान क्षेत्रात आपला व्यवसाय विस्तारत आहे. बॅटरी प्रणाली, ऊर्जा साठवणूक आणि चार्जिंग सोल्यूशन्स या क्षेत्रांमध्ये क्षमता वाढवण्यावर कंपनीचा भर आहे. स्थानिक अभियांत्रिकी, उत्पादन आणि संशोधन-विकासाच्या माध्यमातून भारतीय परिस्थिती आणि ऊर्जेच्या गरजांनुसार ऊर्जा साठवणूक उपाय विकसित करण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. ट्रॉन्टेकचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सम्रथ एस. कोचर म्हणाले, "ऊर्जा साठवणूक हा ट्रॉन्टेकच्या प्रवासातील एक नैसर्गिक पुढचा टप्पा आहे. गेल्या दोन दशकांहून अधिक काळापासून आम्ही बॅटरी आणि ऊर्जा तंत्रज्ञान क्षेत्रात आपली क्षमता विकसित केली आहे. आता या अनुभवाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर ऊर्जेची साठवणूक आणि व्यवस्थापन करण्यासाठी करण्याची संधी आमच्यासमोर आहे."

स्व. नाना पाटेकर यांच्या निवासस्थानी आमदार शेखर निकम यांची भेट



पुणे (स. गांवकरी) : ज्येष्ठ अभिनेते आणि नाम फाउंडेशनचे संस्थापक स्व. नाना पाटेकर यांच्या निधनाने कला, सामाजिक कार्य आणि समाजाप्रती संवेदनशीलतेची जाणीव जपणाऱ्या एका व्यक्तिमत्त्वाला आपण मुकलो आहोत. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न निघणारी आहे. त्यांच्या जाण्याने त्यांच्या कुटुंबीयांवर कोसळलेल्या दुःखात सहभागी होत चिपळूण-संगमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार शेखर निकम यांनी पुणे येथील डोणजे येथे त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी आमदार शेखर निकम यांनी कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. एखादी व्यक्ती आपल्या कार्यातून, विचारांतून आणि माणुसकीच्या नात्यांतून समाजाच्या मनात अढळ स्थान निर्माण करते. स्व. नाना पाटेकर यांचे व्यक्तिमत्त्वही असेच होते. अभिनयाच्या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवतानाच सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी अनेकांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण केला. नाम फाउंडेशनच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त शेतकरी आणि संकटग्रस्त कुटुंबांसाठी त्यांनी केलेले कार्य त्यांच्या संवेदनशील मनाची साक्ष देणारे आहे. माणूस आपल्या कार्याने मोठा होतो आणि आपल्या माणुसकीने कायम स्मरणात राहतो, याची जाणीव स्व. नाना पाटेकर यांच्या जीवनप्रवासातून होते. त्यांच्या आठवणी, त्यांनी जपलेली सामाजिक बांधिलकी आणि समाजासाठी केलेले कार्य सदैव प्रेरणा देत राहील. या दुःखद प्रसंगी आमदार शेखर निकम यांनी कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त करत त्यांना या दुःखातून सावरण्याचे बळ मिळावे, अशी भावना व्यक्त केली. या भेटीतून राजकीय किंवा सार्वजनिक पदाच्या पलीकडे जपलेली माणुसकीची नाती आणि दुःखाच्या क्षणी आपुलकीने पाठीशी उभे राहण्याची संवेदनशीलता अधोरेखित झाली.

विवोने नवीन एस२ एफई केला सादर



नवी दिल्ली (स. गांवकरी) : विवो इंडियाने आज विवो एस२ एफई स्मार्टफोन सादर करून भारतातील आपल्या एस-सिरीज पोर्टफोलिओचा विस्तार केला आहे. देशातील आधुनिक आणि नेहमी कनेक्टेड असणाऱ्या तरुणांच्या बदलत्या गरजा आणि मागण्या लक्षात घेऊन हा स्मार्टफोन डिझाइन करण्यात आला आहे. विवो एस२ एफईचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याची शक्तिशाली १०,००० mAh बॅटरी. 'सर्वात लांब इलेक्ट्रॉनिक उत्पादन चाचणी लाइव्हस्ट्रीम'साठी गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड स्थापित करून या बॅटरीने जागतिक स्तरावर आपली प्रभावी क्षमता सिद्ध केली आहे, ज्यामध्ये तब्बल ३२ तास आणि ३७ मिनिटांचा कालावधी नोंदवला गेला आहे. दीर्घकाळ टिकणारी बॅटरी, आधुनिक डिझाइन, आकर्षक मनोरंजन, व्यावहारिक इमेजिंग आणि सुरळीत कामगिरीसह, विवो एस२ एफई वापरकर्त्यांना पॉवर्ड, कनेक्टेड आणि प्रत्येक सामाजिक क्षणासाठी तयार ठेवण्यासाठी डिझाइन केला आहे.

पेपरफ्रायने पुणे-पिंपरी-चिंचवडमध्ये सुरू केले नवीन 'स्टुडिओ'

पिंपरी-चिंचवड : (स. गांवकरी)

फर्निचर आणि गृहसजावटीच्या वस्तूंच्या क्षेत्रातील भारतातील आघाडीचे ई-कॉमर्स मार्केटप्लेस असलेल्या 'पेपरफ्राय'ने पुणे-पिंपरी-चिंचवडमध्ये आपला नवीन 'स्टुडिओ' सुरू केल्याची घोषणा केली. उच्च क्षमता असलेल्या शहरी बाजारपेठांमध्ये आपली उपस्थिती वाढवणे आणि भारतातील 'होम अँड लिव्हिंग' (घर आणि जीवनशैली) क्षेत्रात ग्राहकांशी 'ओम्नीचॅनेल' पद्धतीने (ऑनलाइन व ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमांतून) संवाद साधणे, या कंपनीच्या धोरणाचाच हा एक भाग आहे. सध्या पेपरफ्रायचे रिटेल जाळे देशभरातील ९० हून अधिक शहरांमध्ये पसरलेले असून, कंपनीची १५० हून अधिक स्टोअर्स कार्यरत आहेत. डिजिटल माध्यमाद्वारे उत्पादने शोधण्याची सोय आणि प्रत्यक्ष दुकानात जाऊन अनुभव घेण्याची (ऑफलाइन)



विश्वासार्ह पद्धत यांचा सुरेख संगम साधून पेपरफ्रायच्या स्टुडिओनी भारतातील फर्निचर रिटेल क्षेत्राचे स्वरूप बदलले आहे. १०० हून अधिक फ्रँचायझी भागीदारांच्या सहकार्याने देशभरात 'FOFO' (फ्रँचायझीच्या मालकीचे आणि फ्रँचायझीद्वारेच चालवले जाणारे) स्टुडिओ सुरू करून कंपनीच्या 'ओम्नीचॅनेल' धोरणाला बळ दिले जात आहे. हा नवीन स्टुडिओ श्री. सुनील पिसाळ यांच्या भागीदारीत सुरू करण्यात आला असून, तो 'शॉप क्र. UG ५, ऐश्वर्यम वन मॉल, ब्लॉक ३, काळभोरनगर, पिंपरी-चिंचवड, पुणे - ४११ ०१९' या मोक्याच्या ठिकाणी स्थित आहे. येथे ग्राहक १,००० हून अधिक ब्रँड्सच्या फर्निचर आणि गृहसजावटीच्या उत्पादनांची विस्तृत श्रेणी पाहू शकतात, तसेच प्रशिक्षित डिझाइन तज्ज्ञांकडून वैयक्तिक मार्गदर्शनही मिळवू शकतात. या नवीन स्टुडिओच्या उद्घाटनाप्रसंगी बोलताना 'पेपरफ्राय'चे चीफ बिझनेस ऑफिसर हुसेन केसूरी म्हणाले, "श्री. सुनील पिसाळ यांच्या भागीदारीत पिंपरी-चिंचवड येथे नवीन स्टुडिओ सुरू करून महाराष्ट्रातील आमची उपस्थिती अधिक बळकट करताना आम्हाला आनंद होत आहे. भारताचे 'ऑटोमोबाईल हब' म्हणून ओळखले जाणारे पिंपरी-चिंचवड हे देशातील सर्वात गतिमान औद्योगिक केंद्रांपैकी एक आणि पुणे महानगर क्षेत्राचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. येथील मजबूत उत्पादन क्षेत्र (मॅन्युफॅक्चरिंग इकोसिस्टम), वाढत्या निवासी वसाहती आणि प्रगतीशील ग्राहक वर्ग यामुळे हे शहर 'होम अँड लिव्हिंग' (घरगुती फर्निचर व सजावट) श्रेणीसाठी एक महत्त्वाची बाजारपेठ ठरले आहे. आम्हाला खात्री आहे की, या स्टुडिओमुळे पेपरफ्रायचा वैशिष्ट्यपूर्ण 'ओम्नीचॅनेल' (ऑनलाइन आणि ऑफलाइन यांचा मेळ घालणारा) अनुभव पिंपरी-चिंचवड आणि संपूर्ण पुणे क्षेत्रातील ग्राहकांसाठी अधिक सुलभ होईल."

एआय शिकण्यापासून ते प्रत्यक्ष निर्मितीपर्यंत

- महाराष्ट्रातील तरुणीची सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसमधून भरारी!

पुणे : (स. गांवकरी)

कृत्रिम बुद्धिमत्तेचे (एआय) ज्ञान मिळवण्यापासून ते या तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्यक्ष जीवनातील समस्या सोडवण्यापर्यंतचा प्रवास महाराष्ट्रातील तरुणी सुनिधिश्री प्रभाकरन हिने यशस्वीपणे सुरू केला आहे. सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसच्या माध्यमातून तिने कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्र अध्ययन आणि नव्या तंत्रज्ञानातील कौशल्यांना व्यावहारिक अनुभवाची जोड दिली असून, आरोग्यसेवा, शेती आणि वैद्यकीय संशोधन अशा विविध क्षेत्रांत आपल्या ज्ञानाचा उपयोग करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. सुनिधिश्री ही मुंबईतील डी. वाय. पाटील रामराव आदिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे संगणक अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत आहे. सुरुवातीपासूनच कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्र अध्ययन आणि आधुनिक तंत्रज्ञानाविषयी विशेष आवड असलेल्या सुनिधिश्रीला सॅमसंगच्या इनोव्हेशन कॅम्पस या कौशल्यविकास कार्यक्रमातून आपल्या आवडीला प्रत्यक्ष कामाची जोड देण्याची संधी मिळाली. सॅमसंगचा हा प्रमुख तंत्रज्ञान कौशल्यविकास कार्यक्रम १८ ते २५ वयोगटातील तरुणांना उद्योगक्षेत्राच्या गरजांनुसार कौशल्ये, प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे व्यावहारिक ज्ञान देतो. यामुळे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता, प्रत्यक्ष प्रकल्पांवर काम करण्याचा आणि भविष्यातील तंत्रज्ञानाधारित करिअरसाठी स्वतःला तयार करण्याचा अनुभव मिळतो.

सणासुदीत घराच्या रंगकामाची चिंता मिटणार!

नवी दिल्ली : (स. गांवकरी)



लग्नसमारंभ असो वा सणासुदीचे दिवस, घराला नवा साज देण्याची इच्छा प्रत्येकालाच असते. मात्र, रंगांची निवड, वेळेचे नियोजन आणि रंगकामाची देखरेख यामुळे अनेकदा घरमालकांची धावपळ होते. ग्राहकांची हीच अडचण लक्षात घेऊन एशियन पेंट्सने आपल्या 'ब्युटीफुल होम्स पेंटिंग सर्व्हिसेस'च्या माध्यमातून घराच्या रंगरूपात बदल घडवून आणण्याचा सुलभ आणि त्रासमुक्त अनुभव देणारी नवीन मोहीम सुरू केली आहे.

लग्नाच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर साकारलेली ही मोहीम कुटुंबातील उत्साह, आनंद आणि घर सजवण्याची लगबग अधोरेखित करते. घरमालकांना विविध रंगसंगती आणि सजावटीच्या कल्पना निवडण्यापासून ते प्रत्यक्ष रंगकाम पूर्ण होईपर्यंत व्यावसायिक मदत कशी मिळू शकते, हे या मोहिमेतून दाखवण्यात आले आहे. या मोहिमेतील एका चित्रफितीत प्रसिद्ध फॅशन डिझायनर सब्यसाची यांनी डिझाइन केलेल्या वॉलपेपरचे विविध पर्याय दाखवण्यात आले आहेत. या वॉलपेपरच्या माध्यमातून घराला वैयक्तिक आवडीनुसार आकर्षक रूप देता येते. दुसऱ्या चित्रफितीत कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित रंगदृश्य तंत्रज्ञानाची माहिती देण्यात आली आहे. या सुविधेमुळे घरमालकांना प्रत्यक्ष रंगकाम सुरू होण्यापूर्वी निवडलेले रंग आणि वॉलपेपर आपल्या घरात कसे दिसतील, याचा अंदाज घेता येतो.

'ब्युटीफुल होम्स पेंटिंग सर्व्हिसेस'अंतर्गत रंग आणि डिझाइनविषयक मार्गदर्शन, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने रंगांचे दृश्यरूप पाहण्याची सुविधा, आधुनिक रंगकामाची साधने आणि कामावर देखरेख करण्यासाठी नियुक्त तज्ज्ञ उपलब्ध करून दिले जातात. यासोबतच वेळेत काम पूर्ण करण्याची हमी आणि २० टक्के पैसे परत मिळण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे.

'निरोगी शरीर, निरोगी मन'-हाच सुखी जीवनाचा आधार

- माजी महापौर रंजनाताई भानसी
- महाआरोग्य शिबीर कार्यक्रम संपन्न
- ४५० रुग्णांनी घेतला महाआरोग्य शिबीराचा लाभ

नाशिक : (स. गांवकरी)



डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान संचलीत श्री गुरुजी रुग्णालय, नाशिक, रेड स्वस्तिक सोसायटी, भारत व ज्ञानगंगा ज्येष्ठ नागरिक मोफत फिरते वाचनालय, श्रीरामनगर यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीराम नगर, बोरगड, नाशिक येथे महाआरोग्य शिबिर कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास उद्घाटनप्रसंगी माजी महापौर रंजनाताई भानसी उपस्थित होत्या. यावेळी ज्ञानगंगा वाचनालयाचे अध्यक्ष तथा माजी विभागीय पोलीस अधिकारी प्रभाकर रायते, माजी उपायुक्त रेड स्वस्तिक सोसायटी नाशिक विभागाचे कार्यकारी अध्यक्ष जे. बी. पाटील, समितीचे संचालक. सुरेश जाधव, पुंडलिक भोंडवे, अनिल घुले, आप्पा बागुल, विठ्ठल दळवी, रंजना खरात, चंद्रकांत बागुल सह समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच, श्री गुरुजी रुग्णालयाचे कार्यपालन अधिकारी मकरंद धर्माधिकारी, नगरसेविका दिपालीताई गिते, नगरसेवक प्रविण जाधव, व जेष्ठ नागरिक, अधिकारी, पोलिस प्रशिक्षणार्थी विद्यार्थी पदाधिकारी, समाजसेवक श्रीराम नगर म्हसरूळ म्हसोबा वाडी बोरगड परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने आरोग्य तपासणीसाठी उपस्थित होते.

भानसी यावेळी मनोगत करतांना म्हणाल्या की, यावेळी माजी महापौर रंजनाताई भानसी यांनी आपल्या आरोग्याची काळजी ही कुंटुंबासाठी, स्वत:साठी आणि समाजासाठी घेणे ही काळाची गरत आहे. तसेच, निरोगी शरीर, निरोगी मन-हाच सुखी जीवनाचा आधार आहे. यामुळे आपले दैनंदिन जीवन जगतांना प्रत्येक नागरिकांनी आपल्या शरीराची काळजी घेणे आवश्यक आहे. निरोगी शरीर व निरोगी मनामुळे आपण दैनंदिन जीवन आनंदी जगण्यास मदत होईल. उत्तम आरोग्य, हीच यशाची गुरुकिल्ली असून, आपल्या उत्तम आरोग्यासाठी मोफत महाआरोग्य शिबीराचा लाभ घेण्याचे आवाहन केले. यावेळी विशेष करून म्हसोबा वाडी, ग्रामीण बोरगड श्रीराम नगर, म्हसरूळ येथील महिला पुरुष आदिवासी गरजू गोरगरीब जनतेने जवळपास 450 रुग्णांनी या शिबिरातून तपासणी करण्यात आली असल्याचेही आवर्जुन रंजनाताई भानसी यांनी केले. सौ. दिपालीताई गिते नगरसेविका यांनी ज्ञानगंगा जेष्ठ नागरिक फिरते वाचनालयाच्या कार्यालयास भेट देऊन समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमावेळी सौ. दिपालीताई यांनी श्रीराम नगर चौफुली फलकाचे फित कापून अनावरण करण्यात आले. तसेच, नगरसेवक प्रविण जाधव यांनी शिबिराच्या स्थळी भेट देऊन पाहणी केली तसेच आरोग्य तपासणी बाबत वैद्यकीय पथकास मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी जिल्हा नियोजन अधिकारी गोणिराम शिंदे यांनी केले. तर आभार ज्ञानगंगा वाचनालयाचे सचिव तथा जनसंपर्क अधिकारी साहेबराव जगताप यांनी केले.

नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा ध्वजारोहण सोहळ्याच्या तयारीला गती

- आयुक्त शेखर सिंह यांची माहिती
- स्वच्छता, घाटविकास आणि वाहतूक नियोजनावर भर

नाशिक : (स. गांवकरी)



आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ महाकुंभमेळा ध्वजारोहण सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील विकासकामे, गोदाघाट परिसरातील सुविधा, रामतीर्थ व कुशावर्त तीर्थ येथील कामे, स्वच्छता, वाहतूक व्यवस्था आणि धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांच्या नियोजनाला गती देण्यात येत आहे. या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरण, जिल्हा प्रशासन, महानगरपालिका, पोलिस यंत्रणा, लोकप्रतिनिधी, विविध आखाडे आणि विविध धार्मिक संस्थांमध्ये समन्वय साधून कामे करण्यात येत असून, भाविकांना सुरक्षित आणि सुविधायुक्त वातावरण उपलब्ध करून देण्यावर भर असल्याची माहिती नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

प्राधिकरणाच्या कार्यालयात आज दुपारी पत्रकार परिषद झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, अतिरिक्त आयुक्त कमलाकर रणदिवे, श्री भक्तीचरणदास महाराज, पुरोहित संघाचे सतीश शुक्ला, श्री. पंचाक्षरी, छावा भारत क्रांती मिशनचे डॉ विलास पांगारकर, धनंजय बेले, नरहरी उगलमुगले आदी उपस्थित होते. आयुक्त श्री. सिंह यांनी सांगितले की, ध्वजारोहण सोहळ्याच्या नियोजनासंदर्भात झालेल्या बैठकीत लोकप्रतिनिधी आणि संबंधित यंत्रणांच्या उपस्थितीत विविध बाबींचा आढावा घेण्यात आला.

आगामी कार्यक्रमांची रूपरेषा सध्या प्राथमिक स्वरूपात असून, संबंधित विभागांशी चर्चा करून आवश्यक निर्णय अंतिम करण्यात येणार आहेत. गर्दीचे व्यवस्थापन, भाविकांची सुरक्षितता, सार्वजनिक वाहतूक आणि परिसरातील हालचालींचे नियोजन यांना प्राधान्य दिले जाणार आहे. ध्वजारोहण सोहळ्याच्या निमित्ताने विविध धार्मिक संस्था, आखाडे आणि संत-महंतांशी चर्चा करून त्यांच्या आवश्यकतांची माहिती घेण्यात येणार आहे.

धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करताना संबंधित संस्थांचा सहभाग, भाविकांची ये-जा आणि सार्वजनिक वाहतुकीची उपलब्धता, पार्किंग यांचा विचार केला जाणार आहे. कार्यक्रमांच्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित यंत्रणा कार्यरत आहेत. ध्वजारोहण सोहळ्यानिमित्त नाशिक त्र्यंबकेश्वर येथे विविध कार्यक्रम होतील. यात २५ ऑक्टोबर २०२६ रोजी शंखनाद होईल. त्याची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद होणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)
कोकण विभागीय कार्यालय : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र, २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ५ । वर्ष : ४ थे । अंक : २९८ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026



मंगळवार दि. १३ ऑक्टोंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

सोमेश्वर कारखान्यावर सुनेत्रा पवारांचे निर्विवाद वर्चस्व

सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या गटाने मोठे यश मिळवल्याचा दावा केला जात आहे. २१ पैकी २१ जागांवर विजय मिळवत कारखान्यावर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केल्याची बातमी समोर आली आहे.

मुंबई (समर्थ गांवकरी)

श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील पॅनलने सर्वच्या सर्व २१ जागा जिंकत निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. अत्यंत अटीतटीच्या झालेल्या या निवडणुकीत सुनेत्रा पवार यांनी पुरुषोत्तम जगताप यांच्या पॅनलसह ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या गटालाही जोरदार धक्का दिला. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी प्रथमच निवडणुकीच्या मैदानात उतरून मिळविलेला हा



विजय बारामतीतील राजकीय वर्चस्वाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.

सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत सुनेत्रा पवार यांच्या पॅनलचे सर्व २१ उमेदवार विजयी झाले.

संग्राम सोरटे, प्रमोद काकडे, अभिजीत काकडे आणि वसंतराव दगडे या चार उमेदवारांनी दुपारच्या सुमारासच विजय मिळविला होता. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये जल्लोष सुरू झाला होता.

दुष्काळी तालुक्यातील विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेऊ नका

मंत्री चंद्रकांत पाटलांचे विद्यापीठांना कडक निर्देश

मुंबई (समर्थ गांवकरी)

राज्यातील ३४ जिल्ह्यांमधील २६५ तालुक्यांत दुष्काळी परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित भागातील विद्यार्थ्यांना मोठा आर्थिक दिलासा देण्यासाठी त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे परीक्षा शुल्क आकारण्यात येऊ नये, असे स्पष्ट निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत. शासनाच्या या निर्देशांचे उल्लंघन करून विद्यार्थ्यांकडून शुल्क वसूल करणाऱ्या महाविद्यालयांवर कठोर कारवाईचा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

परीक्षा शुल्क वसुलीवर कडक निर्बंध

मराठवाडा आणि राज्यातील इतर दुष्काळी भागांमधील शेतकरी व सर्वसामान्य कुटुंबांना सध्या गंभीर आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा कठीण परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर आणि कुटुंबांवर आर्थिक ताण येऊ नये, यासाठी शासनाने घेतलेल्या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. विद्यापीठ प्रशासनाने याची गांभीर्याने नोंद घ्यावी आणि विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क वसूल केले जाणार नाही, याची पूर्ण दक्षता घ्यावी, अशा सक्त सूचना बैठकीत देण्यात आल्या.

उच्च शिक्षण विभागाची उच्चस्तरीय बैठक

या महत्त्वपूर्ण बैठकीस उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ संचालक तथा तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. प्रमोद नाईक, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, उपसचिव अमोल मुत्याल, उपसचिव प्रताप लुबाळ, महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे यांसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू आणि संबंधित अधिकारी ऑनलाइन व प्रत्यक्ष उपस्थित होते.



राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दुष्काळी तालुक्यांतील विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारू नये, असे कडक निर्देश विद्यापीठांना दिले आहेत.

साई संस्थानच्या ४८८ कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवेत कायम होण्याचा मार्ग मोकळा; उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

शिर्डी (समर्थ गांवकरी)

श्री साईबाबा संस्थानमधील ४८८ कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवाकायमीच्या प्रश्नाला महत्त्वपूर्ण वळण मिळाले असून, छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे त्यांच्या सेवेत कायम होण्याच्या प्रक्रियेतील कायदेशीर अडथळे दूर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सेवेत कायम होण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी हा निर्णय दिलासादायक मानला जात आहे. या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.

श्री साईबाबा संस्थानमध्ये अनेक वर्षांपासून शेकडो कर्मचारी कंत्राटी पद्धतीने कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा विषय यापूर्वीच धोरणात्मक स्तरावर विचाराधीन होता. मात्र, त्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय, आर्थिक आणि कायदेशीर बाबींमुळे हा प्रश्न न्यायालयीन प्रक्रियेत गेला होता. संस्थानच्या वतीने यासंदर्भात छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयाच्या खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली होती.

कर्मचाऱ्यांच्या सेवाकायमीचा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसोबतच्या चर्चांमधून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. तसेच, न्यायालयीन प्रक्रियेत कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक भूमिका मांडली जावी, यासाठीही त्यांनी प्रयत्न केले.

मंत्री विखे पाटील आणि डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पाठपुराव्याने ४८८ कर्मचाऱ्यांच्या सेवाकायमीचा मार्ग मोकळा

दरम्यान, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनीही या प्रश्नाकडे लक्ष देत कर्मचारी संघटना, संस्थान प्रशासन आणि संबंधित शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून पाठपुरावा केला होता. कर्मचाऱ्यांच्या म ागण्यांसंदर्भात झालेल्या बैठकांमध्ये सहभागी होत, त्यांच्या सेवाकायमीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्याची भूमिका त्यांनी घेतली होती. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नावर सकारात्मक निर्णय व्हावा, यासाठी विखे पाटील पिता-पुत्रांनी सातत्याने प्रयत्न केल्याचे सांगितले जात आहे.

उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे ४८८ कर्मचाऱ्यांच्या सेवाकायमीसंदर्भातील पुढील प्रक्रिया मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या निर्णयामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मि ळण्याची शक्यता आहे. सेवेत कायम होण्याबरोबरच नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे सुविधा आणि लाभ मिळण्याच्या दृष्टीनेही या निर्णयाला महत्त्व प्राप्त झाले आहे. तथापि, सेवाकायम ीची प्रत्यक्ष अंमलबजावणी न्यायालयाच्या आदेशातील अटी आणि संस्थान प्रशासनाच्या पुढील कार्यवाहीवर अवलंबून राहणार आहे.

या प्रश्नासाठी कर्मचारी संघटनांनीही वेळोवेळी बैठका घेऊन आपली भूमिका मांडली होती. संस्थान प्रशासन, आस्थापना विभाग आणि विधी विभागाच्या स्तरावरही या प्रकरणाची प्रक्रिया सुरू होती. आता उच्च न्यायालयाच्या



निर्णयामुळे या प्रदीर्घ प्रश्नाच्या निराकरणाच्या दिशेने म हत्त्वाचे पाऊल पडल्याची भावना कर्मचाऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासह संस्थानच्या तदर्थ समितीचे अध्यक्ष तथा प्रधान जिल्हा न्यायाधीश शिवाजीराव कचरे, जिल्हाधिकारी तथा समिती सदस्य डॉ. पंकज आशिया, संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे, संबंधित प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे लक्ष वेधले जात आहे.

४८८ कर्मचाऱ्यांच्या सेवाकायमीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आता न्यायालयीन आदेशानुसार पुढील प्रशासकीय कार्यवाही किती वेगाने पूर्ण होते आणि कर्मचाऱ्यांना सेवाकायमीचे प्रत्यक्ष लाभ कधी मिळतात, याकडे संबंधित कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांचे लक्ष लागले आहे.

पुणेकरांवर पाणीकपातीचे संकट, आठवड्यातून 'या' दिवशी राहणार पाणी पुरवठा बंद

पुणे (समर्थ गांवकरी)

पावसाने दिलेली ओढ आणि आगामी पावसाबाबतची अनिश्चितता लक्षात घेऊन उपलब्ध पाणी साठ्याचे नियोजन करण्यासाठी राज्य सरकारने दिलेल्या आदेशानंतर पुणे महानगर पालिकेने शहरामध्ये आठवड्यातून एक दिवसासाठी पाणी पुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या १५ ऑक्टोबरपासून अर्थात गुरूवारपासून शहराचा पाणी पुरवठा बंद ठेवला जाणार आहे. आठवड्यातील प्रत्येक गुरूवारी पुणे शहरातील पाणी पुरवठा बंद ठेवला जाणार आहे. यामुळे नागरिकांनी आपले दररोजचे पाण्याचं नियोजन करूनच वापरण्याचा सल्ला पुणे महानगर पालिकेने नागरिकांना दिले आहे.

पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांम धील पाण्याची स्थिती लक्षात घेता राज्य सरकारने महानगर पालिकेला पाणी कपातीचे निर्देश दिले आहेत. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या अध्यक्षतेखाली आज (१२ ऑक्टोबर, सोमवार) झालेल्या बैठकीत शहरातल्या धरणांम धील पाणीसाठ्याचा आढावा घेत पाणी कपातीचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे आता पुणेकरांना २०२७ च्या पावसाळ्यापर्यंत पाणीकपातीला साम ोरे जावे लागणार हे मात्र नक्की. राज्य सरकारने पुणे महानगर पालिकेला दिलेल्या आदेशानुसार, महानगर पालिका क्षेत्रात ४० टक्के पाणी कपात करावी असे पत्र शुक्रवारी पाटबंधारे विभागाने पुणे महापालिकेला पाठवले होते.

आता त्याप्रमाणे शहरामध्ये पाणी कपात



केली जाणार आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर शहरामध्ये पाणी कपातीची घोषणा केलीतर नागरिकांचं पाण्याचं नियोजन पूर्णपणे कोलम डणार, हे मात्र नक्की. पाण्याचं गणित कोलमडू नये आणि तीव्र पाणी टंचाईला सामोरं जावं लागू नये, म्हणून महापालिकेने आठवड्यातून एक दिवस पाणी कपात करण्याचा निर्णय घेतला. राज्य सरकारच्या पाटबंधारे विभागाने दिलेल्या निर्देशानुसार, शहरामध्ये एक दिवस पाणी पुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता प्रत्येक आठवड्यातील गुरूवारी पुणे शहराला पाणी पुरवठा बंद असणार आहे. त्या प्रमाणे नागरिकांनी आधीच पुरेल तेवढा पाणी पुरवठा साठवून ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

शिवाय, पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणातील उपलब्ध पाणीसाठा, शहरातील वाढती लोकसंख्या आणि त्याप्रमाणे पाण्याची वाढती मागणी सोबतच पुढील दिवसांच्या पाण्याचे नियोजन अशा सर्व गोष्टींकडे लक्ष देऊन महापालिकेने पाणी कपातीची घोषणा केली आहे. सोबतच नागरिकांना पुढच्या वर्षीचा पावसाळा येईपर्यंत पाण्याचा वापर काढकसरीने करण्याचे आवाहन केले आहे.

स्वहस्ते मूर्तिनिर्मितीचा वारसा;चिरेबंदी मित्रमंडळाची परंपरा कायम

यंदाच्यावर्षी साकारली आई सप्तशृंगी देवीची मूर्ती

अकोले (समर्थ गांवकरी)

नवरात्रोत्सव म्हणजे आदिशक्तीचा जागर, भक्तीचा उत्सव आणि आपल्या संस्कृतीच्या परंपरांचे जतन करण्याचा मंगलमय सोहळा! नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवात देवीच्या आराधनेसह सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरांना विशेष महत्त्व असते. याच परंपरेचा वारसा जपत भव्यता आणि संस्कृतीची जोपासना हे वैशिष्ट्य असलेल्या चिरेबंदी मित्र मंडळाने यंदाच्या नवरात्रोत्सवात आई सप्तशृंगी देवीची प्रतिष्ठापना केली आहे. या प्रतिष्ठापनेचे सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण आकर्षण म्हणजे मंडळाच्या कार्यकर्त्यांनी स्वतःच्या हातांनी साकारलेली देवीची सुबक मूर्ती!

आजच्या काळात नवरात्रोत्सवासाठी तयार मूर्ती आणण्याची पद्धत सर्वत्र पाहायला मिळते. मात्र, चिरेबंदी मित्र मंडळाने आपली परंपरा जपत मूर्तिनिर्मितीचे कार्य स्वतःच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून करण्याचा उपक्रम सुरू ठेवला आहे. श्रद्धा, कलात्मकता, मेहनत आणि सामूहिक सहभाग यांच्या संगमातून साकारलेली ही परंपरा मंडळाच्या वेगळेपणाची ओळख ठरत आहे. केवळ उत्सव साजरा करणे एवढ्यापुरती मंडळाची वाटचाल मर्यादित नसून, त्यातून संस्कृतीचे संवर्धन आणि कार्यकर्त्यांच्या कलागुणांना वाव देण्याचाही प्रयत्न केला जात आहे.

गणेश कुडेकर यांच्या हातून साकारली आई सप्तशृंगीची मूर्ती यंदाच्या नवरात्रोत्सवासाठी आई सप्तशृंगी देवीची मूर्ती घडविण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी मंडळाचे धडाडीचे कार्यकर्ते गणेश कुडेकर यांनी पार पाडली. त्यांनी अत्यंत मेहनत, एकाग्रता आणि कलात्मकतेच्या जोरावर देवीची मूर्ती स्वतःच्या हातांनी साकारली. त्यांच्या हातून घडलेली ही मूर्ती सुबक, आकर्षक आणि त्रिपुरसुंदरी स्वरूपाची आहे. मूर्तीच्या घडणीम ध्ये देवीच्या रूपाचे सौंदर्य, धार्मिक भावभावना आणि कलात्मकतेचा सुंदर मिलाफ साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

मूर्तिनिर्मिती हे केवळ हातांचे कौशल्य नसून त्यासाठी संयम, कल्पकता, बारकावे समजून घेण्याची क्षमता आणि कलेप्रती निष्ठा आवश्यक असते. मूर्तीच्या प्रत्येक भागाला योग्य आकार देणे, चेहऱ्यावरील भाव उठावदार करणे आणि देवीचे रूप अधिक देखणे बनविणे यासाठी विशेष मेहनत घ्यावी लागते. गणेश कुडेकर यांनी हे आव्हान स्वीकारत आपल्या कलागुणांची प्रचिती दिली. त्यांच्या या कार्यामुळे मंडळाच्या परंपरेला यंदाही नवे रूप आणि नवा आयाम मिळाला आहे.

प्रशांत कोळपकर यांचे मार्गदर्शन मोलाचे

आई सप्तशृंगी देवीची मूर्ती साकारण्याच्या या प्रक्रियेत प्रशांत कोळपकर यांचे मार्गदर्शन लाभले. मूर्तीच्या घडणीतील कलात्मक बारकावे, देवीच्या स्वरूपाची मांडणी आणि मूर्तीला सुबक रूप देण्यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे गणेश कुडेकर यांना मूर्तिनिर्मितीच्या प्रक्रियेत अधिक आत्मविश्वासाने काम करता आले.

कलेचे ज्ञान पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे आणि नव्या कलाकारांना प्रोत्साहन देणे ही सांस्कृतिक परंपरेच्या जतनातील महत्त्वाची बाब आहे. चिरेबंदी मित्र मंडळाच्या या उपक्रमातूनही मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष सहभाग यांचा सुंदर समन्वय दिसून येतो. अनुभवी व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांना स्वतःची कला विकसित करण्याची संधी मिळते. त्यातून केवळ मूर्ती साकारली जात नाही, तर कलात्मकतेचा वारसाही पुढे नेला जातो.


भव्यतेसोबत संस्कृतीच्या जतनाचा ध्यास

चिरेबंदी मित्र मंडळाची वाटचाल भव्यतेची परंपरा आणि संस्कृतीची जोपासना या विचारांवर आधारित आहे. नवरात्रोत्सव हा केवळ सजावट, रोषणाई आणि धार्मिक कार्यक्रमांचा सोहळा नसून तो आपल्या श्रद्धा, परंपरा आणि सांस्कृतिक मूल्यांचे दर्शन घडविणारा उत्सव आहे. या भावनेतून मंडळाने मूर्ती स्वतः घडविण्याची परंपरा जपली आहे. स्वतःच्या हातांनी देवीची मूर्ती साकारल्यामुळे कार्यकर्त्यांचा उत्सवाशी असलेला भावनिक संबंध अधिक दृढ होतो. मूर्तिनिर्मितीच्या प्रत्येक टप्प्यात सहभागी होताना कार्यकर्त्यांना परिश्रमाचे महत्त्व, एकमेकांशी समन्वय साधण्याची गरज आणि सामूहिक जबाबदारीची जाणीव होते. अशा उपक्रमांमुळे मंडळातील एकजूट वाढण्यास मदत होते आणि धार्मिक उत्सवाला सांस्कृतिक अधिष्ठान

गणेश कुडेकर यांचे कलाकौशल्य; प्रशांत कोळपकर यांचे मार्गदर्शन



गणेश कुडेकर



प्रशांत कोळपकर

प्राप्त होते.

भक्ती, कला आणि एकजुटीचा अनोखा संगम

आई सप्तशृंगी देवीच्या प्रतिष्ठापनेमुळे चिरेबंदी मित्र मंडळाच्या नवरात्रोत्सवाला भक्तिमय वातावरणाची जोड मिळाली आहे. देवीच्या मूर्तीच्या निर्मितीपासून प्रतिष्ठापनेपर्यंतच्या प्रक्रियेत कार्यकर्त्यांचा सहभाग हा या उत्सवाचा महत्त्वाचा भाग ठरतो. स्वतःच्या हातांनी घडविलेल्या मूर्तीसमोर नतमस्तक होताना कार्यकर्त्यांसाठी तो केवळ धार्मिक विधी राहत नाही, तर त्यांच्या मेहनतीचे आणि श्रद्धेचे प्रतीक बनतो.

गणेश कुडेकर यांची कलात्मक मेहनत आणि प्रशांत कोळपकर यांचे मार्गदर्शन यामुळे यंदाच्या उत्सवात मूर्तिनिर्मितीच्या परंपरेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. अशा उपक्रमांतून स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन मिळते, पारंपरिक कौशल्य जपले जाते आणि नव्या पिढीला आपल्या सांस्कृतिक वारशाची ओळख होते. चिरेबंदी मित्र मंडळाची ही वाटचाल



भव्यतेबरोबरच परंपरा, श्रद्धा आणि सर्जनशीलतेचे महत्त्व अधोरेखित करणारी आहे. आई सप्तशृंगी देवीच्या सुबक मूर्तीच्या माध्यमातून मंडळाने यंदाही आपल्या सांस्कृतिक बांधिलकीचे दर्शन घडविले आहे. भक्तीच्या या उत्सवात कलेचा सन्मान, परंपरेचे संवर्धन आणि कार्यकर्त्यांच्या एकजुटीचा संदेश देत चिरेबंदी मित्र मंडळाने नवरात्रोत्सवाला एक वैशिष्ट्यपूर्ण रूप दिले आहे.

स्वहस्ते घडविलेल्या देवीच्या मूर्तीमधून श्रद्धेला कलेची जोड देणारी आणि भव्यतेसोबत संस्कृतीची परंपरा जपणारी चिरेबंदी मित्र मंडळाची वाटचाल निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

लेख (नवरात्रोत्सव)

श्री क्षेत्र कोल्हार श्री भगवतीमाता



मानवी जीवनात शक्तीच्या उपासनेला प्राचीन काळापासून अनन्य साधारण महत्व आहे. दु:खितांचे दु:ख दूर करणारी, भक्ताला शक्ती व युक्ती प्रदान करुन जीवनात येणाऱ्या संकटांना निर्भिडपणे सामोरे जाण्यासाठी धैर्य देणारी, जीवनात भगवतीमातेचे स्थान काही वेगळेच मानले जाते. कोल्हार भगवतीपूरच नव्हे तर महाराष्ट्रामधील असंख्य भाविकांनी देवी भगवतीला मातेच्या रुपात मानले आहे. अहमदनगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील श्री क्षेत्र कोल्हार श्री भगवतीमाता भगवतीपूरचे ग्रामदैवत म्हणजेच श्री भगवतीमाता सर्वत्र प्रसिध्द आहे. हे एक जागृत देवस्थान आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यामध्ये श्री साईबाबांच्या शिर्डीपासून अवघ्या चोवीस किलोमीटर अंतरावर, नगर-मनमाड रस्त्यावरील प्रवरा नदीच्या तीरावर असलेल्या या भगवतीमाता मंदिरात तुळजापूरची श्री तुळजाभवानी माता, माहुरची श्री रेणुका माता, वणीची श्री सप्तश्रृंगी माता आणि कोल्हार भगवतीपूरची श्री भगवती माता असे साडेतीन शक्तीपीठांचे एकत्रीत आणि दुर्लभ वस्तीस्थान आहे. श्री क्षेत्र कोल्हार भगवतीपूर येथे भक्तगण मोठया संख्येने येतात. या साडेतीन शक्तीपीठाचे एकत्रीत वस्तीस्थान लाभलेल्या पूण्यभूमीत तीर्थक्षेत्राचे स्वरुप लाभले आहे. नवसाला पावणाऱ्या, भक्तांची मनोकामना पूर्णत्वास नेणाऱ्या श्री भगवतीमातेचा महिमा जितका वर्णावा तितका थोडाच.

श्री क्षेत्र कोल्हार श्री भगवतीमाता – पूर्व इतिहास

श्री भगवती मातेचे मंदिर पूर्वाभिमुख आहे. मंदिराचे जुने बांधकाम हेमांडपंथी होते. मंदिराच्या जिर्णोद्धारकार्यात मंदिराच्या समतलापासून ४०-४५ फूट खोलवर खोदकाम होऊनही मंदिराचा पाया दृष्टीपथास आला नाही. अथवा मंदिर निर्मिती संदर्भातील शिलालेख सदृश्य अन्य पुरावा सापडला नाही. त्यामुळे मंदिर अनादीकालीन असल्याची साक्ष पटते. भगवती माता मंदिरात असलेली व्याघ्रशिल्पे इ.स. १३ व्या शतकात झाली असावी. असे काही तज्ञ जाणकारांचे मत आहे. कोल्हार भगवतीपूर हे पूर्वी जहागिरीचे गांव होते. पानोडीची ही जहागिरी होती. त्याकाळी म्हणजे सुमारे २५० वर्षांपूर्वी त्यांनी भगवतीमातेचे छोटेसे मंदिर बांधले असावे असे काही जाणकारांचे मत आहे.

कोल्हार भगवतीपूर गावाच्या नावाच्या उत्पत्तीविषयी अनेक कथा प्रचलीत आहेत. त्यापैकी एक अशी, महाभारतात वर्णिलेल्या देव-दानवांच्या अमृतमंथनातून निघालेल्या चौदा रत्नांपैकी अमृतकुंभातील अमृत प्राशन करण्यासाठी अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा येथे दानवश्रेष्ठ राहू देवांमध्ये मिसळला. मोहिनी रूपातील विष्णुंनी त्याचे कपट ओळखून सुदर्शनचक्राने त्याचा शिरच्छेद केला. राहूच्या वधामुळे प्रवरा परिसरात देव-दानवांमध्ये झालेल्या तुंबळ युध्दामुळे एकच कोलाहल माजला म्हणून प्रवरा तीरावरील या गावाला 'कोलाहल-कोल्हाळ-कोल्हार' असे नाव प्राप्त झाले अशी कथा आहे. याठिकाणी देव-दानवांचा कोलाहाल झाला. तो कोलाहाल शमविण्यासाठी श्रीशंकराने स्वत: प्रकट होऊन श्री भगवतीची स्थापना केली. श्री भगवतीदेवीने संपूर्ण राक्षसांचा नायनाट केला. देवीचे क्षेमकुशल विचारण्यासाठी भगवतीमातेच्या श्री भवानी माता, श्री रेणुकामाता, श्री सप्तश्रृंगीमाता या भगिनी येथे आल्या असल्याचे मानले जाते. श्री क्षेत्र आळंदीच्या एका ग्रंथामध्ये संत श्री ज्ञानेश्वर महाराज नेवासा ते आळंदी प्रवासामध्ये असताना श्री भगवतीदेवीच्या मंदिरात मुक्काम केला व पुढे प्रस्थान केले.

असा उल्लेख सापडला आहे. कोल्हार भगवतीपुर येथील श्री महादेव मंदिरामध्ये एक मोठया नंदीची दगडी प्रतीकृती असून त्या नंदीच्या पाठीमागच्या बाजूकडून पूर्वीच्याकाळी जमिनीखालून भूयार खोदलेले होते. हे भूयार थेट श्री भगवतीदेवीच्या मंदिराच्या मागे पोहीच्या पलिकडे निघते. परंतु ते भुयार आता सापडत नाही. भुयाराचे पहिले द्वार श्री महादेव मंदिराच्या पिंडीखाली आहे. असे सांगण्यात येते. कोल्हार भगवतीपूर हे गाव पौराणिक पार्श्वभूमीमुळे सुमारे दोन हजार वर्षापासून अस्तित्वात आहे. प्रवरा परिसरात मानवी जीवन अश्मयुगापासून अस्तित्वात असल्याचे तसेच सिंधू संस्कृतीप्रमाणेच 'प्रवरा संस्कृती' प्राचीन कालापासून अस्तित्वात असल्याचे डॉ. संकलिया या इतिहास संशोधकांनी सप्रमाण सिद्ध केलेले आहे.

प्रभु श्रीरामचंद्र बंधु लक्ष्मण पत्नी सितामातेसह पंचवटीकडे १४ वर्षाचा वनवास भोगण्यासाठी जात असतांना प्रवरानदीकाठी मुक्काम केला व प्रवरा नदीत वाळूची महादेव पिंड तयार केली. त्यांनी कोल्हाळेश्वराची येथे प्रतिष्ठापना केली. या कोल्हाळेश्वराच्या या गावाला कोल्हार असे नांव पडले असावे असे जानकार सांगतात. या ठिकाणी त्यांना श्री महादेव प्रसन्न झाले. पुढे याचठिकाणी मंदिर बांधण्यात आले. त्या शिवलिंगाभोवती उभारलेल्या मंदिरास कोल्हाळेश्वर नाव पडले. कोल्हाळेश्वर वरुन या गावास 'कोल्हार' नाव पडले असे काही जण मानतात. याच ठिकाणी श्री भगवती मातेने अवतार घेऊन प्रभूरामचंद्रास दृष्टांत दिला व दृष्टांचा नाश करण्यासाठी आशिर्वाद दिला. त्यामुळे श्री भगवतीमातेच्या पदस्पर्शाने पूणित झालेल्या स्थानाला 'भगवतीपूर' हे नाव पडले. महिनाभराच्या यात्रोत्सव काळात व नवरात्रोस्तवाच्या काळात तुळजापूरची श्री भवानी माता, माहूरची श्री रेणुका माता, वणीची श्री सप्तश्रृंगी माता आणि कोल्हार भगवतीपूरची श्री भगवतीमाता ही साडेतीन शक्तीपीठे येथे वास्तव्य करतात असे सर्वजण मानतात.

दरवर्षी एक महिन्याचा यात्रा महोत्सव- श्री भगवतीमातेचा यात्रामहोत्सव दरवर्षी पौष शुध्द पौर्णिमा ते माघ शुध्द पौर्णिमा असा महिनाभर साजरा केला जातो. महिनाभर यात्रोत्सव चालणारे हे संपूर्ण भारत वर्षातील एकमेव जागृत देवस्थान आहे. या काळात अनेक धार्मिक विधींबरोबरच श्री भगवतीदेवी यात्रोत्सव समितीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन होत असते. यात्रा महोत्सवास पहाटे महाआरतीने प्रारंभ होतो. सायंकाळी श्री भगवतीमातेच्या छबीना पालखीची गावातून सवाद्य मिरवणूक काढण्यात येते. यामध्ये ढोलताशे, सनई, चौघडा, नाचगाणे यांचे आकर्षण ठरते. मिरवणुकीत बहुसंख्येने ग्रामस्थ सहभागी होतात.

छबीना मिरवणूक देवी मंदिरात पोहोचल्यानंतर रात्री शोभेच्या दारु कामाची जोरदार आतषबाजी केली जाते. दुसऱ्या दिवशी नामांकित पहिलवानांच्या कुस्त्यांचा जंगी फड भरविला जातो. तसेच लोककलावंतांच्या हजेऱ्या होऊन त्यांना बिदागी वाटप केली जाते. यात्रेनिमित्ताने मंदिर तसेच परिसरात नेत्रदिपक विद्युत रोषणाई केली जाते. मंदिराच्या भव्य प्रांगणात पुजा साहित्य, मिठाई, तांब्यापीतळेची भांडी, खेळणी तसेच स्त्रीयांच्या अलंकार-आभुषणांची दुकाने थाटली जातात. ओटी भरणे, देवीला चोळीपातळ नेसवणे, लिंब नेसणे, लोटांगणे घालणे. नवस फेडणे व इतर विधी येथे मोठ्या उत्साहात पार पाडले जातात. देवीची दररोज पूजा व आरती करुन नैवेद्य दाखविण्यात येतो.

श्री क्षेत्र कोल्हार श्री भगवतीमाता-नवरात्र महोत्सव श्रीभगवतीदेवीचा नवरात्र महोत्सव आश्विन शुध्द प्रतिपदा ते दशमी म्हणजेच घटस्थापना ते विजयादशमीपर्यंत मोठया उत्साहात व भक्तीभावाने साजरा केला जातो.

श्री भगवती मंदिर व परिसरात तसेच गावात मुख्य ठिकाणी नेत्रदिपक विद्युत रोषणाई केली जाते.नवरात्रात दररोज पहाटे सव्वा पाच वाजता काकड आरती व सायंकाळी सव्वा सात वाजता महाआरती होते.नवरात्र काळात दररोज दुर्गा सप्तशती पाठ पठण, जोगवा, देवीची दृष्ट काढणे, स्त्रीयांचा फेर आदिधार्मिक कार्यक्रम मंदिराच्या भव्य सभामंडपात साजरे होतात.नवरात्रकाळात नवस फेडण्यासाठी भाविक सवाद्य मिरवणुकीने देवीस फुलवरा वाहतात.

स्थानिक तसेच बाहेर गावाहून येणारे, नऊ दिवस उपवास करणारे (घटी बसणारे)

स्त्री-पुरुष भाविक मंदिरातच वास्तव्यास असतात.

त्यांची सर्व व्यवस्था मंदिराचे विश्वस्त आणि ग्रामस्थ करतात.

पाचव्या व सातव्या माळेला कोल्हार-भगवतीपूर गावच्या

पाटील परिवाराच्या वतीने देवीस चोळी-पातळ व तळी भरण्याचा मान असतो. यावेळी उपस्थित भाविक व गावकऱ्यांना पानसुपारी दिली जाते.

अष्टमीस नवचंडी होम-हवन (यज्ञविधी) होतो. नवमीस घटविसर्जन होऊन दशमीस महापूजा होते.नवरात्रात देवीस अलंकृत केले जाते. यात सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी होत असतात.

-प्रशांत बाफना, अहिल्यानगर

डीजेचा आवाज श्रवणशक्तीसाठी धोकादायक : डॉ. अमृता जोर्वेकर

शिंदेवाडी शाळेत ३५ विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी

गणोरे (समर्थ गांवकरी)

सण-उत्सव भारतीय संस्कृतीचा महत्त्वाचा भाग असले, तरी उत्सवांमधील वाढता डीजेचा कर्णकर्कश आवाज आणि लेझर लाईट्सचा वापर आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतो. मोठ्या आवाजामुळे श्रवणशक्तीला कायमस्वरूपी इजा होण्याचा, तर लेझर किरणांमुळे डोळ्यांना गंभीर इजा होण्याचा धोका असतो. 'आरोग्य हीच खरी संपत्ती' हे लक्षात ठेवून अशा धोक्यांपासून दूर राहावे, असे आवाहन कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. अमृता सागर जोर्वेकर यांनी विद्यार्थ्यांना केले.

जिल्हा परिषदेच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत नमो सेवा संकल्प उपक्रमातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेवाडी येथे मोफत कान, नाक व घसा तपासणी शिबिर घेण्यात आले. डॉ. जोर्वेकर यांनी ३५ विद्यार्थ्यांची तपासणी केली. यावेळी पाच विद्यार्थ्यांच्या कानात खडे व पेन्सिलचे तुकडे आढळले. संबंधित विद्यार्थ्यांना दवाखान्यात नेऊन या वस्तू मोफत काढण्याची व्यवस्था त्यांनी केली.

कानात पेन्सिल, काडी किंवा अन्य वस्तू घालू नयेत. कान दुखत असल्यास, ऐकू कमी येत असल्यास किंवा कानात काही अडकल्यास स्वतः काढण्याचा प्रयत्न न करता डॉक्टरांकडे जावे, असा सल्लाही त्यांनी दिला.

विस्तार अधिकारी अनिल गायकवाड व केंद्रप्रमुख नितीन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापिका वृषाली सुनील कडलग आणि उपाध्यापिका कल्पना पाटील यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला.अभियानांतर्गत शाळेत चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा, ग्रामस्वच्छता, प्रथमोपचारविषयक माहिती, वृक्षारोपण व जलसंधारण असे उपक्रम राबविण्यात आले. 'नमो सेवा गाथा' उपक्रमात विद्यार्थ्यांनी 'पाण्याची बचत' ही बालनाटिकाही सादर केली. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिगंबर दातीर, शीतल आंबरे, माया आंबरे, अक्षदा आंबरे व गुंजन इंगळे उपस्थित होते.



रुग्णालयांच्या दरपत्रकांवर केंद्राचा भर

- **उपचारांचे दर ठळकपणे प्रदर्शित करण्याचे राज्यांना आवाहन**
- **वैद्यकीय व आयुष व्हिसावर भारतात येणाऱ्या परदेशी रुग्णांसाठीही पॅकेजचे शुल्क**
- **पारदर्शक ठेवण्याचे आवाहन**

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

रुग्णालये आणि वैद्यकीय संस्थांमध्ये उपलब्ध उपचार, सेवा व सुविधांचे शुल्क ठळकपणे प्रदर्शित करण्याची व्यवस्था सुनिश्चित करावी, असे आवाहन केंद्र सरकारने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना केले आहे. यासंदर्भात केंद्रीय आरोग्य सचिव पुण्या सलीला श्रीवास्तव यांनी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून संबंधित नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

रुग्णांना उपचारांच्या संभाव्य खर्चाची स्पष्ट माहिती मिळावी, त्यांना उपचारांबाबत योग्य निर्णय घेता यावा तसेच वैद्यकीय बिलांवरून उद्भवणारे गैरसमज आणि वाद कमी व्हावेत, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. आरोग्यसेवेतील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवून रुग्णांचा आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ करण्यावर केंद्र सरकारने भर दिला आहे.

स्थानिक भाषा आणि इंग्रजीत दर प्रदर्शित करणे बंधनकारक

नैदानिक आस्थापना (नोंदणी व विनियमन) अधिनियम, २०१० आणि त्याअंतर्गत लागू असलेल्या नियमांनुसार, हा कायदा लागू असलेल्या राज्यांतील वैद्यकीय संस्थांनी उपलब्ध सेवा व सुविधांचे दर रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांना सहज दिसतील अशा ठिकाणी प्रदर्शित करणे आवश्यक आहे. हे दर स्थानिक भाषेसह इंग्रजीतही प्रदर्शित करणे अपेक्षित आहे.

ज्या राज्यांमध्ये किंवा केंद्रशासित प्रदेशांमध्ये हा कायदा लागू नाही, तेथे संबंधित राज्यांच्या स्वतंत्र नियामक चौकटींनुसार वैद्यकीय संस्थांचे नियमन केले जाते. या चौकटींमध्येही आरोग्यसेवांचे दर प्रदर्शित करण्यासंबंधी तरतुदी आहेत. आरोग्य हा राज्याच्या अखत्यारीतील विषय असल्याने संबंधित नियमांची अंमलबजावणी आणि देखरेख करण्याची जबाबदारी राज्ये व केंद्रशासित प्रदेशांची आहे.

परदेशी रुग्णांसाठीही पॅकेजची पारदर्शकता

वैद्यकीय उपचारांसाठी तसेच आयुष उपचारांसाठी मेडिकल किंवा आयुष व्हिसावर भारतात येणाऱ्या परदेशी रुग्णांना उपलब्ध उपचार पॅकेजचे दरही ठळकपणे प्रदर्शित करण्यास प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन केंद्राने केले आहे. यामुळे परदेशी रुग्णांना उपचारांचा खर्च समजून घेऊन निर्णय घेणे सोपे होईल. तसेच दर आणि बिलिंगसंदर्भातील तक्रारी कमी होण्यास मदत होऊन वैद्यकीय व आयुष उपचारांसाठी विश्वासार्ह गंतव्य म्हणून भारताची प्रतिमा अधिक बळकट होईल.

संबंधित अधिकाऱ्यांनी वैद्यकीय संस्थांना आवश्यक सूचना देऊन लागू नियमांनुसार दरपत्रके स्पष्टपणे दिसतील आणि सहज उपलब्ध होतील, याची खात्री करावी, असेही केंद्रीय आरोग्य सचिवांनी पत्राद्वारे नमूद केले आहे.

ॲड. अजित तापकीर यांनी मिळवली एलएल.एम. (फौजदारी कायदा) पदवी

मिरजगाव (समर्थ गांवकरी)

ॲड. अजित काकासाहेब तापकीर यांनी फौजदारी कायदा (Criminal Law) या विषयातील एलएल.एम. (LL.M.) ही पदव्युत्तर पदवी संपादन केली असून, नुकत्याच पार पडलेल्या पदवीदान समारंभात त्यांनी ही पदवी प्राप्त केली. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल कायदेविषयक क्षेत्रातील सहकारी, मित्रपरिवार व हितचिंतकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

ॲड. अजित तापकीर यांनी यापूर्वी बी.एस्सी. व एलएल.बी.चे शिक्षण पूर्ण केले असून, कायद्याच्या क्षेत्रात सखोल ज्ञान मिळविण्याच्या उद्देशाने त्यांनी फौजदारी कायद्यात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. सध्या ते पुणे येथे स्वतंत्रपणे वकिली व्यवसाय करत असून, पुणे जिल्हा न्यायालय परिसरात त्यांचे कार्यालय आहे.

त्यांच्या वकिलीच्या काम काजामध्ये फौजदारी, दिवाणी तसेच कौटुंबिक कायद्याशी संबंधित प्रकरणांचा समावेश आहे. जामीन अर्ज, अटकपूर्व जामीन अर्ज, न्यायालयीन युक्तिवाद, कायदेशीर मसुदे तयार करणे आणि पक्षकारांना कायदेशीर सल्ला देणे अशा विविध बाबींमध्ये ते कार्यरत आहेत. न्यायालयीन कामकाजात कायद्याचा सखोल अभ्यास, वस्तुस्थितीचे विश्लेषण आणि प्रभावी युक्तिवाद यांना ते विशेष महत्त्व देतात.



भविष्यातील ध्येयाविषयी बोलताना ॲड. अजित तापकीर म्हणाले, कायद्याच्या क्षेत्रात सातत्याने ज्ञानवृद्धी करून एक सक्षम, अभ्यासू आणि विश्वासार्ह वकील म्हणून स्वतःची ओळख निर्माण करणे हे माझे ध्येय आहे.

कथा नवरात्रीच्या, महिषासुराचा वध, माता चंद्रघंटा

नवरात्र उत्सवात तिसऱ्या दिवशी माता चंद्र घंटा ची पूजा केली जाते, देवी दुर्गेचे हे तिसरे रूप अत्यंत कल्याणकारी शांतताप्रियआणि भक्तांचे सदैव रक्षण करणारे आहे, त्यांच्या मस्तकावर घंटाकृती चंद्र सुशोभित असल्याने तिला चंद्र घंटा हे नाव प्राप्त झाले.

कथा पुष्प ३ रे, माळ तिसरी



माता चंद्रघंटा यांचे स्वरूप

वाहन: माता सिंहारूढ (सिंह) आहे.

स्वरूप: देवीला १० हात आहेत, ज्यात कमळ, धनुष्य, बाण, तलवार, त्रिशूल, गदा यांसारखी शस्त्रे आणि मुद्रा शोभून दिसतात.

चंद्र: त्यांच्या मस्तकावर अर्ध्या चंद्रकोरीचा आकार घंटेसारखा दिसतो ज्यातून नेहमी दैवी प्रकाश आणि सकारात्मक ऊर्जा पसरत असते.

माता चंद्रघंटा यांची पौराणिक कथा

पौराणिक कथेनुसार, जेव्हा स्वर्गलोकात आणि पृथ्वीवर राक्षसांचा (असूरांचा) अत्याचार खूप वाढला होता आणि महिषासुराच्या नेतृत्वाखाली देवांवर मोठे संकट ओढवले होते, तेव्हा सर्व देवगण ब्रह्मदेव, भगवान विष्णू आणि भगवान शंकरांकडे मदतीसाठी गेले.


सर्व देवांच्या शरीरातून एक प्रचंड ऊर्जा आणि तेज बाहेर पडले, ज्यामधून आदिशक्ती माता दुर्गेचा प्रादुर्भाव झाला. महिषासुराचा वध करण्यासाठी भगवान शिवाने देवीला आपले त्रिशूल दिले, विष्णूंनी आपले चक्र दिले, तर इतर देवांनी आपली विविध दिव्य शस्त्रे व आभूषणे देवीला अर्पण केली.

या महायुद्धाच्या वेळी माता दुर्गेने 'चंद्रघंटा' हे रूप धारण केले. त्यांच्या मस्तकावरील घंटेच्या प्रचंड आणि भयानक आवाजाने (नादाने) सर्व दैत्यांमध्ये आणि राक्षसांमध्ये हाहाकार माजला. या घंटेच्या नादाने अनेक मोठे राक्षस निष्प्राण झाले आणि उरलेल्या राक्षसांचा मातेने वध करून देवलोकाला भयमुक्त केले.

माता चंद्रघंटा यांचे कार्य व महत्त्व

भक्तांचे रक्षण: माता चंद्रघंटा आपल्या भक्तांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहून त्यांच्या सर्व प्रकारच्या संकटांचे, भीतीचे आणि रोगांचे निवारण करतात. नकारात्मक ऊर्जा नाशक: मातेच्या मस्तकावरील घंटेचा आवाज ऐकताच नकारात्मक शक्ती, भूत-प्रेत आणि वाईट विचार पळून जातात. धैर्य आणि पराक्रम वृद्धिंगत करणे: या देवीची उपासना केल्यामुळे भक्तामध्ये अद्भूत साहस, आत्मविश्वास आणि संकटाशी सामना करण्याची प्रेरणा मिळते.

वृत्त संकलन, कोतुळ प्रतिनिधी अशोकराव शेळके



भारतीय जनता पार्टी - महाराष्ट्र

दि. 12 ऑक्टोबर, 2026

संपदनात्मक नियुक्ती

सस्नेह नमस्कार,

भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र 'पुणे शिक्षक व पदवीधर निवडणूक 2026 करिता विधानसभा प्रभारी' नियुक्ती करण्यात येत असून ती खालीलप्रमाणे आहे.

क्र.	प्रभारी विधानसभेचे नाव	नाव
1	202-पुरंदर	आ.ॲड.पराग मधुसूदन आळवणी
2	213-हडपसर	आ.योगेश अमृतलाल सागर
3	195-जुन्नर	श्री.मनोज कोटक, माजी खासदार
4	273-कागल	आ.समेश रमेश चव्हाण
5	201-बारामती	आ.सुरेश दादू भोळे (राजुमामा)
6	208-वडगांव शेरी	आ.चिंचा किशोर बाप
7	206-पिंपरी (अ.जा.)	आ.प्रसाद मिनेश लाड
8	272-राधानगरी	आ.प्रमोद शांताराम जठार
9	261-पाटण	आ.डॉ.नेपेश बाबासू म्हाडे
10	287-तासगांव-कवठे महांकाळ	आ.राजन बाळकृष्ण पाईक
11	203-भोर	आ.विक्रांत बाळासाहेब पाटील
12	204-मावळ	आ.संजय केळकर
13	276-कोल्हापूर उत्तर	डॉ.सुजय विखे पाटील, माजी खासदार
14	196-आंबेगांव	आ.विवेक बिरोबादादा कोल्हे
15	198-शिरूर	आ.विक्रमसिंह बबनराव पाचपुते
16	200-इंदापूर	आ.अतुल ओमप्रकाश अग्रवाल
17	197-खेड आळंदी	आ.ॲड.माधवी संजय नाईक
18	283-शेंद्रूर	मा.कुणाल पाटील, माजी आमदार
19	285-पलूस-कडेगांव	आ.प्रशांत रामगोंड ठाकूर
20	275-करवीर	आ.श्रीकांत पंडीतराव भारतीय
21	253-सांगोले	आ.राजेश उदेसिंग पाडवी
22	254-माळशिरस (अ.जा.)	आ.अमोल हरिभाऊ जावळे
23	256-वाई	आ.सीमा महेश हिरे
24	245-माढा	आ.रणवीर मनोहर पाटील
25	247-मोहोळ (अ.जा.)	आ.डॉ.राहुल दौलतराव आहेर

ही नियुक्ती तात्काळ लागू करण्यात येत आहे.

मन:पूर्वक अभिनंदन !

आपला,

(रविंद्र चव्हाण)

प्रदेशाध्यक्ष, भाजपा महाराष्ट्र

डॉ. सुजय विखे पाटील यांच्याकडे कोल्हापूर उत्तरची धुरा!

पुणे शिक्षक व पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर भाजपकडून महत्त्वपूर्ण संघटनात्मक जबाबदारी

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्यावर पक्षाने आणखी एक महत्त्वपूर्ण संघटनात्मक जबाबदारी सोपविली आहे. पुणे शिक्षक व पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर त्यांची कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघाच्या प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी १२ ऑक्टोबर २०२६ रोजी जारी केलेल्या नियुक्तीपत्रातून ही घोषणा केली आहे.

डॉ. सुजय विखे पाटील यांच्याकडे यापूर्वीच भाजपाच्या प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी आहे. त्याचबरोबर आयुष्मान भारत प्रकोष्ठच्या प्रभारी जबाबदारीही त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. आता पुणे शिक्षक व पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या अनुषंगाने कोल्हापूर उत्तर विधानसभा प्रभारीपदाची जबाबदारी देण्यात आल्याने त्यांच्या संघटनात्मक कार्यक्षेत्रात आणखी विस्तार झाला आहे.

पक्षाच्या संघटनात्मक रचनेत विविध स्तरांवर जबाबदाऱ्या सोपविताना स्थानिक पातळीवरील समन्वय, कार्यकर्त्यांची बांधणी आणि निवडणुकीचे नियोजन यांना महत्त्व असते. कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघाची प्रभारी म्हणून काम करताना डॉ. सुजय विखे पाटील यांच्यावर या प्रक्रियेत समन्वय साधण्याची जबाबदारी असेल.

भाजपाकडून राज्यातील विविध विधानसभा मतदारसंघांसाठी प्रभारींच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. या यादीत कोल्हापूर उत्तर मतदारसंघासाठी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या नावाचा समावेश आहे. पक्षाने त्यांच्यावर सोपविलेली ही नवी जबाबदारी आगामी निवडणुकीच्या संघटनात्मक नियोजनाच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे.

प्रदेश उपाध्यक्षपद, आयुष्मान भारत प्रकोष्ठची जबाबदारी आणि आता कोल्हापूर उत्तर विधानसभा प्रभारीपद, अशा विविध स्तरांवरील जबाबदाऱ्यांच्या माध्यमातून डॉ. सुजय विखे पाटील यांच्याकडे पक्षसंघटनेने महत्त्वपूर्ण भूमिका



थोडक्यात पण महत्वाचे

हंडिनिमगाव येथे साईनाथ ग्रुपच्या नवरात्रोत्सवाला आमदार खासदारांच्या उपस्थितीत शुभारंभ



नेवासा (समर्थ गांवकरी)

नेवासा तालुक्यातील हंडीनिमगाव येथील साईनाथ ग्रुप आयोजित शारदीय नवरात्र उत्सवाला खासदार भाऊसाहेब वाकचौरे व आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत श्री रमेशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते घटस्थापना करून शुभारंभ करण्यात आला. साईनाथ ग्रुपच्या वतीने मोहटादेवी या ठिकाणावरून पायी ज्योत प्रज्वलीत करून आणण्यात आली.या ज्योतीचे पूजन नेवासाफाटा येथील राजमुद्रा चौकात महंत सुनिलगिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर सदर ज्योतीची मिरवणूक काढण्यात आली.शारदीय नवरात्र निमित्त आमदार विठ्ठलराव लंघे व खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या हस्ते भव्य लकी ड्रॉ सोडत होऊन काढण्यात येऊन विजेत्या अकरा महिलांना बक्षीस वितरण करण्यात आले. आमदार विठ्ठलराव लंघे व खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी नेवासा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही सदैव कटीबद्ध असून हातात हात घालून काम करण्याची ग्वाही दिली. या प्रसंगी नवनाथ साळुंके, शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख बाळासाहेब पवार,मुकुंद शिनगर,संभाजीनगर येथील अनिल साळुंके,सुरेशनगरचे सरपंच कल्याणराव उभेदळ,केशर उद्योग समूहाचे उद्योजक सुरेशराव उभेदळ, हंडीनिमगाव सोसायटीचे चेअरमन बाळासाहेब साळुंके, किरण गरड,कुणाल पिसाळ,शुभम साळुंके,किरण जाधव यांच्यासह ग्रामस्थांसह मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब पिसाळ यांनी केले तर साईनाथ ग्रुपचे अध्यक्ष किरण जाधव यांनी आभार मानले.

स्वीडनच्या उद्योजकांनी महाराष्ट्रात उद्योग उभारावे : मंत्री जयकुमार रावल

मुंबई (समर्थ गांवकरी)

स्वीडनमधील प्रगत तंत्रज्ञान आणि महाराष्ट्राची उत्पादन क्षमता यांची सांगड घालून स्वीडनच्या उद्योजकांनी राज्यात आधुनिक तंत्रज्ञानाधारित उद्योग उभारावेत. मुंबई–पुण्याबरोबरच महाराष्ट्रातील इतर भागांतही गुंतवणूकदारांनी पुढे यावे. त्यांना आवश्यक त्या सर्व सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असे आश्वासन राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी दिले. स्वीडनच्या राजदूत मिस पेट्रा मेनांडर यांनी मुंबई भेटी दरम्यान सह्याद्री अतिथीगृह येथे मंत्री जयकुमार रावल यांची सदिच्छा भेट घेतली.



यावेळी महाराष्ट्र आणि स्वीडन यांच्यातील औद्योगिक गुंतवणूक, संरक्षण उत्पादन, एरोस्पेस, कृत्रिम बुद्धिमत्ता, कृषी व दुग्धव्यवसाय क्षेत्रांतील सहकार्याबाबत चर्चा झाली. पुणे ते नाशिकदरम्यान स्वीडिश कंपन्यांसाठी औद्योगिक समूह विकसित करून आवश्यक पायाभूत सुविधा व निवासव्यवस्था उपलब्ध करण्याच्या शक्यतेवर यावेळी विचारविनिमय झाला. यामुळे राज्यातील विविध भागांत औद्योगिक विकासाच्या नव्या संधी निर्माण होतील, असे मंत्री रावल यांनी नमूद केले. स्वीडनमधील आधुनिक तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील उद्योगांमध्ये वापर वाढविणे, कौशल्य आणि तंत्रज्ञान हस्तांतरणातून स्थानिक उत्पादन क्षमता व मूल्यवर्धनाला चालना देणे, तसेच आधुनिक दुग्धव्यवसाय तंत्रज्ञानाचा राज्यातील शेतकऱ्यांना लाभ मिळवून देणे यावरही यावेळी चर्चा झाली. त्याचबरोबर, दोन्ही देशांतील विद्यार्थी, संशोधक व शेतकरी यांच्यात अनुभवांची देवाणघेवाण वाढविण्याबाबत विचारविनिमय करण्यात आला. महाराष्ट्र आणि स्वीडन यांच्यातील औद्योगिक संबंध अधिक दृढ करून राज्यात गुंतवणुकीच्या नव्या संधी निर्माण करण्यावर तसेच सांस्कृतिक देवाण–घेवाण वाढविण्यावर यावेळी चर्चा करण्यात आली.

बुधवार १४ ऑक्टो रोजी थोरात सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगाम शुभारंभ

संगमनेर (समर्थ गांवकरी)



देशातील सहकारासाठी दीपस्तंभ असलेल्या सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२६–२७ या गळीत हंगामाचा शुभारंभ बुधवार दिनांक १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात व सौ कांचनताई थोरात यांच्या शुभहस्ते तर मा आमदार डॉ सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे व डॉ जयश्रीताई थोरात यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला असल्याची माहिती व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना पांडुरंग पाटील घुले म्हणाले की या वर्षीचा गळीत हंगाम हा कारखान्याचा ६० वा गणित हंगाम आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याने कायम ऊस उत्पादक शेतकरी कामगार यांचे हित जोपासले आहे. कार्यक्षेत्राबाहेरील शेतकऱ्यांचा मोठा विश्वास संपादन केला आहे. सातत्याने चांगला भाव दिला आहे. सन २०२६ २७ या गळीत हंगामाचा शुभारंभ बुधवार दिनांक १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९ वा. होणार आहे यावेळी काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, मा आ डॉ सुधीर तांबे, सौ.कांचनताई थोरात, सौ दुर्गाताई तांबे, आमदार सत्यजित तांबे, ड माधवराव कानवडे, बाबा ओहोळ, डॉ जयश्रीताई थोरात, रणजितसिंह देशमुख, शंकरराव खेमनर, डॉ मैथिलीताई तांबे,संपतराव डोंगरे ,सुधाकर जोशी, हौशीराम सोनवणे, रामहरी कातोरे, अजय फटांगरे ,सोमेश्वर दिवटे, नूर मोहम्मद शेख, सौ अर्चना बालोडे, लक्ष्मणराव कुटे, राजेंद्र चकोर, राजेंद्र कडलक, राजेंद्र गुंजाळ, प्रा बाबा खरात, गणपतराव सांगळे ,रामदास वाघ, इंद्रजीत भाऊ थोरात, शरद नाना थोरात,सुभाष सांगळे, निखिल पापडेजा, गौरव डोंगरे ,हैदर अली, अमोल शेलकर, यांच्यासह संगमनेर तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

तरी या गळीत हंगामासाठी सर्व सभासद, ऊस उत्पादक शेतकरी पदाधिकारी कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सर्व संचालक मंडळ व कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी केले आहे.

आनंदवाडीच्या मायराची जागतिक भरारी!

सहा जागतिक विक्रमांची नोंद; विविध स्तरांतून कौतुकांचा वर्षाव

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)



अवघ्या सहा वर्षांच्या मायरा सोनाली निलेश जाधव हिने स्केटिंग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. मूळची अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील आनंदवाडी येथील रहिवासी असलेल्या मायराने आपल्या जिद्द, मेहन,आणि चिकाटीच्या सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण केली आहे.

मायराने ३१ मे २०२६ रोजी बेळगाव, कर्नाटक येथे झालेल्या स्पर्धेत १०० मीटर फास्टेस्ट बॅकवर्ड इनलाइन स्केटिंग या प्रकारात अवघ्या १७.९३ सेकंदांत १०० मीटर अंतर पूर्ण करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड नोंदवला. इतक्या कमी वयात मिळवलेले हे यश क्रीडाक्षेत्रासाठी अभिमानास्पद आणि प्रेरणादायी ठरत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मायराच्या नावाची आतापर्यंत सहा वेगवेगळे जागतिक विक्रमात नोंद झाली आहे.

गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड, युनायटेड नेशन्स वर्ल्ड रेकॉर्ड, कॉन्टिनेन्टल वर्ल्ड रेकॉर्ड,

ग्लोबल टॅलेंट बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स,

युनिव्हर्सल स्पोर्ट्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स, एलिट लेजेंड्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स,याशिवाय मायराने विविध राष्ट्रीय स्तरावरील स्केटिंग स्पर्धांमध्ये सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदके मिळवून आपल्या कौशल्याची छाप क्रीडाक्षेत्रात उमटवली आहे.

मायराच्या या यशामागे तिचे पालक, प्रशिक्षक आणि एस. बी. के. स्केटिंग अकॅडमी यांचे मोलाचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले आहे. नियमित सराव, संतुलन, वेगावर नियंत्रण, एकाग्रता आणि कठोर मेहनतीच्या जोरावर तिने हे यश संपादन केले आहे.

मायराच्या या उल्लेखनीय कामगिरीची विविध स्तरांतून दखल घेतली जात असून, अवघ्या सहा वर्षांच्या मायराने जागतिक स्तरावर मिळवलेले हे यश म्हणजे जिद्द, मेहनत, चिकाटी आणि स्वप्नपूर्तीचे प्रेरणादायी उदाहरण आहे.



अहिल्यानगर (स.गांवकरी):– तुळजाभवानी मातेच्या पलंगाचे अहिल्यानगर मध्ये भारत चौकात आदर्श मित्र मंडळाच्या वतीने प्रशांत सराईकर, विशाल मस्के, जिल्हाध्यक्ष शिवप्रहार संघटना,गजु भांडवलकर, जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी कामगार संघटना,साहेबराव पाचरणे महाराष्ट्र अध्यक्ष, विश्व वारकरी संघटना यांनी केले.



अहिल्यानगर (स.गांवकरी):– नगरमधील सिव्हिल हडको मधील प्रवीण रणखांब परिवार च्या वतीने तुळजाभवानी मातेच्या पलंगाचे स्वागत व पूजा करून पलंग धारकांना भोजन देण्यात आले.





अहिल्यानगर (स.गांवकरी):– तुळजाभवानी मातेच्या पलंगाचे अहिल्यानगर मध्ये भारत चौकात आदर्श मित्र मंडळाच्या वतीने प्रशांत सराईकर , विशाल मस्के ,जिल्हाध्यक्ष शिवप्रहार संघटना,गजु भांडवलकर, जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी कामगार संघटना,साहेबराव पाचरणे महाराष्ट्र अध्यक्ष, विश्व वारकरी संघटना यांनी केले.

डिकसळकर सराफ मिरजगाव शहराच्या वैभवात भर टाकणारे ठरेल

डिकसळकर सराफाच्या नवीन दालनाचा भव्य शुभारंभ

कर्जत (समर्थ गांवकरी)

डिकसळकर सराफ ज्वेलर्स समूहाने नेहमीच ग्राहकाचा विश्वास जपला आहे नवीन दालनाच्या माध्यमातून त्यांनी शुद्धता आणि उत्कृष्ट सेवेची परंपरा या भागात आणल्या जी कौतुकास्पद असून हे नवीन दालन मिरजगाव शहराच्या वैभव नक्कीच भर टाकणारे ठरेल, असे प्रतिपादन कर्जत पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रशांत बुद्धीवंत यांनी केले...

कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथे डिकसळकर सराफ ज्वेलर्स या भव्यदिव्य नवीन दालनाचा भव्य उदघाटन सोहळा रविवारी दि.११ रोजी नवरात्रीच्या घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर सराफाचे संचालक पांडुरंग बुऱ्हाडे यांच्या मातोश्री व वडील माणिकराव बुऱ्हाडे यांच्या शुभ हस्ते नुकताच संपन्न झाला.

या उद्घाटन सोहळा कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

डिकसळकर सराफ या नवीन दालनामुळे सुवर्ण नगरीतील ग्राहकांना शुद्धता पारदर्शकता आणि अत्याधुनिक डिझाईन्सचे दागिने एकाच छताखाली उपलब्ध होणार असून नवीन दालनामुळे ग्राहकांना खरेदीचा नवा आणि दर्जेदार अनुभव मिळणार आहे..

या भव्य शोरूम मध्ये नवीन डिझाइन्स आणि आकर्षक दागिन्यांच्या अनेक व्हरायटी ग्राहकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

या कार्यक्रमासाठी माजी पंचायत समितीचे उपसभापती प्रशांत बुद्धीवंत, माजी पंचायत समिती सदस्य डॉ.पंढरीनाथ आबा गोरे, काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष सतिष पाटील, बाजार समितीचे माजी संचालक संपतराव बावडकर, माजी सरपंच सारंग घोडेस्वार, जयसिंग थेटेपाटील, गुरवपिंप्रीचे माजी सरपंच कोंडीराम खामगळ, डॉ.रामदास सूर्यवंशी, बाळासाहेब घोडेस्वार, सोमनाथ बनकर, तानाजी पिसे, दादा तनपुरे, हमीद शेख, व्यापारी अशोक काकडे, विशाल काकडे, दीपक बगाडे, राजुशेठ कटारिया, सतीश क्षिरसागर, डिकसळकर सराफाचे संचालक पांडुरंग बुऱ्हाडे, प्रभाकर बुऱ्हाडे यांच्यासह मिरजगाव शहरातील सर्व व्यापारी, गुरवपिंप्री, थेटेवाडी, डिकसळ, घुमरी, पिंपरी, बेलगाव, कोकणगाव, मांदळी, चांदे बुद्रुक, कोंभळी, थेरगाव, रातंजन तिखी व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



विहिंप, मंदिर अर्चक पुरोहित आयामाच्या वतीने सामुदायिक श्राद्ध (तर्पण) विधी संपन्न

पितरांचे पूजन हिंदू धर्मातील पवित्र पुण्य कर्म : राधेशाम कुलकर्णी

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर (स.गांवकरी):– भाद्रपदातील संपूर्ण वद्य पक्ष पूर्वजांसाठी समर्पित करण्यात आला आहे. या पक्षात दिवंगत पूर्वज किंवा पितर या काळात स्वर्गलोकातून पृथ्वीवर येतात, असा समज आहे.श्रद्धेने केले जाणारे दिवंगत व्यक्तींचे, पूर्वजांचे ऋण फेडण्यासाठी श्राद्ध विधी करणे आवश्यक आहे. म्हणून विश्व हिंदू परिषद, मंदिर अर्चक पुरोहित आयामाच्या वतीने हिंदू समाज बांधवांसाठी सामुदायिक श्राद्ध विधीचे आयोजन करण्यात आले होते.

लालटाकी येथील खाकीदास बाबा मठ येथे या सामुदायिक श्राद्ध तर्पण विधीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कॅप्टन सुधीर पुंड व हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष अँड. अनंत फडणीस यांचे हस्ते भारतमाता प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी पौरोहित्य ड.सचिन पाठक गुरुजी यांनी केले.

या कार्यक्रमास अहिल्यानगर शहरातील भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हिंदू धर्मात पवित्र समजल्या जाणाऱ्या या श्राद्धविधीमुळे पुण्यकर्माचा संचय होतो,असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे राधेश्याम कुलकर्णी यांनी केले.

हरिभाऊ डोळसे म्हणाले,आज अनेक कुटुंबांना स्वतंत्रपणे श्राद्ध करणे शक्य होत नाही, काहींना विधी माहित नाही, तर काही शहरात एकटे राहतात. म्हणूनच आम्ही गेल्या वर्षी संकल्प केला होता की, समाजातील सर्वांसाठी एकत्रितपणे शास्त्रोक्त पद्धतीने तर्पण घडावे. पितरांच्या आशीर्वादाशिवाय कोणतीही प्रगती शक्य नाही. ही फक्त पूजा नाही, तर आपल्या मुळाशी जोडले जाण्याची संधी आहे. सर्वांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वी झाला, पुढील वर्षी अधिक मोठ्या प्रमाणात करू.

सुनील खिस्ती म्हणाले,भारतीय संस्कृती ही कृतज्ञतेची संस्कृती आहे. आपण देव ऋण,ऋषी ऋण आणि पितृ ऋण या तीन ऋणातून मुक्त होण्यासाठी प्रयत्न करतो.आजच्या धकाधकीच्या काळात आपण आपल्या पूर्वजांना विसरत चाललो आहोत.पितृपक्ष हा आपल्याला आपल्या जबाबदारीची जाणीव करून देतो.विश्व हिंदू परिषदेने हा जो सामुदायिक उपक्रम सुरू केला आहे,तो अतिशय स्तुत्य आहे.यामुळे हिंदू समाज एकत्र येतो आणि आपल्या संस्कारांचे जतन होते. संघाचेही हेच ध्येय आहे – समाज संघटित व्हावा आणि धर्म जागृत राहावा.

श्रीकांत नांदापूरकर म्हणाले, हरिभाऊ डोळसे यांच्या संकल्पनेतून सामुदायिक श्राद्ध या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पितरांचे पूजन हा हिंदू धर्मासाठी महत्त्वाचा विधी समजला जातो. सर्व पित्री अमावस्येला सामुदायिक श्राद्ध करण्यात येते.सर्वांना पुण्य कर्म करता यावे.यासाठी विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर अर्चक पुरोहित आयामाच्या वतीने हा कार्यक्रम घेण्यात आला आहे.

या कार्यक्रमासाठी विहिंप जिल्हा मंत्री अनिल जोशी, विभाग मंत्री सुनील खिस्ती, जेष्ठ मार्गदर्शक मिलिंद मोभारकर, विश्व हिंदू परिषद, मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे, जिल्हा संपर्कप्रमुख श्रीकांत नांदापूरकर, हरिभाऊ डोळसे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, जिल्हा सहमंत्री शरद नगरकर, भारतीय जनता पार्टीचे मुकुल गंधे, अशोक गायकवाड, हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष अॅड. अनंत फडणीस, मनोहर भाकरे, इंजिनीयर चंद्रकांत पुंड, कॅप्टन सुधीर पुंड, रा.स्व.संघाचे राधेश्याम कुलकर्णी, अरुण खिची, मोहनराव पाठक, अनंत होशिंग, उदय जोशी, अॅड. देवेंद्र बंब, रमेश देशमुख, धनंजय महाजन, दीपक कुलकर्णी, महेश देशपांडे, अनिता गिते, अंजली गिते, अभय गोले, धर्माधिकारी रमेश, राजहंस देसाई, अमित डावरे, रवि वैराळ, संजय, ओंकारेश्वर झावरे, विशाल बुंदेले, दत्तात्रय धोडपकर, सुधाकर घोरपडे, पोपटराव शिंदे, बापू बराटे, सतिश श्रीसागर, राजेंद्र चुंबळकर, सुरेंद्र सोनवणे,अजय ठोकळ, निलेश चिपाडे आदी उपस्थित होते.



या कार्यक्रमासाठी खाकीदास बाबा मठ (ट्रस्ट)चे अध्यक्ष चंद्रकांत काबरा व विश्वस्त मनोज मुंदडा व सर्व विश्वस्त यांचे विशेष सहकार्य लाभले. शेवटी गजेंद्र सोनवणे यांनी सर्वांचे आभार मानले.

थोडक्यात पण महत्त्वाचे

मोहटादेवी गडावर शारदीय नवरात्र महोत्सवाची भक्तिमय वातावरणात घटस्थापना



पाथर्डी (समर्थ गांवकरी)

दुष्काळाचे सावट दूर होऊन पाऊस पडावा, यासाठी आई जगदंबेच्या चरणी साकडे; भाविकांसाठी देवस्थानकडून विविध सुविधा श्रीक्षेत्र मोहटादेवी गडावर रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी शारदीय नवरात्र महोत्सवाची घटस्थापना वेदमंत्रांच्या घोषात आणि मंगलवाद्यांच्या निनादात भक्तिमय वातावरणात करण्यात आली. यानिमित्ताने श्री जगदंबा मोहटादेवीचा सुवर्ण मुखवट्यासह विविध अलंकारांचे पूजन करून सकाळी आठ वाजता मोहटे गावातून सवाद्य मिरवणुकीने देवीचा मुखवटा गडावर आणण्यात आला. सकाळी अकरा वाजता विधिवत महाभिषेक व घटस्थापना पार पडली. यावेळी देवीच्या मूर्तीसह संपूर्ण मंदिर परिसराची विविध फुलांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती. देवस्थानचे अध्यक्ष तथा धर्मादाय उप आयुक्त, अहिल्यानगर नवनाथ जगताप व त्यांच्या पत्नी सुजाता जगताप यांच्या हस्ते देवीचा महाभिषेक होऊन घटस्थापना करण्यात आली. यावेळी अध्यक्ष नवनाथ जगताप यांनी महाराष्ट्रात निर्माण झालेली दुष्काळजन्य परिस्थिती दूर होऊन भरपूर पाऊस पडावा, अशी आई जगदंबेच्या चरणी प्रार्थना केली. तसेच सर्व भाविक भक्तांना सुख, समृद्धी आणि आनंदाचे दिवस लाभावेत, महाराष्ट्रातील बळीराजा सुखी होऊ दे, असे साकडे त्यांनी देवीला घातले. या धार्मिक सोहळ्यास देवस्थानचे विश्वस्त अशोक दहिफळे, बाबासाहेब दहिफळे, शुभम दहिफळे, शशिकांत दहिफळे, ॲड. विक्रम वाडेकर, ॲड. कल्याण बडे, ॲड. प्रसन्न दराडे, बाळूशेट लाहोटी आदी उपस्थित होते. पौरोहित्य भूषण साकरे, भास्कर देशपांडे व विकास क्षीरसागर यांनी केले. मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, देवस्थानचे कर्मचारी आणि हजारो भाविक भक्त यावेळी उपस्थित होते.

तुळजाभवानी देवीचा पलंगाचे मानकऱ्यांनी केले नगर शहरात स्वागत व पूजा



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर (स.गांवकरी):– घोडेगाव ते तुळजापूर' पर्यंतच्या तुळजाभवानीच्या पलंग प्रवासाची परंपरा तेराव्या शतका पासून अव्याहत सुरू आहे. दळणवळणाची कोणतीही साधने नसण्याच्या कालखंडापासून भवानी मातेच्या पलंगाच्या प्रवासाची परिक्रमा सुरू आहे. तुळजाभवानी देवीचा पलंग तुळजापूरला घेऊन जाण्याचा मान परंपरेने नगर शहरातील सबजेल चौकातील तुळजाभवानी मातेच्या मंदिराचे पलंगे घराण्याला आहे. या घराण्याकडे या पलंगाची सेवा करण्याची परंपरा असल्याने त्याचे आडनाव पलंगे पडले आहे. सबजेल चौकातील तुळजाभवानी मातेच्या मंदिरमध्ये पलंगाचे आगमन झाले यावेळी मोठ्या संख्नेने भाविक उपस्थित होते. गणेश,उमेश ,अभिषेक,प्रफुल्ल,प्रथमेश पलंगे या मुख्य मानकऱ्यांनी स्वागत केले.तर शीतल, रोहिणी, सविता,मंगल,ज्योती,गयाबाई,पार्वती या पलंगे घरातील महिलासह परिसरातील महिलांनी पारंपरिक पद्धतीने पलंगाचे पूजा–अर्चा व महाआरती केली. यावेळी नगर ते तुळजापूर पलंग पायी आपल्या डोकयावर घेऊन जाणारे चिचोंडी पाटील,ता नगर व आष्टी तालुक्यातील लोणी सय्यदमीर, खुंटेफळ (वाटेफळ),पुंडी येथील देवीचे सेवेकरी उपस्थित होते.रात्री पलंगाचा मुक्काम मंदिरात राहिला व आज दुपारी पलंग शहरात पुढे मिरवणुकीसाठी मार्गस्थ झाला.

स्वरा वाघमारे गोळा फेक स्पर्धेत प्रथम

विभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेतील खेळाडू स्वरा भानुदास वाघमारे हिने गोळा फेक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला . तिची विभागस्तर शालेय मैदानी स्पर्धे साठी निवड झाली आहे . महाराष्ट्र राज्य क्रीडा युवा सेवा संचनालय पुणे , अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने लोणी प्रवरा येथे जिल्हास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेचे आयोजन केले होते .



यामध्ये १४ वर्ष वयोगटात स्वरा वाघमारे हिने ७ . ५६ मीटर गोळा फेकून प्रथम क्रमांक पटकावला . ती पुणे येथे होणाऱ्या पुणे विभागस्तर शालेय मैदानी स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. १७ वर्ष वयोगटात पायल संभाजी लामखडे हिने तिहेरी उडीत तृतीय क्रमांक पटकावला. देवदैठणच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवणाऱ्या स्वरा व पायलचे सर्वत्र कौतुक होत आहे.

ज्ञानेश्वर सहकारी कारखान्याचे १३ लाख मॅट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

यंदाच्या गळीत हंगामात लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याने १३ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले असून, हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, अधिकारी आणि कामगारांनी सामूहिक प्रयत्न करण्याचे आवाहन कारखान्याचे अध्यक्ष तथा माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांनी केले.

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या ५३व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन व ऊस गळीत हंगामाचा शुभारंभ सोमवारी (दि. १२) सकाळी १०.३० वाजता झाला. कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांच्या हस्ते हा सोहळा पार पडला. यावेळी जिल्हा सहकारी बँकेचे संचालक तथा माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील, संत ज्ञानेश्वर संस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, ड. देसाई देशमुख आणि कारखान्याचे उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यानंतर आयोजित सभेत घुले पाटील बोलत होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कारखान्याचे संचालक प्रसाद पटारे व सौ. गौरी पटारे तसेच बॉयलर अटेंडंट संजय नवले व सौ. वैशाली नवले यांच्या हस्ते बॉयलर पूजन करण्यात आले. संचालक जनार्दन शेळके व सौ. शांताबाई शेळके यांच्या हस्ते ऊस गव्हाण पूजन करण्यात आले. शेतकी ओव्हरशीअर शरद गव्हाणे व सौ. शिल्पा गव्हाणे यांच्या हस्ते ऊस वजनकाट्याचे विधिवत पूजन करण्यात आले.

नरेंद्र घुले पाटील म्हणाले, अल निनोचा परिणाम सर्व देशावर झाला असून त्याला आपणही अपवाद नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाताना एकमेकांना प्रेरणा देत आपल्यातील कौशल्य आणि गुणवत्तेचा वापर या सहकारी संस्थेसाठी जास्तीत जास्त कसा करता येईल, हे आता आपल्या हातात आहे. १३ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करण्याची गरज आहे.

ते पुढे म्हणाले, कोणी कुठेही वजन केले तरी आपल्या वजनकाट्यावरील ऊस वजनात एक किलोचाही फरक पडणार नाही, इतकी अचूकता आपल्या वजनकाट्यात आहे. पश्चिम वाहिनी नद्यांचे अरबी समुद्रात वाहून जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविल्यास कमी खर्चात गुरुत्वाकर्षणाच्या माध्यम ातून पाणी उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे नगर, नाशिकसह म राठवाड्यातील दहा जिल्ह्यांचा दुष्काळ कायमस्वरूपी दूर करण्यास मदत होईल, असेही घुले पाटील यांनी सांगितले.

संत ज्ञानेश्वर संस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग आणि माजी संचालक ड. देसाई देशमुख यांनी यावेळी म ार्गदर्शन केले. यावेळी कारखान्याचे माजी संचालक काशिनाथ नवले, पद्माकर मते, शिवाजीराव कोलते, सखाराम लव्हाळे, विष्णू जगदाळे, रावसाहेब निकम, ज्ञानदेव दहातोंडे, चंद्रकांत गरड, विद्यमान संचालक डॉ. नारायण म्हस्के, पंडितराव भोसले, अशोकराव मिसाळ, दत्तात्रय काळे, जनार्दन कदम, मच्छिंद्र म्हस्के, बबनराव भुसारी, ड. हिम्मतसिंह देशमुख, अमोल अभंग, विकास नन्नवरे, संतोष पावसे, जनार्दन शेळके, दादासाहेब कोकणे, प्रसाद पटारे, रामनाथ राजपुरे, गोरक्षनाथ भेंडेकर, बाळासाहेब खरड, तज्ज्ञ संचालक रवींद्र नवले, काम गार संचालक सुखदेव फुलारी, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे आणि जनरल मॅनेजर रविंद्र मोटे व्यासपीठावर उपस्थित होते.

माजी जिल्हा परिषद सदस्य दत्तात्रय काळे, माजी पंचायत समिती सदस्य अजित मुरकुटे, घुले पाटील पतसंस्थेचे अध्यक्ष बबनराव धस, डॉ. शिवाजी



शिंदे, मोहनराव गायकवाड, गणेश गव्हाणे, नामदेव निकम, बलभीम फुलारी, किसन यादव, संदीप फुलारी, संभाजीराव माळवदे, शेषराव साबळे, बाबूलाल पटेल, दत्तात्रय माळवदे, जनार्दन कदम, भानुदास कावरे, काकासाहेब लबडे, रामदास काळे, नारायण गढेकर, दादा गजरे, बाळासाहेब वाघडकर, अंबादास गोंडे, दत्तात्रय खाटीक, अशोक दुकळे, संभाजी आगळे, बाबासाहेब आगळे, राजू परसय्या, दत्तात्रय विधाटे, आप्पासाहेब देशमुख, सुदाम खाटीक, राम घुमरे, आबासाहेब ताकटे, गोरक्षनाथ बर्गे, संभाजी पवार, दादासाहेब वाबळे, बाबासाहेब आगळे, संतोष म्हस्के, हरिभाऊ नवले, अशोक मेरड, किशोर मिसाळ, ॲड. रवींद्र गव्हाणे, पुरुषोत्तम सर्जे, सोपान महापूर, भारत गुंजाळ, विनोद ढोकणे, सुभाष म्हस्के, शरद मिसाळ, शंकर निकम, हनुमान पातकळ, गणेश खंबरे, भाऊसाहेब चेके, शहादेव खोसे, तुकाराम विघ्ने, दिलीप कुंढारे, विश्वनाथ मते आणि पोपट मते उपस्थित होते.

तसेच कारखान्याचे मुख्य शेतकी अधिकारी सुरेश आहेर, तांत्रिक सल्लागार एम. एस. मुरकुटे, एस. डी. चौधरी, महेंद्र पवार, भगवंता शेंडगे, सुधाकर ढाकणे, वर्क्स मॅनेजर राहुल पाटील, चीफ इंजिनिअर नंदकुमार चोथे, चीफ केमिस्ट सतीश शिंदे, प्रशासकीय अधिकारी कल्याण म्हस्के, मुख्य लेखापाल रामनाथ गरड, पर्यावरण अधिकारी राजेश वावरे, कामगार अधिकारी बाळासाहेब डोहाळे, लीगल ऑफिसर सुनील शिंदे, राजेंद्र काकडे, नामदेव मुळे, विवेक जगदाळे यांच्यासह सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, विविध संघटनांचे पदाधिकारी, अधिकारी, कामगार व कार्यकर्ते उपस्थित होते.

कारखान्याचे उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे पाटील यांनी प्रास्ताविक केले. भाऊसाहेब सावंत यांनी सूत्रसंचालन केले. संचालक रामनाथ राजपुरे यांनी आभार मानले.

प्रारूप मतदार यादीवर दावे व हरकती दाखल करण्यास २६ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रात १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीच्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत ३१ ऑगस्ट, २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीसाठी दावे व हरकती सादर करण्याच्या मुदतीत भारत निवडणूक आयोगाने पुन्हा वाढ केली आहे. त्यानुसार, आता नागरिकांना २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत दावे व हरकती दाखल करता येणार आहेत. अंतिम मतदार यादी मात्र पूर्वीच्या वेळापत्रकानुसार १६ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या सुधारित वेळापत्रकानुसार, दावे व हरकती सादर करण्याचा २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत सादर करता येतील. तसेच नोटीस टप्पा आणि दावे व हरकती निकाली काढण्याची प्रक्रिया १० नोव्हेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर १६ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल.

मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, नोंदींमध्ये दुरुस्ती करणे तसेच आवश्यकतेनुसार हरकती दाखल करण्यासाठी ही मुदतवाढ महत्वाची आहे. त्यामुळे पात्र नागरिकांनी या वाढीव मुदतीचा लाभ घेऊन आपले दावे व हरकती विहित वेळेत सादर करावेत, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने केले आहे.

दुर्गाभवानी ज्योतींचे स्वागत करत नेवासा शहरात भक्तिमय वातावरणात घटस्थापना



नेवासा (समर्थ गांवकरी)

नेवासा येथे विविध मंडळाच्या वतीने देवींच्या आदी स्थानावरून आणण्यात आलेल्या दुर्गा भवानी ज्योतींचे नेवासा नगरीत उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

यावेळी शहरातील देवींच्या मंदिरात जाऊन ज्योतीने ज्योत प्रज्वलित करण्यात आली. नेवासा शहर व परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात घटस्थापना करण्यात आली.

नेवासा शहरात विविध तरुण मंडळाच्या वतीने आणलेल्या ज्योतीचे नेवासकरांनी चौकाचौकात उत्स्फूर्त स्वागत केले. ढोलताशांच्या गजरात आई जगदंबेच्या नावाने जयघोष करत शेकडो देविभक्तांनी विविध ठिकाणाहून आणलेल्या ज्योती दुर्गादेवी मंदिरात दर्शनासाठी आणल्या.

दुर्गाभवानी ज्योतीचे नेवासा शहरातील दुर्गादेवी मंदिरात आगमन झाल्यानंतर फटाक्यांच्या आतषबाजीने तसेच या ज्योतींच्या प्रमुखांचे दुर्गादेवी तरुण मंडळ व दुर्गादेवी मंदिराच्या वतीने भगवे उपरणे व श्रीफळ देऊन

मंदिर पुजारी पत्रकार सुधीर चव्हाण,आप्पासाहेब पठाडे, विलास शिंदे,विठ्ठल चव्हाण, दीपक परदेशी,नितीन कदम,नगरसेवक जालिंदर गवळी,मनोज लालबीगे यांच्या हस्ते पूजन करून स्वागत करण्यात आले.

नवरात्रोत्सवानिमित्त नेवासा शहर व परिसरातील वातावरण दुर्गामय बनले होते नेवासा शहरात नवरात्र उत्सवामुळे घटाचे साहित्य खरेदी करण्यासाठी बाजारपेठ फुलली होती.महिलांसह नागरिकांच्या चेहऱ्यावर उत्साह दिसून येत होता नेवासा शहर व परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात घटस्थापना करण्यात आली.यावेळी ठीक ठिकाणी झालेल्या धार्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य वेदशास्त्र संपन्न पांडूगुरू जोशी,निखिल गुरू जोशी या युवा पुरोहितांनी केले.

नवरात्रोत्सवानिमित्त कळसुबाई मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना विनम्र आवाहन

देवी मातेचे पावित्र्य जपूया, निसर्गाचे संरक्षण करूया!

अकोले (समर्थ गांवकरी)



महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर असलेल्या कळसुबाई गडावर नवरात्रोत्सवानिमित्त महाराष्ट्रासह राज्याबाहेरील हजारो भाविक व पर्यटक दर्शनासाठी येत असतात. या पवित्र उत्सवात प्रत्येक भाविकाने कळसुबाई मातेचे पावित्र्य, गडाचे धार्मिक महत्त्व आणि निसर्गसौंदर्य जपण्याची जबाबदारी पार पाडावी, असे विनम्र आवाहन सामाजिक कार्यकर्ते अनंत महादू घाणे, देवस्थानचे अध्यक्ष तुकाराम सोमा खाडे तसेच विश्वस्त राजू भारमल, योगेश खाडे, पांडू खाडे, प्रकाश खाडे, चंदर खाडे आणि नंदू तातळे यांनी केले आहे. कळसुबाई मातेच्या देवस्थानचा विकास व्हावा, यासाठी माजी मंत्री स्वर्गीय मधुकरराव पिचड यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या कार्यकाळात वीज, पायऱ्या आणि लोखंडी शिडी यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. भाविकांनी या सुविधांचा योग्य वापर करून सुरक्षितपणे गडावर जावे, मातेचे दर्शन घ्यावे आणि निसर्गाचा आनंद घेत गडाचे पावित्र्य जपावे. गडावर चढताना व उतरताना भाविकांनी शांतता, शिस्त आणि सहकार्याची भावना ठेवावी. वृद्ध, महिला, लहान मुले तसेच अडचणीत सापडलेल्या भाविकांना शक्य ती मदत करावी. गडावरील झाडे, वनस्पती, डोंगर परिसर आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घ्यावी. विशेषतः प्लास्टिकच्या पिशव्या, पाण्याच्या बाटल्या, खाद्यपदार्थांचे आवरण आणि इतर कचरा गडावर कुठेही टाकू नये. उपलब्ध कचराकुंड्यांचा वापर करावा आणि शक्य असल्यास सोबत आणलेला कचरा परत खाली आणून योग्य ठिकाणी त्याची विल्हेवाट लावावी. 'माझा गड, माझी जबाबदारी' या भावनेतून प्रत्येक भाविकाने कळसुबाई गड स्वच्छ, सुंदर आणि पवित्र ठेवण्यासाठी योगदान द्यावे. नवरात्रोत्सव हा श्रद्धा, संस्कृती, निसर्गसंवर्धन आणि सामाजिक एकोपा जपण्याचा पर्वकाळ असल्याने सर्व भाविकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने देवीचे दर्शन घ्यावे. प्रवासादरम्यान कोणतीही अडचण निर्माण झाल्यास पोलीस प्रशासन, वन विभाग आणि स्वयंसेवकांची मदत घ्यावी. प्रशासन व स्वयंसेवकांकडून आवश्यक सहकार्य केले जाईल. सर्व भाविकांनी कळसुबाई मातेचे दर्शन घेऊन सुखरूप आपल्या गावी परतावे, अशी प्रार्थना देवस्थानचे पदाधिकारी व विश्वस्तांनी केली आहे. मातेचे पावित्र्य जपूया, कळसुबाईचा निसर्ग वाचवूया आणि स्वच्छ–सुंदर गड पुढील पिढ्यांसाठी जतन करूया! जय कळसुबाई माता! जय भवानी!

श्री बुऱ्हाणनगरच्या अंबिका माता तुळजाभवानी देवी मंदिरात सकाळी महापूजा, ध्वजारोहण होऊन वाजत गाजत घटाची शोभा यात्रा व मंदिरात घटस्थापना

भक्तिपूर्ण वातावरणात भाविकांची दर्शनासाठी रीघ

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

बुऱ्हाणनगर ता.नगर येथील कुलस्वामिनी तुळजाभवानी देवी मंदिरात काल रविवार दि.११ रोजी सकाळी नवरात्रौत्सवास भक्तिपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. यानिमित्ताने मंदिरातील तुळजाभवानी देवीची सकाळी महापूजा, अभिषेक करून ध्वजारोहणा करून विधिवत घटस्थापना देवीचे पुजारी विजय भगत आणि कुटुंबीयांनी केली. 'आईराजा उदो उदो...सदानंदीचा उदो उदो..., तुळजाभवानी देवी की जय... असा देवीचा जयघोष उपस्थित भाविकांनी केला. शारदीय नवरात्रीच्या पहिल्याच दिवशी कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या दर्शनास भाविकांनी सकाळपासूनच मोठी गर्दी केली आहे.

घटस्थापणे पूर्वी पुजारी भगत परिवारातील महिलांनी डोक्यावर सजवलेले घट व पुरुषांनी भगवे ध्वज, अबकारी हातात घेत तुळजाभवानी देवीचा जयजयकार करत मंदिराला प्रदक्षिणा मारली. या प्रदक्षिणे नंतर मंदिराचे मुख्य पुजारी ॲड.विजय भगत, सौ.दुर्गा भगत, ॲड.अभिषेक भगत व यांनी कुणाल भगत राजेंद्र भगत, अंजली भगत, किरण भगत, मनीषा भगत, सुभाष भगत, सुनंदा भगत, कविता भगत, रोहन भगत, ॲड.अजिक्य भगत, वैभवी भगत, अंकिता भगत, ॲड.संकेत भगत, अक्षदा भगत, वेदिका भगत क्षताक्षी व वेद भगत वेद भगत यांनी मंदिरात विधिवत घटस्थापना करून देवीची महाआरती केली. नवरात्रोत्सवानिमित्त तुळजाभवानी देवीची मूर्ती सुवर्ण अलंकारांनी मढण्यात आली होती. तसेच विविध फुलांच्या माळांनी देवीचे रूप अधिकच प्रसन्न वाटत होते.

शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी देवी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. मंदिर परिसरातही सजावट करण्यात आली आहे. देवीच्या मुखदर्शनाची वेगळी व्यवस्था करण्यात आली आहे. दिवसातील २० तास भाविकांना देवीचे दर्शन घेता येणार आहे.

नवरात्रोत्सवा निमित्त पुढील १० दिवस भरगच्च धार्मिक आणि आरोग्य शिबिराचे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

तुळजाभवानी देवीचे दर्शन श्री बुऱ्हाणनगर देवी या पेजवर सर्व समाज माध्यमांवर उपलब्ध आहे, अशी माहिती मंदिराचे पुजारी ॲड.अभिषेक भगत यांनी देवून सर्व भाविकांनी येथील धार्मिक कार्याक्रमांचा व देवीच्या दर्शनचा लाभ घ्यावा, असे



आवाहन त्यांनी केले आहे. तुळजाभवानी देवीच्या दैनंदिन पुजेची माहिती कुणाल भगत यांनी दिली. यावेळी प्रांत संघ चालक नानासाहेब जाधव , विभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे, भिंगार कैंप पोलीस निरीक्षक थोरात, रोटरी क्लब चे सर्व सदस्य, डॉक्टर्स आणि भाविक भक्त मोठ्या संख्येने उस्पस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

पत्रकार वसाहत आणि पत्रकार भवन साठी प्रयत्न करणार : आमदार किशोर पाटील

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या कार्यक्रमात ग्वाही!... लाडकी बहीण प्रमाणे लाडका पत्रकार योजना शासनाने सुरू करा : डॉ विश्वासराव आरोटे



जळगाव (समर्थ गांवकरी)

पत्रकारांनी पत्रकारिता करत असताना आपल्या परिवाराला नेहमी मदत केली तर परिवार देखील एकमेकाला मदत करत असतो त्याचप्रमाणे पाचोरा तालुक्यातील नामांकित विधी तज्ञ एडवोकेट कविता रायसाकडा यांनी आजारी पत्रकारांना आपल्या परिवारातील मानून त्यांना आर्थिक मदतीचे धनादेश दिले ही पत्रकारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची गोष्ट असून पत्रकाराच्या पत्नीने पत्रकारांसाठी केलेली मदत ही भविष्य काळामध्ये नक्कीच पुढे जाणारी आहे असे अहवाल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉक्टर विश्वास आरोटे यांनी.....जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघा चे दि.१० ऑक्टोबर शनिवार रोजी उत्तर महाराष्ट्र स्तरीय अधिवेशन पाचोरा भडगाव मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार किशोर आप्पा पाटील यांच्या अध्यक्षतेत तर संघटनेचे प्रदेश अध्यक्ष निलेश सोमाणी, प्रदेश सरचिटणीस डॉक्टर विश्वासराव आरोटे, यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले या प्रसंगी पाचोरा नगर परिषद नगराध्यक्षा सौ. सुनीताताई किशोर पाटील, सु प्रसिद्ध अहिराणी रिल स्टार सचिन कुमावत, नगरसेवक प्रविण ब्राह्मणे,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे म राठवाडा विभागीय संपर्कप्रमुख कुंडलिक वाळेकर नाशिक जिल्हा संपर्कप्रमुख विजय शेळके पत्रकार सचिन सोमवंशी ... आदी उपस्थित होते .

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात संघटनेचे राज्य उपाध्यक्ष किशोर रायसाकडा यांनी संघटनेच्या सामाजिक, विधायक , संघटनात्मक कार्याची माहिती सांगितली. प्रमुख मार्गदर्शन भाषणात प्रदेश सरचिटणीस डॉक्टर विश्वासराव आरोटे यांनी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटना ही पत्रकार हितासाठी कार्य करणारी असून आमची संघटना ही जनकार्यात , पत्रकाराच्या सुखदुःखात धावून जाणारी आहे. विविध स्तरावर नावलौकिक मिळविणारे व्यक्ती, गुणवंत विद्यार्थी याचा गौरव ज्येष्ठ नागरिक, पत्रकार यांचा मान सन्मान करणारी आहे. आमची पत्रकार संघटना देणारी आहे घेणारी नाही. सद्या राज्यात दुष्काळा मुळे शेतकऱ्यांवर संकट निर्माण झाले असून सर्वत्र भयावह परिस्थिती आहे. याची जाणीव आम्हाला देखील आहे. पत्रकारांच्या समस्या , मागण्यां बाबत ते म्हणाले की सरकार कडून पत्रकारांना भरपूर अपेक्षा आहेत राज्य सरकारने पत्रकार पेन्शन योजना घोषित केली मात्र ठराविक पत्रकारांना या पेन्शन योजनेचा लाभ मिळत आहे. सर्व पत्रकारांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी लढा उभारावा लागणार आहे. ज्या प्रमाणे राज्य सरकार लाडकी बहीण, लडका भाऊ योजना राबवीत आहे त्याच प्रमाणे लाडका पत्रकार योजना देखील सुरू करावी, पत्रकारांना शासनाच्या वतीने पत्रकार वसाहत आणि तालुका स्तरावर पत्रकार भवन साठी शासकीय जागा उपलब्ध करून देण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली. पाचोरा येथील संघटनेचे पदाधिकारी दरवर्षी सामाजिक बांधिलकी जोपासून जनहिताचे विधायक कार्यक्रम आयोजित करतात ते कौतुकास्पद आणि संघटनेचे नाव मोठे करणारे काम आहे. या कार्यक्रमात प्रदेश उपाध्यक्ष किशोर रायसाकडा यांच्या पत्नी ड. कविता रायसाकडा यांनी तीन अपघात ग्रस्त पत्रकारांना प्रत्येकी पाच हजारांची केलेली मदत माणुसकीचे दर्शन घडविणारी आहे. पत्रकारांना कानमंत्र देताना म्हणाले की पत्रकारांनी कोणाचेही जीवन उध्वस्त होणार नाही असे लिखाण करू नये. संघटनेचे प्रदेश अध्यक्ष निलेश सोमाणी यांनी पत्रकार संघटनेचे कार्याचा लेखाजोखा मांडला. आणि संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या कामाचे कौतुक केले.अहिराणी रील स्टार सचिन कुमावत म्हणाले की पाचोरा शहरातील पत्रकार कलाकारांवर प्रेम करणारे असून या संघटनेच्या विधायक कामासाठी मी केव्हाही मदत करायला तयार आहे.

अध्यक्षीय भाषणात आमदार किशोर पाटील म्हणाले की, पत्रकारांचे विविध प्रश्न, समस्या, मागण्यां ची मला देखील जाणीव आहे. मी पत्रकार संघाला आपला परिवार मानतो. त्यांचे साठी काहीतरी करावे माझी देखील प्रामाणिक इच्छा आहे. मात्र सध्याच्या काळात प्रिंट, सोशल, आणि इलेक्ट्रॉनिक पत्रकारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे कुणाला काय न्याय द्यावा हा प्रश्न पडतो. सरकारच्या योजना देताना जर्नालिझम पदवीधारक रजिस्ट्रेशन असणे आवश्यक आहे. या साठी अधिकृत पत्रकारांची यादी बनवा आणि मागण्यांचे मला निवेदन द्या. मी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करतो असा शब्द आमदारांनी दिला. या पत्रकार संघाचे ज्येष्ठ पदाधिकारी किशोर रायसाकडा आणि त्यांचे सहकारी हे दरवर्षी समाजोपयोगी कार्यक्रम राबवितात. या कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांना शालेय किट वाटप, वंचित असलेले जेष्ठ पत्रकार यांचा सन्मान आणि अपघात ग्रस्त पत्रकारांना केलेली मदत पत्रकारांचे अपघात विमा हे कार्य कौतुकास्पद आहे. वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी पत्रकारांसाठी पत्रकार कॉलनी आणि पत्रकार भवन या साठी मी प्रयत्न करणार असल्याची त्यांनी ग्वाही दिली. राज्यात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती बघता शिवसेनेच्या वतीने साजरा होणारा दुर्गोत्सव आणि १ नोव्हेंबर माझा वाढदिवस साजरा करणार नाही. उधळपट्टीचा पैसा मी माझ्या शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री निधीत जमा करणार असल्याची घोषणा केली. पत्रकार बांधवांनी दुष्काळी परिस्थिती आणि निर्माण झालेले अल निनोचे संकटांमुळे भविष्यात पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर होणार असला तरी देवाच्या कृपेने मतदार संघात परिस्थिती चांगली आहे.मतदार संघ सर्वांगीण सुखी करण्यासाठी पावले उचलणार आहे. पत्रकारांनी पत्रकारिता करताना वाईट दिशेने जाऊ नये, त्यांच्या लिखाणातून पाणी अडवा पा जिरवा यावर प्रबोधनात्मक लिखाण करावे असे भाषणाच्या समारोपात आवाहन केले.

यावेळी पत्रकार संघाचे विभागीय अध्यक्ष समाधान मैराळे, उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष प्रा.विजय गाढे, ग्रामीण जिल्हा अध्यक्ष राजेंद्र पाटील, आदी उपस्थित होते

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघटनेचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष भुवनेश दुसाने,उपाध्यक्ष राकेश सुतार,पाचोरा तालुकाध्यक्ष गौतम सोनवणे,... आदींनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जेष्ठ पत्रकार अयाज मोहसिन तर आभार प्रवीण ब्राम्हणे यांनी मानले.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यासह महाराष्ट्र काँग्रेस मधील नेते दिल्ली मोर्चात सहभागी

संगमनेर (समर्थ गांवकरी)

वोट चोरी करणाऱ्या केंद्र सरकार व यामध्ये मुख्य भूमिका असणारे देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा घ्यावा व चौकशी व्हावी याकरता इंडिया आघाडीच्या वतीने आयोजित दिल्ली आंदोलनात काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्यासह महाराष्ट्रातील विविध नेते खासदार आमदार पदाधिकारी सहभागी झाले असून ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा घेतलाच पाहिजे अशी मागणी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

नवी दिल्ली येथे महाराष्ट्र सदन ते सर्वोच्च न्यायालय यादरम्यान झालेल्या आंदोलनामध्ये विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे खासदार प्रियंका गांधी, ममता बॅनर्जी, अखिलेश यादव, सुप्रिया सुळे संजय राऊत यांच्यासह इंडिया आघाडीतील प्रमुख नेते व महाराष्ट्र काँग्रेस मधून माजी प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, नाना पटोले, खासदार वर्षा गायकवाड, आमदार बंटी पाटील, आमदार डॉ विश्वजीत कदम, आमदार अमित देशमुख आमदार हेमंत ओगले, माणिकराव ठाकरे यांच्यासह विविध पदाधिकारी सहभागी झाले आहेत.

यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, सर्वोच्च न्यायालय हे न्याय मागण्यासाठी ची अंतिम जागा आहे. त्यांनी देशाचा आवाज ऐकून घेतला पाहिजे. इंडिया आघाडीचा आवाज हा देशाचा आवाज आहे मात्र सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश यांनी राहुल गांधी यांना भेटणार कारणे हे दुर्दैवी आहे.

सत्ताधाऱ्यांनी जनतेचा आवाज ऐकला पाहिजे. परंतु ती त्यांची तयारी नाही .काँग्रेस सरकारच्या काळामध्ये अनेक आंदोलने झाली. सर्वांचा आवाज सरकारने ऐकला. पद्मभूषण अण्णा हजारे यांनी जंतर-मंतरवर आंदोलन केले. मुक्तपणे आंदोलन झाले .त्यामध्ये कोणताही दबाव नव्हता. मात्र दुर्दैवाने आज तसे होत नाही सध्याचे सत्ताधारी काहीही करून सत्ता हवी अशा पद्धतीने वागत असून सत्तेला चिटकून राहतात आणि जनतेचा आवाज दाबत आहेत.

स्वायत्त संस्था स्वायत्त राहिलेल्या नाहीत. त्यांच्यावर राजकीय दबाव टाकला जात आहे. मीडिया हे स्वतंत्र असून ते सुद्धा सरकारच्या नियंत्रणाखाली काम करत आहे. जगामध्ये मीडियाच्या बाबत भारताचा १५७ वा नंबर लागतो हे वाईट आहे.

महाराष्ट्रात एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे आंदोलन खूप दिवस झाले त्यांची न्याय मागणी होती. भिमनवार यांचे खरे तर निलंबन व्हायला हवे होते. पेपर का फुटतात की ठराविक लोकांसाठी फोडले जातात. आर्थिक घोटाळ्या बरोबर इतर काय लागेबंधे आहेत याची चौकशी झाली पाहिजे.

स्वर्गीय आर आर पाटील यांच्या काळामध्ये पोलीस भरतीमध्ये अत्यंत शिस्त आणली होती. हेतू चांगला असेल तर काम



चांगले होते.मात्र सध्या महाराष्ट्र सरकार व केंद्र सरकारचा हेतू चांगला नसून भ्रष्ट अधिकाऱ्यांना ते पाठीशी घालत आहे.

खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वात एसआयआरच्या मुद्द्यावर मागील काही दिवसांपासून सलग आंदोलन सुरू आहे. मात्र ज्ञानेश कुमारला का संरक्षण दिले जाते आहे हा मोठा प्रश्न असून निवडणूक आयोगाच्या वतीने अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिली जात नाही .सर्व प्रतिक्रिया भाजपचे प्रवक्ते देत आहेत. खरे तर भाजपच्या लोकांनी सुद्धा या आंदोलनामध्ये सहभागी व्हायला पाहिजे होते.

देशाची राज्यघटना आणि लोकशाही टिकवणे अत्यंत गरजेचे असून देशाचा आवाज सरकारने व सर्वोच्च न्यायालयाने ऐकावा आणि न्याय द्यावा अशी मागणी यावेळी वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

महिला सक्षमीकरणाला बळ; स्वावलंबी महिला ग्राम संघाच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन

'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत महिला बचत गटांना २४ लाख रुपयांचा सीआयएफ निधी वितरित

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांना स्वयंरोजगाराच्या माध्यम ातून स्वावलंबनाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) च्या स्वावलंबी महिला ग्राम संघाच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच महिला बचत गटांना आर्थिक बळ देण्यासाठी २४ लाख रुपयांच्या समुदाय गुंतवणूक निधीचे (सीआयएफ) वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम गुरूवार दि ८ ऑक्टोबर रोजी संपन्न झाला.

राज्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना संघटित करणे, बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरणाला चालना देणे आणि महिलांसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे यावर भर दिला जात आहे.

या कार्यक्रमास आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, तहसीलदार संजय बिराजदार, गटविकास अधिकारी संजय लखवाल, तालुका कृषी अधिकारी धनंजय हिरवे, तालुका अभियान व्यवस्थापक अर्जुन सोनवणे, प्रभाग समन्वयक ज्ञानेश्वर कांबळे, ग्रामसंघाच्या पदाधिकारी, बचत गटांतील महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार श्री लंघे पाटील म्हणाले





की, महिलांचे संघटन, आर्थिक सहभाग आणि स्वयंरोजगाराला चालना देणाऱ्या अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील महिलांना उपलब्ध संसाधनांचा उपयोग करून स्वतःच्या आर्थिक प्रगतीसाठी प्रयत्न करण्याची संधी मिळत आहे. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून महिला बचत गटांचा विस्तार आणि विविध शासकीय यंत्रणांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्यात याव असेही ते म्हणाले. मान्यवरांच्या हस्ते स्वावलंबी महिला ग्राम संघाच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी महिला बचत गटांना २४ लाख रुपयांचा सीआयएफ निधी वितरित करण्यात आला.

तहसीलदार संजय बिराजदार यांनी गावपातळीवर कार्यरत असलेल्या विविध यंत्रणांनी उमेद अभियानाच्या कार्याला सहकार्य करावे, असे सांगितले. महिला बचत गटांची स्थापना आणि त्यांचा विस्तार करण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. तालुका कृषी अधिकारी धनंजय हिरवे यांनी कृषी सहाय्यकांना महिला बचत गटांच्या स्थापनेसाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. महिलांनी शेतीपूरक व्यवसायांकडे वळल्यास त्यांना उत्पन्नाच्या अतिरिक्त संधी उपलब्ध होऊ शकतात, या दृष्टीने गटांच्या माध्यमातून उपक्रम राबविण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. गटविकास अधिकारी संजय लखवाल यांनी सेवा संकल्प अभियानात अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या आणि ग्रामसेवक यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, अशा सूचना दिल्या. अभियानाच्या कालावधीत जास्तीत जास्त महिला बचत गटांची स्थापना करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

तालुका अभियान व्यवस्थापक अर्जुन सोनवणे यांनी उमेद अभियानाची तसेच सेवा संकल्प अभियानाची सविस्तर माहिती दिली. ग्रामीण भागातील जास्तीत जास्त महिलांनी बचत गटांमध्ये सहभागी होऊन उपलब्ध संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. बचत गट सदस्या रत्नमाला लंघे यांनीही महिलांना मार्गदर्शन करताना तळागाळातील सर्व महिलांना बचत गटांच्या प्रवाहात आणण्याची गरज व्यक्त केली.